

# 'नारीशक्ती'ला आरक्षणाचे बळ !

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, २४ सप्टेंबर २०२३

मोदी यांच्या मुत्सद्दीपणामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहात हे विधेयक दोन तृतीयांश मताने संमत झाले आहे. या निमित्ताने मोदी सरकारने भारतीय संसदेत नवा इतिहास रचला आहे! मोदी विरोधी पक्षांनी आघाडीला इंडिया असे 'गोडस' नाव दिले आहे. हिंदी चित्रपटातील 'नाम बडे और लक्षण खोटे' हे गाणे प्रसिध्द आहे. तसे आघाडीचे नाव 'इंडिया' जरी असले नेत्यांचे चारित्र्य कलंकित आहे. काँग्रेस राजवटीत भारतीय घटनेचे भाषांतर केले गेले. त्यात इंडिया म्हणजे भारत या स्पष्ट म्हटलेले आहे. राजकारणासाठी इंडिया नावाचा वापर चालतो! मग विरोधकांना भारत नावाची अलर्जी का असावी? भारत या नावाला देशाची संस्कृती आहे, तर 'इंडिया' हे नाव ब्रिटिशांनी दिलेले आहे! इंडिया नाव म्हणजे 'आदिवासी' आणि मागास या अर्थाने नाव दिले गेले आहे. 'इंडिया' नाव देण्याची कल्पना राहुल गांधी यांनी दिले आहे ना! ती विदेशी मानसिकेतून आलेली आहे. त्यांना भारतीय संस्कृती, परंपरांची जाण नाही. या केवळ नावावरुन मतदारांना मूर्ख बनवून २०२४ निवडणूक जिंकण्याचे स्वप्न रचले जात होते! पण भारत या नावाचा उल्लेख केल्याने त्यांचे स्वप्न पार धुळीला मिळलेले दिसतेय! या इंडिया आघाडीने सनातन धर्म नष्ट करण्याचा अजेंडा निश्चित केला आहे काय? यावर प्रेमाचे दुकान सुरु केलेल्या नेत्याचे तोंड बंद आहे. देशात नवीन संसदेची उभारली गेली, याचा अभिमान वाटायला पाहिजे, त्यासही विरोध केला गेला. या नवीन संसदेत ऐतिहासिक व मोठा निर्णय घेतला जावा, याच उद्देशाने मोदी सरकारने महिला आरक्षण विधेयक आणले. तर मोदीचे केवळ ट्रेलर आहे! ते निवडणुकीपूर्वी अनेक धक्के देवू शकतात! देशात मोदी सरकारच्या विरोधात वातावरण दिसत नाही! तेंव्हा 'इडिया आघाडी' मोदी सरकार उलथून टाकणार तरी कसे? केंद्रात काँग्रेसची सत्ता गेली, पक्ष कमजोर झाला. पण काँग्रेसचा अंहकार गेलेला नाही! म्हणतात ना! 'सुंभ जाळला, तरी पीळ जात नाही, असे काँग्रेस नेत्यांचे आहे. भारताला आमच्यामुळे देशाला स्वातंत्र्य मिळाले, आम्हीच लोकशाही दिली, आम्ही घटना दिली म्हणून तुम्ही सत्तेत आहोत? 'देशाचे सर्व कायदे व योजना आम्ही दिल्या'! अशी वल्गना काँग्रेस नेते करत आहेत. या काँग्रेसने भारताच्या मुळ घटनेत छेडछाड केलेली आहे. त्यात धर्मनिरपेक्ष, समाजवाद हे शब्द नसताना. हे दोन शब्द घुसविले. काँग्रेसने कधी घटनेचा, घटनाकार आंबेंडकरांचा आदर केलेला नाही! त्यांचा अवमान केला. आंबेडकरांनी काँग्रेस जळते घर आहे, त्यापासून दूर रहा, असा सल्ला दिला आहे. इतकेच नव्हे! काँग्रेसने देशावर आणीबाणी लादली व लोकशाहीत व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा गळा घोटण्याचे कृत्य केले. राज्यातील विरोधी पक्षांची सरकारे बरखास्त केली. ती काँग्रेस घटना, लोकशाहीवर ज्ञान देत आहे, याचे आश्चर्य वाटते! काँग्रेस पक्षाने आतापर्यंत मुस्लिम, हिंदू असा वादातून, भावनिक आधारावर निवडणूक जिंकल्या आहेत. काँग्रेसने १११९ ला मुस्लिम नेत्यांशी समझौता करुन मुस्लिमांना स्वतंत्र मतदार देण्याचे करार केला होता. तर १९३२ मध्ये डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांना राजकारणात योग्य प्रतिनिधी मिळावे, म्हणून स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली होती. या मागणीच्या विरोधात महात्मा गांधींनी उपोषण केले होते. तेव्हा गांधींजींनी तर माझे 'प्राण देईन, पण दलितांना स्वतंत्र मतदार देऊ देणार नाही",अशी हट्टी भूमिका घेतली होती. त्यावेळी डॉ. आंबेडकरांनी 'गांधी तुम्ही देशाला हवेत' असे म्हणत माघार घेतली व राखीव मतदार संघाची मागणी मान्य केली. तेव्हा काँग्रेसला आंबेडकरांपेक्षा गांधी प्रिय होते. डॉ. आंबेडकरांमुळे घटनेत अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी राजकीय आरक्षण देण्याचा तरतूद केली गेली. तरीही काँग्रेस दलितांना आरक्षण दिले, असे म्हणत असते! हे दिशाभूल करणारे आहे. नंतरया आरक्षणाला मुदतवाढ देण्यात आली. घटनेत इतर मागासवर्गियांसाठी (ओ.बी.सी.) राजकीय आरक्षण देण्याची तरतूदच नाही. देशात १९५२ पासून लोकसभा, विधानसभेवर सर्वसाधारण, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचे या तीन श्रेणीतून खासदार व आमदार निवडून येत आहेत! काँग्रेस नेत्यांनी याचे ज्ञान नाही काय? या निमित्ताने ओ.बी.सी.ची मागणी करुन आग भडकविण्याचा राजकीय षडयंत्र रचले जात आहे. घटनेत धर्माच्या आधारावर राजकीय आरक्षण देण्याची तरतूद नाही, देशात शैक्षणिक, नोकरीत आणि राजकीय तीन टप्पात आरक्षण दिले जाते! जे घटनेनुसार करता येत नाही, अशीच मागणी काँग्रेस व विरोधी पक्षाकडून का केली जातेय? यात कुटील डाव आहे! देशातील मतदारांची दिशाभूल करून व्होट बँक वळवायचे आहे. यातून २०२४ च्या निवडणुकीत मोदी सरकारच्या विरोधात नकारात्मक वातावरण व्हावे,हाच उद्देश आहे.भारतात प्रथम जी-२० परिषद झाली. जगातील सर्वच राष्ट्रांनी भारताचे कौतूक केले,पण काँग्रेस नेत्याच्या मात्र पोटदुखीचा त्रास होत होता. मोदीव्देषातुन हे देशाचा अभिमान वाटेनासे झाला आहे!म्हणे! काँग्रेस अध्यक्षाला जेवायला बोलावले नाही? ही आंतरराष्ट्रीय परिषद" होती.ते काही गावजेवणा' नव्हते! काय? इतक्या दळभद्री विचाराचे नेते आहेत. भारतात


कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850




आधुनिक केसरी

**पंतप्रधान मोदींना येत्या निवडणुकीत पराभूत करण्यासाठी इंडिया या आघाडीने चंग बांधलेला आहे.पण या आघाडीला मोदींना घेरण्यासारखा मुद्दा शोधत आहेत! तर मोदी एका पाठोपाठ राष्ट्रहिताचे विषय आणत आहेत.यात जी,-२०, नवीन संसद भवन,'भारत 'नावाचा उल्लेख सुरु सुरु केला.यामुळे विरोधक गोंधळला सापडला! त्यात मोदीं महिला आरक्षण विधेयक आणले. याने इंडिया आघाडीची हवाच निघाली.मोदी विरोधी आघाडीला या विधेयकाला संमती देण्याशिवाय पर्याय नव्हता.**

सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रात महिलांचे मोठे योगदान आहे. स्वातंत्र्यपूर्वी १९३१ मध्ये बेगमशहा व सरोजनी नायडू यांनी ब्रिटीश पंतप्रधानांकडे महिलांना राजकीय आरक्षण देण्याची मागणी केली होती. संविधान सभेत राजकारणात महिलांना प्रतिनिधित्व देण्याच्या विषयावर विस्तृत चर्चा झाली. पहिल्या लोकसभेत म्हणजे १९५२ मध्ये १४ महिला खासदार होत्या, त्यानंतर चढउतार झाले. पण महिला सदस्यांची संख्या १४ टक्याच्यावर जाऊ शकलेली नाही.स्वातंत्र्यानंतर समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळेल, अशी अपेक्षा होती. पण महिलांनाही आरक्षण देता आलेले नाही. या मागणीसाठी देशातील अनेक महिला नेत्यांनी आवाज उठविला, आंदोलने केली. यात महाराष्ट्रातील समाजवादी नेत्या श्रीमती प्रमिला दंडवते यांनी महिला आरक्षणाची मागणी केली होती. आज संसदेत ५४३ खासदारापैकी ७८ महिला. तर राज्यसभेत २४५ त्यात ११ महिला सदस्य आहेत. भारतीय संसदेतील महिलांची टक्केवारी ही बांगलादेश, पाकिस्तान, नेपाळ श्रीलंका या राष्ट्रापेक्षा कमी आहे. याची लाज काँग्रेसला वाटली नाही. आज भाजपा व मोदी यांचे मंत्रिमंडळात ५ टक्के महिला आहेत. तसेच भाजपाचे ओ.बी.सी. खासदार व मंत्री अधिक आहेत! देशात १९७० मध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा केला. संयुक्त राष्ट्राने १९७१ मध्ये चार वर्षे आधीचा देशातील महिला स्थितीबद्दल अहवाल मागितलेला होता. त्यानंतर केंद्राने एक अभ्यास समितीचे नियुक्त केली. त्या समितीने अहवालात भारत संघराज्य "है लैगिंक समानता सुनिश्चित करण्यास घटनात्मक जबाबदारीत अपयशी ठरल्याचे म्हंटले होते! तेंव्हा केंद्रातील काँग्रेस सरकारला जाग आली. स्व.राजीव गांधी यांनी १९८७ मध्ये मार्गारेट आल्वा समितीचे गठन केले होते. या समितीने ३६५ शिफारशी सादर करताना महिलासाठी राखीव जागा द्याव्यात,अशी सूचना केली होती. त्यानुसार माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांनी घटनेत ७३ व ७४ वी दुरुस्ती केली. त्यानुसार देशातील स्थानिक स्वराज संस्थानमध्ये महिलांना आरक्षण देण्याची प्रक्रिया सुरू झाली. पण राजीव गांधींनी महिलांना आरक्षण दिले, हा काँग्रेसचा दावा खोटा आहे.त्यानंतर देशात लोकसभा व विधानसभेत महिला आरक्षण देण्याची मागणी केली जाऊ लागली. देशात प्रथम ९ डिसेंबर १९९७ माजी पंतप्रधानमध्ये एच.डी देवगौडा यांनी महिला आरक्षण विधेयक संसदेत आणले होते, पण या सरकारला यश आले नाही. १६ मे १९९७ मध्ये इंद्रकुमार गुजलाल सरकारने महिला विधेयक आणले, पण लोकसभा विसर्जित झाल्याने, त्यामुळे विधेयक रद्द झाले. १९९८ व १९९९ मध्ये केंद्रात भाजपा सरकार आले. अटलबिहारी वाजपेयी सरकारने महिला विधेयक आणले होते. तेव्हा संसदेत कायदा मंत्री थंबीदुराई हे विधेयक सादर करत असताना राष्ट्रीय जनता दलाचे दोन सदस्यांनी त्यांचे हातातील विधेयक हिसकावून घेतले व फाडले. तेंव्हाही मुस्लिम नेते खा. बनातवाला व बसापाचे इलियास आझमी या नेत्यांनी मुस्लिम महिलांच्या आरक्षणाची मागणी केली होती.आज आय ए. एम.आय एम.चे नेते असोदोद्दीन औवेसी तीच मागणी करत आहेत. भाजपा व वाजेपयी सरकारला दोन वेळेस महिला विधेयकाबाबत यश आलेले नाही.त्यानंतर २००४ केंद्रात काँग्रेस इतर पक्षाच्या कुबड्या घेत सत्तेत आली.माजी पंतप्रधान मनमोहनसिंग सरकारने २०१० मध्ये राज्यसभेत महिला विधेयक आणले ते संमत झाले पण लोकसभेत मात्र आघाडीत महिला आरक्षणावरुन मतभेद झाले, सरकारमधील मित्र पक्ष विरोधत गेला. यात 'जद'चे नेते लालू प्रसाद यादव आणि समाजवादी पक्षाचे नेते मुलायमसिंह यांनी तर महिला विधेयक आणले तर सरकारचा पाठिबा काढून घेवू,असा इशारा दिला होता.संयुक्त पुरोगामी आघाडीच्या अध्यक्षा सोनिया गांधी होत्या.त्यांच्याकडे तर सरकारची सूत्रे होती. पण सत्तेपायी जाईल, म्हणून महिला आरक्षण विधेयक लोकसभेत आणले गेलेच नाही. ते लपविले जात आहे, तेव्हा सोनियांना आपले पती स्व. राजीव गांधी यांच्या स्वप्नांची आठवण झाली नाही. भाजपाने २०१४ व २०१९ मध्ये निवडणूक 'संकल्पपत्रात' महिला आरक्षण देण्याचे वचन दिलेले आहे, त्यानुसार मोदी सरकारने महिलासाठी अनेक योजना हाती घेतल्या आहेत!! या आठवड्यात नवीन संसद भवनात मोठा व निर्णय घेतला जाण्याची शक्यता वर्तवली जात होती. त्यामुळे मोदी सरकारने विशेष अधिवेशन बोलविले होते. त्याला काँग्रेस व विरोधी पक्षांनी आक्षेप घेतला. मोदी सरकार संसदेत महिला आरक्षण विधेयक आणत असताना श्रीमती सोनिया गांधी यांनी महिला विधेयकाबाबत 'हमारा है' अशा शब्दात दावा केला. मोदी सरकारने कोणतेही निर्णय घेवो, त्याला विरोध करणे, ही काँग्रेसची सवय आहे. मोदींनी १२८ घटना दुरुस्तीव्दारे नारी शक्ती वंदन विधेयक २०२३ संसदेत मांडले. या विधेयक लोकसभेत पास होईल पण ते राज्यसभेत संमत होणार नाही, असा अंदाज व्यक्त केला जात होता. पण पंतप्रधान मोदी यांच्या कुशल नेतृत्वामुळे २७ वर्षानंतर महिला आरक्षण विधेयक दोन तृतीयांश मतांनी दोन्ही सभागृहात संमत झाले आहे. खर तर ! मोदींनी स्व. राजीव गांधी यांचे स्वप्न पूर्ण केले आहे, तेव्हा गांधी परिवाराने मोदींचे आभार मानावयास हवे! पण हा मोठेपणा या गांधी परिवाराकडे नाही. संविधान भवन ते नवीन संसद भवनापर्यंत देशाचे पंतप्रधान मोदी मत्री व सदस्य पदयात्रेने गेले त्यात काँग्रेस नेते ज्येष्ठ नेते आणि गांधी परिवार सहभागी झालेला नाही. ते पंतप्रधानांसोबत जाण्याचे सौजन्य दाखवू शकलेले नाहीत. काँग्रेस नेत्यांना देशापेक्षा गांधी परिवार मोठा वाटतोय! या गांधी परिवारात अंहकार, व्देष, कपट महत्वाकांक्षीपणा ठासून भरलेला आहे.काँग्रेसला २७ वर्षात महिला आरक्षण प्रश्नावर निर्णय घेता आलेला नाही!ते आपले अपयश लपवित आहेत ! तरीही 'नाक कापले तरी छिद्र आहे' हे विधेयक आमचे आहे!असे म्हणत आहेत. काँग्रेसची 'आयत्या बिळावर नागोबा' होण्याची ची'प्रवृत्ती आहे. मोदी सरकारने आणलेल्या महिला विधेयकावर विरोधी पक्ष नाक मुरडत का होईना, संमती देण्याचे मजबूर झाला. हे मोदींच्या मुत्सद्दीपणामुळे विपक्ष विरोधी पक्ष गारद झाला आहे. असेच म्हणणे चुकीचे नाही! या महिला आरक्षणाला विधेयकांनी पाठिंबा देतांना मोदी सरकारला टोमणे मारले प्रश्न निर्माण केले होते !महिला आरक्षण आताच का आणले गेले? ते लगेच लागू केले जात नाही? मग ओ.बी.सी. महिलांना आरक्षण दिले का जात नाही जातीयगणनाची करण्यात यावी मागणी केली. देशात स्वातंत्र्यानंतर १९५१ व २०११ जणगणना झाली, तेंव्हा केंद्रात काँग्रेस सत्तेत होता तेंव्हा जातीय आकडेवारी आकडेवाडी जाहीर केली नाही. थोडा, धीर धरा! मोदी तेही निर्णय घेवू शकतील! विरोधी पक्षाच्या नेत्यांनी या विधेयकावर घटना, कायदेशीर बाजू व्यक्त करण्याऐवजी राजकारण व श्रेय लाटून घेण्याचा निर्लज्जपणा केलाच. देशात १९५२ मध्ये मतदार पुनर्रचना आयोगाची स्थापना केली गेली. या आयोगाला घटनेनुसार अधिकार स्वायतत्ता देण्यात आलेली आहेत. केंद्र सरकारने२००२ मध्ये घटना दुरुस्ती करुन लोकसभा मतदारसंघ संख्येच्या विस्तार २०२६ पर्यंत गोठविला आहे. त्यामुळे लगेचच महिला आरक्षण लागू करण्यात कायदेशीर अडचणी होत्या. त्यामुळे २०२४ च्या निवडणुकीनंतर जणगणना केली जाईल त्यानंतर लोकसभा मतदार संघाचा संख्या विस्तार होईल.महिला आरक्षण २०२९ पासून लागू होईल! त्यावेळी लोकसभेचे सदस्यांचे संख्याबळ ५४३ वरुन ८४८ वर जाणार आहे. महाराष्ट्रात लोकसभेचे संख्याबळ ४८ वरुन ७६ जाईल ! वाढीव संख्यानुसार महिला आरक्षण दिले जाणार आहे. हे सर्व लक्षात घेता, मोदी सरकारने महिला आरक्षणाबाबत घटना दुरुस्ती केली. तेव्हा लोकप्रतिनीधीच्या वेतन व सवलती! भत्ते यावर कोट्यवधीने खर्च होणार आहेत! मोदी सरकारने खासदार व आमदारांचे वेतन निवृत्ती बंद करण्याचा निर्णय घेतला पाहिजे! हे लाड कशासाठी? लोकप्रतिनीधींच्या संख्येला लगाम घातला गेला पाहिजे! ते मतदार संघाची पुनर्रचना आणि मतदार संघ राखीव घोषित करण्याचे अधिकार मतदार संघ पुनर्रचना आयोगाला आहेत. ते केंद्र सरकारला नाहीत. हे कायदेशीरबाब असताना अनपढ नेत्यांनी महिला विधेयकाला 'लॉंलीपाप' नाव ठेवले! समजा !भाजपा सरकारने वायनाड, हैद्राबादचा लोकसभा मतदार संघ महिला राखीव केला तर राजकीय निर्णय म्हणून टीका झाली असती!असा टोमणा शहा यांनी मारला. तेव्हा मतदार संघ राखीव करण्याची प्रक्रिया पारदर्शक असेल, यात शंका नाही. या महिला आरक्षणाच्या विधेयकावर मत मांडताना सर्व विरोधी पक्षाच्या सदस्यांनी केवळ राजकीय भाषणे केली. त्यांनी पक्षाचे गोडवे व नेत्यांचे कौतूक केले. पण राज्यसभेतील सदस्य महेश जेठमलानी यांनी मात्र महिला आरक्षणाबाबत विधेयकावर कायदेशीर बाजू मांडली.महिला आरक्षण देताना, त्या किमान सुशिक्षित तरी असाव्यात, अशी अट ठेवणे, आवश्यक होते! तसेच या महिला आरक्षण विधेयकात एकाच कुटुंबातील पुरूष अथवा महिला या पैकी एकालाच निवडणूक लढविता येतील, असे निर्बंध घातला गेले असते! यातून राजकारणाती घराणेशाहीला चोप बसला असता. पण यावर कोणीही सूचना केली नाही. देशात अनेक राजकीय पक्ष हे परिवारांच्या मालकीचे बनलेले आहेत. हे लोकशाही व्यवस्थेसाठी अत्यंत धोकादायक आहे. देशातील मागील घटनाशततााकाः: पहा ना! बिहारमध्ये लालूप्रसाद प्रसाद यांनी शिक्षा झाल्यानंतर तर अनपढ पत्नी राबडी देवीला मुख्यमंत्रीपदाच्या गादीवर बसविले होते. आज लोकसभेत माता -पूत्र, (सोनिया व राहूल) तसेच लोकसभेत कन्या {सुप्रिया} तर राज्यसभेत वडील (शरद पवार) सदस्य आहेत. राज्यात पिता मुख्यमंत्री व पूत्र (उध्दव -आदित्य) मंत्री होते, मग ही लोकशाहीची थट्टा नाही काय? लोकसभेत आरक्षणाच्या बाजूने ४५४ तर विरोधात २ मते पडली. राज्यसभेत बाजूने २१५ तर विरोधात एकही नाही.लोकसभेत दोन मते विरोधात पडली, ती आय. ए. एम. आय. एम.ची आहेत. या पक्षाचे नेते औवेसी आणि छत्रपती संभाजीनगरचे खासदार इम्तियाज जलील यांनी मुस्लिम महिलांना आरक्षण देण्याची मागणी केली. भारतीय घटनेनुसार धर्माच्या आधारावर आरक्षण देता येत नाही, हे औवेसींना माहित असून त्यांनी अशी मागणी करणे, म्हणजे त्यांनी अखेर 'आपले दात दाखविलेच'. स्वातंत्र्यापूर्वी बॅ. महमद अली जीनांना देशात प्रत्येक क्षेत्रात मुस्लिमांना ५० वाटा हवा होता! पण जीनाला पाकला जावे लागले,पण भारतात ती मानसिकता सोडून गेले. आजही देशातील कट्टर मुस्लिम नेत्यात ही मानसिकता दिसून येतेये. यावर गांधी परिवार बोलणार नाहीत? ते आर.एस.एस. वर मात्र तोंडसुख घेतात! औवेसी व जलील यांनी येत्या निवडणुकीत स्वतः उभे न राहता बुरखाधारी मुस्लिम महिलेला संधी द्यावी. तेव्हा काँग्रेसच्या महिला विधेयकात ओ.बी.सी.चा. उल्लेख नव्हता? तशी घटनेतील तरतूद नाही, यावर विरोधकांचा अभ्यास नाही काय? राहूल गांधीं यांचा मत मांडताना अज्ञानपणा दिसून आला! त्यांनी केंद्रातील ९० सचिव आहेत! त्यात केवळ तीन सदस्य ओ.बी.सी.चे आहेत! ते देश चालवित आहेत, असे म्हणाले. ते हातात काजद घेवून दाखवित होते ? केंद्रीय सचिवांची नियुक्ती करन करिता प्रशासकीय नियमावली आहे, त्यानुसार त्यांची नियुक्ती होते. हे काँग्रेस सरकारपासून चालत आलेले आहे. देश प्रशासन चालवित नसते, लोकप्रतिनिधी व सरकार चालवित असतात! याचे सामान्य ज्ञान गांधींना नसावे ? यात कोणताही नेता येवो! पंतप्रधान मोदी या नेतृत्वाने किमया करन दाखवून महिला आरक्षण विधेयक दोन्ही सभागृहात २/३ मताने संमत करून घेतले आहे. यावेळी ते रात्री उशीरा पर्यंत राज्यसभेत बसलेले होते! यावरुन 'मोदीं हे तो मुमकिन है' पुन्हा एकदा सिध्द झाले आहे! भारतीय संसदीय इतिहासात घटनेची नोंद निश्चितच होईल!







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

माझ्या ओळखीतल्या एका गृहस्थांच्या मुलीचं लग्न ठरलं होतं. त्या लग्नाचं आमंत्रण आणि पत्रिका देण्यासाठी ते अगदी उभ्या उभ्या माझ्या घरी येऊन गेले. त्यांना म्हटलं, ' अहो, दोन मिनिट बसा तरी. ' ते म्हणाले, ' छे छे, बसायला वेळच नाही. या एवढ्या पत्रिका वाटायच्या आहेत. जवळच्या लोकांनाच फक्त देतो आहे. बाहेरगावच्या पाठवून झाल्या. आता काही ठिकाणी जायचं आहे. तेवढं ' उरकून ' घेतो. ' किती अंतर पडलं माणसामाणसांमध्ये ! जवळच्या नातेवाईक आणि मित्रमंडळींनाही जे आमंत्रण प्रेमाने द्यायचं असतं, ते असं ' उरकून ' घ्यावं लागतं. मग ज्यांना आमंत्रण दिलं आहे ती मंडळीही लग्नाला जाताना ' आता आमंत्रण आलंच आहे तर जावं लागेल. संबंध पडतात ना..' या भावनेने जाताना दिसतात. एकंदरीत सगळाच उपचार झाला आहे. याला कारण म्हणजे आपल्यात पडलेलं अंतर. आजकाल ' अंतर ' या शब्दाचा वापर मोठा मजेशीर होताना दिसतो आहे. लोक रांगेत उभे असतील तर एकमेकांमध्ये ' अंतर ' ठेवायला सांगितले जाते. मराठी शब्द ' सामाजिक अंतर ' हा आहे पण त्यापेक्षाही सोशल डिस्टन्स हा इंग्रजी शब्द आपल्या अधिक परिचयाचा झाला आहे.तसेही लोकांमध्ये, समाजात विविध कारणाने ' अंतर ' पडलेच होते. आता करोना आला आणि त्याने माणसामाणसात अजूनच अंतर पाडले. शारीरिक अंतर काही कारणाने भलेही असू द्या पण जेव्हा मनामनात अंतर पडतं, तेव्हा खरंच माणूस माणसापासून दूर जातो. ' अंतर ' या शब्दाला विविध अर्थ आणि छटा आहेत. असमानता, फरक, दूरता हे तर अर्थ आहेतच. पण रहस्य, मत, कसूर, तफावत, मन, हृदय इ अर्थ पण संदर्भानुसार होतात. ' भक्तीचे अंतर अतिगूढ...' यात रहस्य हा अर्थ घेता येतो. आपले अंतर ( मत ) कृपया स्पष्ट करावे. अंतर ( हृदय, मन ) उजळून निघावे. माझ्या सेवेत काही अंतर राहिले असेल तर कृपया क्षमा करावी. या वाक्यात ' अंतर ' या शब्दाचा ' कसूर ' असा होता. तू असं केल्याने असं कितीसं अंतर ( फरक ) पडणार आहे ? जेव्हा एखादी प्रिय व्यक्ती आपल्याला म्हणते, ' मला अंतर तर देणार नाहीस ना ? ' इथं अंतर देणे म्हणजे दूर लोटणे. असे अनेक आणि विविध अर्थ, छटा अंतर या शब्दाला आहेत. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर ' अंतर ' या शब्दाच्या अर्थात, छटांमध्ये बरेच अंतर आहे. माणसाचं ' माणूसपण ' या नव्या युगात हरवून गेलं. औद्योगिक, वैज्ञानिक प्रगती झाली.



## अंतर...



## आनंदी पहाट

## नकारात्मक विचार हेच नैराश्याचे मूळ कारण

आधुनिक केसरी

प्रमाणापेक्षा जास्त विचार करण्याच्या नियमित पद्धतींमुळे चिंता, चिडचिड, पॅनीक अटॅक तसेच कमी भूक, झोपेची अनियमित पद्धत, उच्च रक्तदाब आणि बरेच काही होऊ शकते. जेव्हा स्वतःला समजूतदार ठेवायचे असते तेव्हा भावना महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. काळजी करणे आणि जास्त विचार करणे थांबवण्यासाठी मेंदूला फसवण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. अनाहूत विचार हे नैराश्य, पोस्ट-ट्रॉमॅटिक स्ट्रेस डिसऑर्डर, ऑब्सेसिव्ह कंपल्सिव्ह डिसऑर्डर, बायपोलर डिसऑर्डर, अमली पदार्थांचा वापर डिसऑर्डर आणि अगदी बर्नआउट किंवा तीव्र



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

ताण यासह इतर मानसिक आजारांचेही लक्षणे दिसून येऊ शकतात. मेंदूतील रसायने गोंधळ निर्माण करणे, विस्मरण होणे आणि लक्ष विचलित करणे तसेच मानसिक स्पष्टतेचा अभाव तयार होणे हे या द्वारे दर्शविले जाते.अनेकदा हे सर्व जास्त काम करणे, झोप न लागणे, तणाव आणि संगणकावर जास्त वेळ घालवणे यामुळे देखील होऊ शकते. नकारात्मक विचारांची भिन्नविभिन्न कारणे असतात. अनाहूत नकारात्मक विचार हे ऑब्सेसिव्ह-कंपल्सिव डिसऑर्डर, सामान्यीकृत चिंता विकार किंवा इतर मानसिक आरोग्य स्थितीचे लक्षण असू शकतात. नकारात्मक विचार हे देखील नैराश्याचे लक्षण आहे. अतिविचार हा स्वतःहून निर्माण केला जाणारा केवळ मानसिक विकार नाही. ते सहसा इतर मानसिक आरोग्य स्थितींशी संबंधित असते. नैराश्य, चिंता विकार, आजारपण चिंता विकार, ज्याला काहीवेळा हायपोकॉन्ड्रियासिस किंवा आरोग्य चिंता म्हणतात, आपण गंभीरपणे आजारी आहात किंवा होऊ शकता याची जास्त काळजी करत बसण्याने देखील नैराश्य आणि नकारात्मकता बळावते. त्याबाबतीत तुम्हाला कोणतीही शारीरिक लक्षणे नसतील, अतिविचार हा स्वतःचा मानसिक आजार नसला तरी देखील तो नैराश्य, चिंता, खाण्याचे विकार आणि पदार्थांच्या वापरातील विकार यासारख्या परिस्थितींशी संबंधित असू शकतो.

## आनंद...

आधुनिक केसरी

आनंद कशात सापडतो? कुठे गवसतो ?? शोधला तर सापडतो... कुठेही गवसतो.. मुळात तो हरवलेलाच नसतो. आपल्या जवळच असतो .कोणत्याही छोट्याशा गोष्टीत आनंद मिळतो. तो घेतला तर ......? आयुष्यात नेहमीच सगळं चांगलं घडेलच असं नाही. वर खाली होत राहतं. खाच-खळगे येत राहतात. उन्हाळे-पावसाळे चालू राहतात .आनंदाचही तसंच आहे . कधी आनंद तर कधी दुःख?? दुःखात सुद्धा आनंदी राहता येतं.. ठरवलं तर....!!!! आनंद धरून ठेवायचा असतो. तर दुःखाला लगेच दूर लोटायचं असतं आणि मनात कुठल्याही शंका नको. किंतु परंतु नको. मग दुःखाला पारावर राहत नाही आणि छोट्या छोट्या गोष्टीतून सुद्धा खूप मोठा आनंद मिळत असतो. काचेचा ग्लास हातातून पडला....पडू द्या.., फुटला.. तर फुटू द्या. सावकाश काचा वेचून नीट विल्हेवाट लावा. त्या ग्लासचं दुःख करत बसू नका. नाहीतर दुःखातच त्या काचा वेचताना एखादी काच हाताला लागेल..., रक्त सांडेल...., आणखी वेदना होतील. हाताला व मनालाही. ज्या हातातून ग्लास पडला, तोच हात रक्तबंबाळ होईल. त्यापेक्षा तो फुटणारच होता. त्याचं आयुष्य संपलं होतं. पडण्याचे निमित्त झालं . असं समजून आनंदाने काचा वेचून घ्या. एकेक काच अलगद वेचताना हळुवारपणे मनावरचं दडपण कमी होत जातं. यावरून असे लक्षात घ्यायचं की आपलं आयुष्य, आपला संसार, आपलं नातं हे ही एक काचेचा ग्लास आहे. ते खूप हळुवार जपलं पाहिजे. फुटलं तर पुन्हा जोडणे अवघड असतं. म्हणून सारं काही आनंदाने करूया. नेहमी आनंदात राहू या.गगना एवढा आनंद नाही मिळाला तरी जीवन जगण्यासाठी आवश्यक तेवढे आनंदी मात्र नेहमीच राहूया......

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग.17

## अंधांची संख्या

आधुनिक केसरी

एक दिवस, अकबरने बिरबलला विचारले - ‘ बिरबल, पूर्ण विश्वात कोणाची संख्या अधिक आहे, जे लोक बघु शकतात त्यांची की जे अंध आहेत त्यांची?’ बिरबल बोलला, ‘महाराज! यावेळेला आपल्या प्रश्नाचे उत्तर देणे मला शक्य नाही परंतु मला पूर्ण विश्वास आहे की, विश्वात बघु शकणाऱ्यांपेक्षा अंधाची संख्या अधिक असेल.’ अकबरने बिरबलला सांगितले, ‘तुला तुझे म्हणणे सिध्द करावे लागेल. बिरबलने हसत हसत अकबरचे आव्हान स्वीकारले. दुसऱ्या दिवशी, बिरबल बाजाराच्या मधोमध एक न विणलेली लाकडी खाट घेऊन बसला आणि ती विणायला सुरूवात केली. आजूबाजूला दोन माणसं कागद व पेन घेऊन बसली होती. इथे काय होत आहे ते बघण्यासाठी थोडया वेळात तिथे गर्दी जमु लागली. तिथे उपस्थितीत असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने बिरबलला एक प्रश्न विचारला, ‘बिरबल तुम्ही हे काय करत आहात?’ बिरबलच्या दोन्ही बाजूला बसलेले माणसं असा प्रश्न विचारणाऱ्यांचे नाव विचारून ते लिहित होते. जेव्हा अकबरला ही गोष्ट समजली की बिरबल भर रस्त्यात खाट विणत आहे, तेव्हा लगेच अकबरही तिथे पोचला व त्यानेही तोच प्रश्न विचारला - हे तू काय करत आहेस? अकबरच्या प्रश्नाचे काहीही उत्तर न देता बिरबलने आपल्या बाजूला बसलेल्या एकाला बाहशहा अकबरचे नाव लिहिण्यास सांगितले. तेव्हा अकबरने त्या माणसाच्या हातातील कागदाचा गठ्ठा घेतला. त्यावर लिहिलेले होते - ‘अंध लोकांची यादी.’ अकबरने बिरबलला विचारले, ‘या यादीत माझे नाव का लिहिले आहे?’ बिरबल बोलला, ‘महाराज! आपण बघितले की मी खाट विणत आहे, तरीपण तुम्ही मला प्रश्न केला की - मी काय करत आहे?’ अकबरने बघितले की बघु शकणाऱ्या लोकांच्या यादीत एकही नाव नव्हते, याउलट अंध लोकांची यादी पूर्ण भरलेली होती. बिरबल बोलला, ‘महाराज! आता तर तुम्ही माझ्या बोलण्याशी सहमत असाल की विश्वात अंधांची संख्या जास्त आहे.’ बिरबलच्या या चतुराईवर अकबरने स्मितहास्य केले.



## निरुपण

आधुनिक केसरी

पुष्पं हृत्कल्पितं दुर्गे गृहाण प्रार्थये शिवे |
धर्मकामार्थसिद्ध्यर्थं दुर्गां देवीं नमाम्यहम्
|| ९४ || हे शिवे, हे दुर्गे, हृदयात संकल्पित असे हे पुष्प तू स्वीकार कर. धर्म, काम, अर्थ यांच्या सिद्धीसाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

शुद्ध बुद्ध निर्बन्ध है, यहाँ वहाँ सब ठाम ।
अद् भुत महिमा ताहि की, कौन पुरुष कहु नाम ।।२३।।(स्वर्वेद प्रथम मण्डल नवम अध्याय) ०१/०९/२३

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
जो शुद्ध-बुद्ध आणि समस्त बंधनरहित आहे. जो सृष्टी-मुक्ति सर्व स्थानी राहातो, ज्याची आश्चर्यमय अलौकिक महिमा आहे, तो पुरुष कोण आहे ?त्याचे नाव सांगावे.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

## स्वामी विवेकानंद

आधुनिक केसरी

युवाशक्ती ही कोणत्याही काळात देशातील सामाजिक, राजकीय, आर्थिक, देशहिताचा क्रांती घडवून आणते. हे आजपर्यंतच्या युवाशक्ती द्वारा सिध्द झाले आहे. भाताला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी युवा शक्ती प्रेरक ठरली हे विसरून चालणार नाही. भगतसिंग, सुखदेव, राजगुरू, सुभाषचंद्र बोस, चंद्रशेखर आझाद, स्वातंत्र्यवीर लोकमान्य टिळक, आगरकर, ज्यांच्या पहाडी नेतृत्वामुळे ब्रिटिश ही अचंबित झाले ते विनायक दामोदर सावरकर आंबेडकरांची चौफेर वाचन करून संविधान रचना केली तीही युवावस्थेतचं. स्वामी विवेकानंदांचे अनमोल विचार काळानुरूप किती महत्वाचा आहे. हे समजणे आजच्या युवकांना देशभक्ती व देशसेवा किती गरजेची आहे हे लक्षात रहाणे यासाठी विश्वबंधुत्व दिवसांची' आठवण होणे महत्वाचे आहे.कारण भौतिक चंगळवाद वाढीला लागला आहे. शत्रुराष्ट्र आपली वक्रदृष्टी सतत ठेऊन बसलेला आहे आणि हे आजच्या युवकांनी लक्षात ठेवणे गरजेचे आहे. यासाठी स्वामी विवेकानंदांचे विचार १३० वर्षांनंतर ही किती महत्त्वाचे आहेत हे लक्षात येते. शिकागो येथील सर्वधर्म परिषदेत आपल्या भाषणाची सुरुवात, *बंधू आणि भगिनींनो* अशी केली.विश्वधर्माची कल्पना मांडून ते थांबले नाहीत तर, वसुधैव कुटूंबकम् हा संदेश उपस्थित समुदाया समोर मांडून विश्वधर्माची संकल्पना किती उदात्त आहे हे पटवून दिले. आजची युवा पिढी तर महिती व तंत्रज्ञान क्षेत्रामुळे सर्वच क्षेत्रात पारंगत आहे.त्यांच्या कार्याच्या क्षमता वाढत अजूनही उंच उंच भरारी घेऊन भारतमातेचे नाव उज्वल करतील यात शंका नाही. शिकागो येथील सर्वधर्म परिषदेच्या ऐतिहासिक भाषणाला १३० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल विश्वबंधुत्वाची ओळख नव्या पिढीला होऊन, देशभक्ती आणि देशाप्रति प्रेम ,आदर आपण सर्वांनी अंगीकरले तर ती खरी राष्ट्रभक्ती ठरेल. त्यासाठी गरज आहे खेड्यापाड्यात व शहरात युवकांनी पुढाकार घेतला तर आपला व समाजाचा उद्धार झाल्याशिवाय रहाणार नाही. पण त्यासाठी गरज आहे सामाजिक बांधिलकीची.यासाठी युवकांनी थोर महात्म्याची चरित्रे वाचली पाहिजेत आपल्या आचरणात आणली पाहिजेत.






सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# प्रपंच जरुरीपुरताच करावा

आधुनिक केसरी

पुष्कळ लोक जोडधंदा करतात; म्हणजे, त्यांचा एक मुख्य धंदा असतो, आणि त्याला मदत म्हणून दुसरा धंदा करतात. त्यांचे सर्व लक्ष मुख्य धंद्याकडे केंद्रित झालेले असते. म्हणजे, जोडधंद्यामुळे जर मुख्य धंद्यात व्यत्यय येऊ लागला तर तो जोडधंदा जरुरीप्रमाणे बंदही करतात किंवा नफा-नुकसानीचा प्रसंग आला तर जोडधंद्यातल्या नफा-नुकसानीकडे विशेष आस्थेने पाहात नाहीत. प्रत्येक माणसाने परमार्थ हा मुख्य धंदा ठेवून, प्रपंच हा जोडधंदा म्हणून करावा; म्हणजेच प्रपंचात होणाऱ्या लाभहानीचा परिणाम भगवंताच्या अनुसंधानावर होऊ देऊ नये. परमार्थाच्या आड प्रपंच न येईल अशा युक्तीने वागावे. भाजीला जसे मीठ लागते तसा परमार्थाला प्रपंच लागतो. मीठ नसेल तर भाजी आळणी लागते, पण मीठ जास्त झाले तर भाजी खाववत नाही. त्याचप्रमाणे प्रपंच आणि परमार्थ यांचा संबंध आहे. काही लोकांना सवयीने मीठ जास्त लागते, तसे ज्यांना प्रपंचाची सवय झाली आहे, त्यांना



तो जास्त लागतो. त्यांची गोष्ट निराळी, पण ज्यांना प्रपंच नवीन सुरू करायचा आहे, त्यांनी तरी तो बेतानेच करावा. भगवंत डोळ्यांपुढे ठेवून वागावे. प्रपंचात व्यवहार जतन करावा खरा, पण प्रपंच हाच काही सर्वस्व नव्हे. भगवंताचा विसर हा कोणत्याही कारणाने झाला तरी तो बरा नाही; मग प्रपंचात सुखसोयी असल्यामुळे तो होवो किंवा प्रपंचात दुःख झाल्यामुळे होवो. प्रत्येकाला प्रपंचाची अत्यंत जरुरी आहे; पण आपण त्याला वाजवीपेक्षा जास्त महत्त्व देतो, आणि त्यामुळे सर्व बिघडते. प्रपंच पाहिजे आणि दुःख नको असे म्हणणे वेडेपणाचे आहे. मूल असेल तर ते कधी तरी आजारी पडायचेच. प्रपंच हा कुणाला सुटला आहे ? हा प्रपंच, हा संसार भगवंतानेच उत्पन्न केला आहे तर तो कुणाला तरी सुटेल का ? तसा नुसता प्रपंच तापदायक नाही, तर आकुंचित प्रपंच हा तापदायक आहे. ज्याप्रमाणे आपण आपल्या या खिशातले पैसे त्या खिशामध्ये ठेवतो, त्याचप्रमाणे प्रपंचातले आपले मन काढून भगवंताकडे लावावे; तसे करण्यात समाधान आहे. नवरा-बायकोचे ध्येय एकच असेल तर त्यांचा प्रपंच सुखाचा होतो. जो मनुष्य हौसेने प्रपंच करील, त्याला तो करायला चोवीस तासही पुरणार नाहीत; पण जो जरुरीपुरता प्रपंच करील, त्याला तीन-चार तास पुरतील. प्रपंचामध्ये कर्तव्याला चुकू नये, पण त्यामध्ये आसक्तीने गुंतून राहू नये. आपले व्यवहाराचे कर्तव्य मनापासून केल्यानंतर त्याचे फळ रामाकडे सोपवावे. रामाचे नाव शक्य तितके घेऊन, आपले मन त्याच्या ठिकाणी चिकटावे यासाठी त्याची मनापासून प्रार्थना करावी. **आजचे बोधवचन आहे** - प्रपंच हा मोडक्या वस्तू नीट करण्याचा कारखाना आहे. तिथे मोडक्या वस्तू जितक्या जास्त असतील तितकी शिकणाऱ्याला संधी जास्त असते.

रविवार, २४ सप्टेंबर २०२३
किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - ५३
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 24 SEPT. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-03 • ISSUE-53 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-16 • PRICE-5

# उपराजधानीत पावसाचा हाहाकार

## ६० वर्षांनंतर आज सर्वाधिक नोंद; जनजीवन विस्कळित

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर : शुक्रवारी मध्य रात्रीपासून तर शनिवारी सकाळपर्यंत उपराजधानीत ढगफुटीसदृश्य पावसाने हाहाकार माजवला. शहरात अवघ्या दोन तासांत ९० मिलीमीटर, तर अवघ्या १२ तासांत तब्बल १५९.६ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. यापूर्वी नागपुरात सप्टेंबर महिन्यात १९६२ साली २४ तासांत सर्वाधिक १८४.४ मिलीमीटर पावसाची नोंद झाली होती. तब्बल ६० वर्षांनंतर आज सर्वाधिक नोंद झाली आहे. यावर्षीही संपूर्ण पावसाळ्यात २४ तासांत झालेली ही सर्वाधिक नोंद ठरली.**

रामदासपेठ, धंतोली, पंचशील चौक, सीताबर्डी या भागात पूरसदृश्य स्थिती झाली होती. लोकांची घरे, दुकान, प्रतिष्ठानामध्ये पाणी शिरले व कोट्यवधीचे नुकसान झाले. या भागात रुग्णालयांची संख्या अधिक आहे. पहिल्या माळ्यापर्यंत पाणी शिरल्याने अनेक नागरिकांना बोटींद्वारे सुरक्षित स्थळी हलविण्यात आले. उच्चभ्रू म्हणून मानल्या जाणाऱ्या या वस्त्यांमध्ये अनेक वर्षांनंतर पहिल्यांदाच नागरिकांनी ही स्थिती अनुभवली. गेल्या वर्षी १३ सप्टेंबरला २४ तासांत सर्वाधिक १२७.४ मिलीमीटर पाऊस झाला होता. विशेष म्हणजे अनेक वर्षांत सप्टेंबरमध्ये झालेल्या मासिक पावसापेक्षा अधिक पाऊस आज २४ तासांत झाला आहे.



**नाग नदीच्या किनाऱ्यावरील घरांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी शिरले**
नाग नदीच्या किनाऱ्यावर असलेल्या घरांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी शिरलं. आंबाजरी ले आऊट, वर्मा ले आऊट, कार्पोरेशन कॉलनी, शंकरनगरपासून पूर्व नागपूर, दक्षिण नागपूर आणि नंदनवनपर्यंत नाग नदीच्या दोन्ही बाजूला पाणी शिरलं. तळ मजल्यात तर पाणी शिरलंच, पण अनेकांच्या पहिल्या मजल्यापर्यंत पाणी आले,

**एनडीआरएफ, एसडीआरएफ आणि सैन्याच्या मिळून ६ टीम तैनात**"
नागपूरचं मुख्य बसस्थानक असलेल्या मोरभवन येथे तर बसमध्ये पाणी शिरलं. त्या ठिकाणी प्रशासन तत्काळ कार्यरत झालं. नागपूरचे महापालिका आयुक्त, नागपूर जिल्हाधिकारी आणि संपूर्ण प्रशासकीय टीम तेथे कार्यरत होती. तत्काळ दोन एनडीआरएफच्या टीम, दोन एसडीआरएफच्या टीम आणि दोन सैन्याच्या टीम अशा ६ टीम तैनात करण्यात आल्या.

**दुर्दैवाने एका आजींचा मृत्यू** : जवळपास ४०० नागरिकांना पाण्यातून बाहेर काढण्यात आलं आहे. त्यांच्यासाठी तात्पुरत्या स्वरुपाची व्यवस्थाही करण्यात आली आहे. त्यांच्या जेवणाचीही सोय करण्यात आली आहे. आता पाणी हळूहळू ओसरत आहे. मात्र, अद्यापही बऱ्याच भागांमध्ये पाणी पाहायला मिळत आहे. यात दुर्दैवाने एका आजींचा मृत्यू झाला आहे.

**एकूण १४ जनावरांचा मृत्यू झाला** : शाळा महाविद्यालयांना सुट्टी देण्यात आली आहे. प्रशासन पूर्णपणे जागरूक आहे. पाहणी करून पंचनामे करणं, तात्पुरती मदत असं काम सुरू आहे. याशिवाय एकूण १४ जनावरांचा मृत्यू झाला आहे. लोकांना आमचं एकच आवाहन असणार आहे की, कुणीही अफवांवर विश्वास ठेऊ नये. प्रशासन पूर्णपणे जागरूक आहे. कुठलीही अडचण असेल तर त्यांनी प्रशासनाशी संपर्क साधावा.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, "नागपूरमध्ये जवळपास ४ तासांमध्ये १०९ मिलीमीटर एवढा प्रचंड पाऊस झाला. त्यातील ९० मिलीलीटर पाऊस केवळ दोन तासात झाला आहे. त्यामुळे पावसाची प्रचंड तीव्रता पाहायला मिळाली. यामुळे आंबाजरी तलाव भरून पाणी वाहिलं. हे अतिरिक्त पाणी नाग नदीतून वाहतं. त्यामुळे नाग नदीला मोठ्या प्रमाणात पूर झाल्याची स्थिती निर्माण झाली."

# जिंतूर खूनप्रकरणी तीन आरोपी ताब्यात

## १२ तासांच्या आत गुन्ह्याची उकल

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** येथील बसस्थानक परिसरात गुरुवारी सकाळी दहाच्या सुमारास एका अनोळखी इसमाचा मृतदेह आढळला होता. शहरातील बसस्थानक परिसरात, असलेल्या काटेरी झुडपात, एका अनोळखी इसमाचा मृतदेह सापडला होता. याची माहिती मिळताच घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी पांडुरंग गोफणे, प्रशिक्षणार्थी उपविभागीय पोलीस अधिकारी प्राची कर्णे, पोलीस निरीक्षक अनिरुद्ध काकडे यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेत पाहणी करून पंचनामा केला. सदर मृतदेह हा दगडाने ठेचलेल्या अवस्थेत असल्याने तो खून असल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत होता. पोलिसांनी मृतदेह घेऊन मृतदेहाची ओळख पटविण्याचे काम सुरू केले. पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली असता हा मृतदेह महेंद्र यशवंत सावंत रा. वाघजाई वाडी ता.पाटण जि. सातारा यांचा असल्याचे समजले. या प्रकरणी पोलिसांकडून मयताचा भाऊ मच्छिंद्र यशवंत सावंत याला सदरचे फोटो पाठवून खात्री करण्यात आली. तसेच सदरचा माहित हा मे महिन्यात विटा जिल्हा सातारा येथे कामासाठी जातो म्हणून घरातून निघून गेला होता. तेव्हापासून त्याचा संपर्क झाला नाही अशी माहिती त्याच्याकडून मिळाली. त्यावरून तांत्रिक माहितीच्या व गोपनीय माहितीच्या आधारे, मयत हा दिनांक २० सप्टेंबर रोजी सायंकाळी सहा ते साडेसहा वाजण्याच्या सुमारास पायी चालत बस स्थानक समोरील झुडपाच्या दिशेने गेला असल्याची तसेच थोड्यावेळाने तीन संशयित इसम त्याच दिशेने गेल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यावरून अधिक माहिती घेतली असता नमूद तीन संशयित इसमांनी यातील मयतास मारले असल्याचा संशय गोपनीय बातमीदार मार्फत माहिती घेतली असता, संशयित आरोपी,भारत आसाराम पहारे वय 28 वर्षे, रा. नामदेव नगर जिंतूर, राजेश पांडुरंग शिंदे वय तीस वर्षे रा. संभाजीनगर जिंतूरशेख मुसेफ शेख मोहसीन वय 21 वर्षे रा. नामदेव नगर जिंतूर असे असल्याची माहिती मिळाल्याने मोठ्या शिताफिने सापळा लावून, अवघ्या बारा तासात त्यांना ताब्यात घेतले. त्यांनी मता जवळील पैसे काढून घेण्याकरता त्यास मारले असल्याची कबुली दिली. सदर कारवाई स्थानिक गुन्हे शाखा परभणी व जिंतूर पोलीस ठाण्यातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी केली आहे.


# एकच ध्यास, मतदारसंघाचा सर्वांगीण विकास :आ. अमित झनक यांचा झंझावात

आधुनिक केसरी


वसंत खडसे
9373578429

रिसोड मालेगाव विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यतत्पर युवा आमदार अमित सुभाषराव झनक यांनी आपल्या मतदारसंघात विविध विकासात्मक कामांचे लोकार्पण, भूमिपूजन करून रिसोड, मालेगावमधे विकास पर्वाचा झंजावात सुरू केला असल्याचे, सर्वसामान्य जनतेच्या मुखातून ऐकावयास मिळत आहे. आमदार झनक यांनी जिल्हा वार्षिक योजना, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरीवस्ती सुधार योजना, वैशिष्ट्यपूर्ण विशेष अनुदान योजना, विशेष रस्ता अनुदान आदी विविध योजनांच्या माध्यमातून रिसोड आणि मालेगाव या दोन शहरात तब्बल १५ कोटी ६४ लाख रुपयाच्या निधीतून नुकतेच विविध कामांचे भूमिपूजन केले आहे. तद्वतच, याच्या कैकपट मतदार संघातील ग्रामीण भागाच्या विकासासाठी निधी उपलब्ध झाला असून, लवकरच त्या कामांना प्रत्यक्षात सुरुवात होणार आहे. आमदार अमित झनक यांनी कर्तव्यनिष्ठा आणि वचनपूर्तीच्या बळावर सर्वसामान्य जनतेच्या ह्रदयात मिळवलेले स्थान. याबाबत, आधुनिक केसरीने घेतलेला हा संक्षिप्त आढावा येथे प्रस्तुत करीत आहोत.

महाराष्ट्र राज्याचे माजी कॅबिनेट मंत्री तथा लोकनेते, स्व. सुभाषरावजी झनक साहेब यांनी आपली उभी हयात मतदार संघाच्या विकासासाठी खर्ची घातली आहे. हे परम सत्य केवळ मतदार संघातील मतदारच नव्हे; तर त्यांचे राजकीय विरोधक सुद्धा मान्य करतात. आणि करावेच लागते..! कारण सत्य " वास्तव " हे कधीच अफवांच्या चादरीखाली झाकल्या जात नाही. हे सुज्ञ विरोधकांना सुद्धा चांगलेच अवगत आहे. मात्र, स्वर्गीय सुभाषराव झनक यांच्यावर काळाने अचानक घाला घातला आणि त्यांची




अनेक स्वप्ने अपुरे राहिले. नवनिर्वाचित रिसोड, मालेगाव मतदारसंघाचा सर्वांगीण विकास हे त्यांचं अपूर्ण राहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांचे सुपुत्र विद्यमान युवा आमदार अमित सुभाषराव झनक यांनी राजकारणात प्रवेश घेतला आहे. जनताजनार्दनाच्या आशीर्वादाने विजयाची हॅट्रिक सुद्धा त्यांनी साधली आहे. वडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी, त्यांनी आता "एकच ध्यास, मतदारसंघाचा सर्वांगीण विकास..!" हे ध्येय समोर ठेवून विकासात्मक कामांचा धुमधडाका सुरू केला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने मालेगाव येथे माजी जिल्हापरिषद अध्यक्ष दिलीपराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली व नगरसेवक आणि पंचायत समिती सभापती तसेच मालेगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती आणि संचालक मंडळ आदींच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील प्रतिष्ठित नागरिक व तरुण बांधवांच्या साक्षीने कोट्यावधी रुपयांच्या कामांचे लोकार्पण व भूमिपूजन केले आहे. तर रिसोड शहरात जिल्ह्याचे आराध्य दैवत असलेले संत अमरदास बाबा संस्थांला आमदार निधीतून २५ लक्ष रुपयाच्या सभा मंडपाचे भूमिपूजन करून शहरातील भूमिपूजन सोहळ्याचा शुभारंभ केला आहे. यावेळी संस्थानचे विश्वस्त तथा अजंता फार्मा लिमिटेड मुंबईचे अध्यक्ष मन्नालालजी अग्रवाल, मधुसूदनजी अग्रवाल, उत्तमचंदजी बगडिया, मदनशेठ बगडिया, डॉ. सुभाष बबेरवाल, ओम बाबा अग्रवाल, रिसोड बाजार समितीचे सभापती, संचालक मंडळ व बहुसंख्य कॉंग्रेसचे



रिसोड शहरातील संत अमरदास बाबा संस्थानच्या सभामंडप भूमिपूजन कार्यक्रम प्रसंगी बोलतांना संस्थानचे विश्वस्त तथा अजंता फार्मा मुंबईचे शेठ मधुसूदनजी अग्रवाल यांनी आ. अमित झनक यांचे आजोबा स्व. आ. रामरावजी झनक आणि वडील माजी मंत्री लोकनेते स्व. सुभाषरावजी झनक यांची अगत्याने आठवण काढून झनक घराण्याच्या सेवाभावी वृत्तीला उजाळा दिला. आणि विद्यमान आमदार अमित झनक यांना विजयाचा चौकार साजरा करण्यासाठी संत अमरदास बाबा यांच्या साक्षीने शुभेच्छा दिल्या. हे विशेष..!

पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. तसेच रिसोड शहरातील अष्टविनायक नगर, शिवाजी वसाहत येथे सुद्धा मंदिरांच्या सभा मंडपाचे भूमिपूजन करण्यात आले आहे. एकता नगर येथे शहरातील विविध कामांसाठी तब्बल ३ कोटी ७७ लाख रुपयांच्या कामांचा भूमिपूजन व लोकार्पण सोहळा पार पडला आहे. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शहरातील ज्येष्ठ नेते मा. भगवानदादा क्षीरसागर हे होते. तर नगरसेवक, बाजार समितीचे संचालक मंडळ, पंचायत समितीचे सदस्य, तसेच शहरातील ज्येष्ठ नागरिक व तरुण मंडळी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आमदार अमित झनक म्हणाले की, रिसोड मालेगाव मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करणे ही माझी नैतिक जबाबदारी आहे. मतदारसंघातील सामान्य माणूस केंद्रबिंदू मानून त्या दृष्टीने सर्वांगीण विकास कसा साधता येईल यावर माझा विशेष भर राहणार आहे. त्यासाठी मतदारसंघातील प्रत्येक गावाचा विकास झाला पाहिजे. पाणी, आरोग्य सुविधा आणि अन्य पायाभूत सुविधा पुरविणे याला प्राधान्य देणार आहे. बेरोजगार तरुणांना रोजगार मिळावा यासाठी आपण औद्योगिक वसाहतीचा मुद्दा अधिवेशनात उपस्थित केला होता. आणि तो तडीस जाईपर्यंत माझा पाठपुरावा सुरूच राहील..! असे देखील आमदार झनक यांनी यावेळी ठणकावून सांगितले आहे. बाबांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी पक्षाने टाकलेली जबाबदारी मी स्वीकारली आहे.परिणामी एक जबाबदार लोकप्रतिनिधी या नात्याने सतत कामात व्यस्त राहण्याला माझे प्राधान्य असते. त्यामुळे कोण काय अफवा पसरविते आणि लोकांची कोण दिशाभूल करते अशा फालतू गोष्टीकडे लक्ष देण्यात मला स्वारस्य नाही. माझा एकच ध्यास आहे. तो म्हणजे, " मतदार संघाचा सर्वांगीण विकास " हीच माझी भूमिका आहे..! तुमच्या सर्वांच्या आशीर्वादाने रिसोड मालेगाव मतदारसंघाची छाप संपूर्ण महाराष्ट्रात पडली आहे हेच आपल्यासाठी खूप विशेष असल्याचे देखील आ. झनक म्हणाले.

# इराणविरुद्ध त्रिकुटांचे निर्बंध : अर्थ आणि अन्वयार्थ



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी


**ब्रिटन, फ्रान्स आिण जर्मनी या युरोपातील तीन महा सत्तांनी म्हणजे त्रिकुटांनी इराण विरुद्धचे निर्बंध कायम ठेवले परंतु अमेरिकेने वेगळी चूल मांडली. निर्बंध सैल केले आिण ठेवीही खुल्या केल्या. या प्रकारच्या अंतर्गत ताण तणावाचे जगाच्या शांततेवर विपरीत परिणाम होऊ शकतात त्याबाबतचा हा वेधक मागोवा. पुढील महिण्यात संपणारे इराण विरूद्धचे निर्बंध युरोपमधील ब्रिटन, फ्रान्स व जर्मनी या तीन राष्ट्रांच्या ई-3 समुहाने येत्या आक्टोबर महिण्यात संपणारे निर्बंध पुढील कालावधीसाठी लाबविले आहे. इराणच्या अण्विक शस्त्र-अस्त्र निर्मिती प्रकल्पाच्या विरोधात या समुहाने घेतलेला हा निर्णय धक्कादायक असून जगातील शांतता व सहजीवनामध्ये तणाव वाढविणारा आहे. इराणचे अंतर खंडीय क्षेपणास्त्र निर्मिती प्रकल्प (आय सी बी एम) अनिर्बंध पणे चालू आहेत. त्यामुळे इराणवर असलेले या समुहाचे सँगक्शन (कडक नियम) कायम ठेवण्याचा निर्णय एका शिखर परिषदेत घेण्यात आलेला आहे. माजरांच्या गळ्यात घंटा कोण बांधणार, अशी एक म्हण आहे. परंतु इरोपातील या तीन राष्ट्रांनी हे धाडस केले आहे. खरे तर हे निर्बंध लाबविण्याची गरज होती काय असा प्रश्न विचारला जात आहे.**

परंतु या तीनही देशांचे असे एकमत झाले की, हे ठाम पाऊल इराणच्या अरेरावी प्रवृत्तीला थेट प्रत्युत्तर म्हणून टाकले आहे. यावर इराणने अशी प्रतिक्रिया दिला आहे की, त्रिकुंटाचा हा निर्णय बेकायदेशिर व प्रक्षोभत असून अन्याय कारक असल्यामुळे इराणने तो नाकारला आहे.

इराण या निर्णयाला चोख उत्तर देईल, योग्य प्रतिसाद देईल असे, मत इराणच्या संरक्षण मंत्रालयाने नोदविले आहे. **त्रिकुट राष्ट्रांची भूमिका :** या संदर्भात इंग्लंड, फ्रान्स आणि जर्मनी या तीन राष्ट्रांनी इराण विरूद्ध ठाम व स्पष्ट भूमिका घेतली आहे. त्यांचे असे मत आहे कि, इराण या निर्बंधापासू शहाणा होत नाही. मागिल चुका पासून धडे घेण्याऐवजी इराण कुंडायी करत आहे. आणि आपले अनुप्रकल्प दामटून पुढे चालवित आहे. आपलेच म्हणणे खरे करण्याची इराणची प्रवृत्ती आहे. आजवर लादलेल्या निर्बंधामुळे इराण थोडासाही शहाणा झालेला नाही, या उलट क्षेपणास्त्र डागण्याचे त्याचे प्रकल्प तसेच चालू आहेत, त्यामुळे इराणवरील निर्बंध पुढेही कायम ठेवण्याचा निर्णय या तीनही प्रमुख युरोपीयन देशांनी घेतला आहे. त्यापैकी इंग्लडचे साम्राज्य एवढे पसरले होते की त्यांचा सूर्य कुठेही मावळत नव्हता पण त्याला आता भारताने मागे टाकले आहे.

2015 साली इराण देश आणि युरोपातील जागतिक महासत्ता यांच्या दरम्यान 1 करार करण्यात आला होता या करारातील वेळापत्राकानुसार ठाम उपाय योजना करण्यात आली होती आणि इराणवर लादलेले हे निर्बंध अनेक कडक अटीनी युक्त होते. आता ते या त्रिकुट देशांनी पुनश्च वाढविले आहेत. या निर्णयाचा अर्थात युरोपीय संघाचा पाठिंबा आहे कारण इराणने युक्रेन युद्धात रशियाच्या बाजूने पाऊले टाकून युरोपिया संघाचे शत्रुत्व विकत घेतले आहे. युक्रेन युद्धात रशियाचे समपर्ण करून त्याला लष्करी मदतही केली आहे. त्यामुळे हा तीन राष्ट्रांचा समुह इराण विरोधात अधिक अक्रमक झाला आहे. याचे जगावर काय परिणम होतील हे समजावून घेतले पाहिजे. **अमेरिकेची वेगळी चूल :** अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल ट्रंम्प यांनी इराण बरोबर हात मिळवणी करून कैदी स्वॅप कराराचा बचाव केला. पुढे बिबेन प्रशासने इराण मालमत्ता मध्ये 6 अब्ज डॉलर ची मालमत्ता अस्तातंरण करण्याचा मार्ग मोकळा केला. थोडक्यात काय तर प्रे. डोनाल ट्रंम्प यांनी जी कोलांट उडी मारली त्याला अनुसरून बिडेन प्रशासनाने सुद्धा तशीच पाऊले टाकली. बिडेन व ट्रंम्प यांच्या परराष्ट्र धोरणातील संगिताचा सुरू इराणच्या बाजूने राहिला असे म्हणावे लागेल. अमेरिकेने ही भूमिका का घेतली याचे विश्लेषण केले असता, असे दिसते कि समुदायापेक्षा अमेरिकेने नेहमी स्वतःच्या हितावर भर दिला आहे. आणि ते ट्रंम्प यांच्या "अमेरिका कर्ष्ट" या धोरणाला अनुसरून होते. इराण विरूद्ध बंदने कायम ठेवण्याचा त्रिकुट राष्ट्रानी घेतलेला निर्णय हा त्यांच्या संरद्वक्षणाच्या दृष्टीने महत्वाचा आहे. हे देश इराण विरूद्ध का बिथरले, हे ही लक्षात घेतले पाहिजे. ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी या देशांनी इराणवर बंधने लादण्याचा जो निर्णय घेतला आहे तो त्यांच्या दृष्टीने त्यांना समर्थक वाटतो त्याची तीन कारणे आहेत. इराण लबाड आहे व तो स्वार्थी पणाने वागत आहे असे या तीन देशांना वाटते. पुर्वीचा सामुदायिक करारात इराण पायदळी तुडवित आहे. इराणला धडा दिला नाही तर तो अधिक मुजोर होईल आणि युरोपीयन संघाविरूद्ध कारवाई करू लागेली. युक्रेनच्या युद्धात इराण रशियाकडे झुकत आहे व युरोप विरोधी कारवाया करत आहेत.

या तीन कारणामुळे इराण विरोधात भक्कम निर्बंध लादून त्याची मुस्कटदाबी करण्याचा निर्णय या तीन देशांनी घेतला आहे. **इराण का बिथरला ? :** इराणने अनुधोरणाबाबत आजवर असंयमी व अविवेकी धरसोड पणाची भूमिका घेतली आपले अनुप्रकल्प चालू ठेवले. अमेरिकेने निर्बंध उठवल्यानंतर आणि इराण त्रिकुटाकरून काही भरपाईची अपेक्षा करेल असे इराणचे परराष्ट्र मंत्री महम्मद जावेद झरीफ म्हणतात. डोनाल्ट ट्रंम्प यांनी अनुकरारापूर्वी इराणवर घातलेले 800 निर्बंन पुन्हा लादले, आणि 800 नविन निर्बंध लादले त्यामुळे इराणची कोंडी झाली असे त्याला वाटते. इराणचे 1 ट्रिलयन डॉलरचे नुकसान झाले असे इराणचे म्हणने आहे. इराणना असे वाटते की 2015 च्या अनुकराराबाबत पुर्नबांधनी करण्यासाठी झालेल्या नुकसानिबाबत वाटाघाटी करून चर्चा करावी. इराणने अमेरिकेला चर्चेची ऑफर दिली आहे. "खामेणी म्हणतात इराण अनुकरारावर केवळ कृतीस्वीकारेल चर्चा नाही" 2015 च्या अनुकरारातील अनुकरार वाढविण्यासाठी त्रिकुटाच्या निर्णयाला युरोपिय संघाने संमत्ती दिली आहे. इराणने कराराचे पूर्ण पालन करावे असे त्रिकुटांनी अव्हान केले आहे. या उलट इराण असे म्हणतो कि, हा करार अन्याय कारक आहे. जेव्हा आम्ही प्रत्यक्ष भेटू तेंव्हा भरपाईचा विचार करू इराणला आपले झालेले नुकसान भरूण मिळावे असे वाटते. ट्रंम्प यांनी 2018 साली कराराचा त्याग करण्याचे नाटक केले परंतु त्यांनी कठोर सर्व समावेशक निर्बंध हे आपले लक्ष आल्याचे सांगितले. अनुकराराच्या अमंलबजावाणीचा आग्रह त्रिकुट राष्ट्रे जाणिव पूर्वक धरतात. चीन आणि रशिया निर्बंधाच्या काळात इराणचे मित्र होते. परंतु जर्मनी फ्रान्स इंग्लंड युरोपीय संघाच्या बाजून राहतात व ही तीन राष्ट्रे इराणवरील निर्बंध टिकवून ठेवण्यासाठी लावून धरतात पण त्यांनी इराणच्या हिताचे ठोस प्रयत्न केले नाही. असे इराणचे दुःख आहे.




**समारोप :** इराण आपल्या जबाबदाऱ्या पार पाडत नाही. संयुक्त कृती कार्यक्रमाचे पालन करत नाही, असे त्रिकुट देशांना वाटते. त्यामुळे त्रिकुट देश आणि इराण याच्यामध्ये आडवा विस्तव जात नाही. इराण युक्रेन विरूद्धच्या युद्धात रशियाला द्रोन पुरवित आहे, तसेच शस्त्र-अस्त्रे देत आहे त्यामुळे त्रिकुटांचा तिळ पापड होत आहे. इराण रशिया व चीन यांच्या गटाशी जवळीक करत आहे, तसा त्रिकुट देशांना अधिक राग येत आहे. त्यामुळे पुढील आक्टोंबरात संपणारे निर्बंध लाबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे दीड वर्षापासून चाललेले रशिया युक्रेन युद्ध आणखी किती कालावधी चालेल याचा नेम नाही. त्रिकुट देशांनी घेतलेला निर्णय युरोपीय संघाला आवडला आहे परंतु त्यामुळे रशिया व चीन ब्रिटन, फ्रान्स व जर्मनीवर नाराज आहेत. युक्रेन युद्धामुळे संबंध युरोपातील अर्थ कारण विस्कटले आहे. युरोपीय संघाने इराणला एकाकी पाडण्याचा प्रयत्न केला. त्याच्या डावास प्रति डाव म्हणून रशियाने युरोपीय संघावर कडक निर्बंध लादले, हे शह प्रतिशह देण्याचे डावपेच संबंध युरोपला महागाई, अन्न धान्य टंचाई आणि आर्थिक संकटाच्या खाईत लोटणारे आहे. ई-3 देशांनी इराणीच कोंडी करण्यात यश मिळविले परंतु इराण ही मोठा खंबीर आहे. तो रशियाला मदत देत आहे आणि घेत आहे. रशिया आणि युरोपीय संघाच्या भांडणात जगामध्ये ई-3 सारखे अनेक छोटे गट उदयास येत आहेत. एकमेकांना शिरजोर करणारे गुप्त व उघड करार हे युद्ध व तणावाला हे तिसऱ्या जागतिक महायुद्धाकडे नेणारे ठरत आहे. युक्रेन युद्ध थांबावे परस्परातील तणाव कमी होवा शांतता नादावी म्हणून भारतासारख्या जी-20 गटाच्या नेत्याने प्रामिणक प्रयत्न करण्याची गरज आहे. तसे झाले तर पंतप्रधान नरेद्र मोदी शांततेच्या नोबेल पुरस्कारचे मानकरी ठरतील. नाही तर जगामध्ये अनेक गट तट तयार होतील आणि त्यांनी एकमेकांवर निर्बंध लादून काहीही साध्य होणार नाही. हे विविध प्रकारचे करार एकमेकांना संकटात टाकणारे आणि विनाशाकडे नेणारे आहेत. इराणच्या अण्विक क्षेपणास्त्र प्रकल्पाचे समर्थन करता येणार नाही. उत्तर कोरीया जे प्रयोग करतो तेच प्रयोग इराण करत आहे. त्यामुळे इराणला वेसण घालावी हे त्रिकुटांचे म्हणणे रास्त आहे, पण आठ वर्षापासून चालत आलेले निर्बंध पुढे किती वर्ष ठेवायचे याचाही शांततेने विचार करायला हवा नाही तर निर्बंध जुगारून देण्यासाठी पुन्हा युद्ध व तणाव वाढीस लागतो. हे दुष्ठ चक्र कुठेतरी थांबले पाहिजे तरच जगात शांतता नांदले. हाच इराण वर लादलेल्या निर्बंधाचा अर्थ आणि अन्वयार्थ होय. त्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाचया रचना व कार्यपद्धतीत बदल झाला पाहिजे व भारतासारख्या देशाला सुरक्षा परिषदेत कायमस्वरूपी सदस्यत्त्व मिळाले पाहिजे, तरच जगाचे चित्र बदलू शकेल व धुमसणारा तणाव कमी होईल.

# आम्हाला शिकवू द्या हो...!



प्रवीण दाभाडे पाटील
संपर्क क्र. 8805463143

आधुनिक केसरी

**तुम्हाला काय राव महिना भरला की पगार भेटला, तुमचं काय भाऊ काम कमी आणि पगार जास्त, महाराष्ट्रातील शिक्षक आणि त्यांचा पगार हा जनसामान्यांच्या अगदी जिव्हाळ्याचा विषय,आणि जो याविषयी बोलणार नाही तो करंटा..सर्वसामान्य व्यक्ती असू दे अथवा इथले लोकप्रतिनिधी सर्वच शिक्षकांना तरी काय काम असतं असं बेंबीच्या देठापासून बोलायला मोकळे, शेवटी ते त्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा वापर तरी केव्हा करणार म्हणा..? एरवी 5 सप्टेंबर आला शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या की, आम्ही वर्षाचे 364 दिवस शिक्षकांविषयी स्तुती सुमने उधळायला मोकळे, मुळात शिकवणे, ज्ञानदान करणे हे शिक्षकांचे प्रथम आणि आद्य कर्तव्य या कर्तव्यापासूनच शिक्षकांना हेतू पुरस्कार दूर ठेवले जाते की काय असे चित्र दिसून येत आहे..**

एखादी व्यक्ती कानाखालची असली की तिला मारून कुटून वेठ बिगारासारखी सारखी वाटेल ती कामे त्याच्याकडून करून घेतली जातात, आजही या सरकारच्या कानाखालचे कामगार जर कोणी असतील तर ते म्हणजे शिक्षक होय...क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले,क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज,कर्मवीर भाऊराव पाटील या सारख्या महान व्यक्तिमत्त्वांनी जो उदात्त हेतू डोळ्यासमोर ठेवून शिक्षनाची कवाडे उघडी केली होती, ती आजच्या शिक्षणाच्या बाजारीकरणामुळे कुठेतरी लोप पावत चालल्यासारखे दिसत आहे.. जे व्यक्ती नेहमी म्हणतात ना की शिक्षकांना काय काम असतं त्यांनी फक्त एक महिना विद्यार्थ्यांना शिकवावं सोबत एक महिन्याचं शालेय पोषण आहाराचे बिल तयार करून दाखवावं मग त्यांना संत तुकारामांच्या जावे त्यांच्या वंशा या ओळीचा अर्थ कळेल शिक्षक काय किंवा इतर कोणतेही काम काय कुठलेच काम सोपे नसते सोपे नसते ते केवळ नाव ठेवणे आणि इतरांकडे बोटे दाखवणे शासन येते आहे आपल्या दारी शासकीय नोकरी बनवताय कंत्राटी भारी आणि आता शाळाही होत आहेत देणगीदारांच्या नावावरी असेच काही सगळं चालू आहे मागच्या काही दिवसांपासून बीएलओ चे काम मिळाले अनेकांकडून माहिती मिळवली तेव्हा हे काम घेऊ नकोस असेच ते म्हणाले,परंतु हे काम स्वीकारावं लागलं, मागच्या आठ दिवसात चार वेळा तहसील वारी करावी लागली, जे शिक्षक बांधव मागच्या अनेक वर्षांपासून या कामात आहेत या कामाचा त्रास त्यांना जास्त माहिती, घरोघरी दारोदारी जाऊन मतदारांची माहिती गोळा करायची, 80 वर्षाचे कोण मयत, स्थलांतरित,नावात, फोटो बदल इत्यादी कामे शिक्षकांना शाळा विद्यार्थी अध्यापन या सर्व गोष्टींचा ताळमेळ साधून कराव्या लागतात मग कसा साध्य होणार गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा उद्देश..? शिक्षकांवर असणाऱ्या शाळाबाह्य कामांच्या अतिरिक्त भारामुळेच शिक्षणाचा मुख्य हेतू पूर्ण होताना दिसत नाही शिक्षकांच्या खांद्यावर लादलेला अतिरिक्त कामांचा भार जर आपण पाहिला तर डोकेच चक्रावून जाईल, मतदान, जनगणना, विविध प्रकारचे सर्वेक्षण,शिष्यवृत्ती, पट नोंदणी शाळाबाह्य विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण, वृक्षारोपण, विद्यार्थ्यांचे बँक खाते उघडणे, विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढणे, शैक्षणिक अहवाल, ड्रेस वाटप शालेय पोषण आहार, साहित्यांची नोंद प्रत्येक राष्ट्रीय कामात



मदत करणे, कोरोना काळात तर शिक्षकांनी आपला जीव मुठीत धरून सर्वेक्षणाचे काम केले होते, आम्हाला तर दोन वेळा सर्वेक्षणाचे हे काम करावे लागले होते, शिक्षण खात्यातील सूचनेनुसार विविध क्रीडा स्पर्धा उपक्रमांचे आयोजन करणे अहवाल सादर करणे, शैक्षणिक सहल, सरल प्रणाली हे व इतर जेवढी कामे सांगावी तेवढी कमीच आहेत या अशैक्षणिक कामामुळे शिक्षकांची अवस्था रात्र थोडी आणि सोंग फार अशी झाली आहे. शालेय पोषण आहार योजनेचे काम करणाऱ्या शिक्षकांची तर कमाल आहे रोज डाळ किती ग्रॅम वापरली तांदूळ किती किलो वापरला तेल किती लिटर वापरले भाजीपाला किती वापरला या सर्वांचा हिशोब जुळवता जुळवता त्यांच्या तर नाकी नऊ येत असतील हे नक्की वेळोवेळी येणाऱ्या विविध शासकीय योजना त्यांची अंमलबजावणी त्यांचा लेखी अहवाल सादर करणे या सर्व गोष्टींमुळे कागदी घोडे नाचविण्यातच शिक्षकांचा वेळ निघून जातो आणि मग एकच प्रश्न मागे उरतो तो म्हणजे शिक्षकांनी शिकवायचे केव्हा. सर्वगुणसंपन्न भारताची पिढी निर्माण करायची तरी केव्हा आणि कशी..? आरटीई च्या शासन निर्णयानुसार प्राथमिक शिक्षण हे मोफत व सक्तीचे करण्यात आलेले आहे हे शिक्षण जरी मोफत असले तरी ते देण्यासाठी शिक्षकांना पूर्णपणे मुभा देण्यात येत नाही त्यांना ज्ञानदान सोडून इतर शैक्षणिक कामे सक्तीने करावी लागतात आणि उरलेल्या वेळातून शिकवण्याचे काम पूर्ण करावे लागते म्हणून म्हणावेसे वाटते मोफत झाले शिक्षण पण शिकवण्याची वेळ नाही मग कशी वाढेल गुणवत्ता.. शिक्षकांच्या गळ्यात अशैक्षणिक कामांचे लोढणे बांधल्या पायी शिक्षकांचे अनेक प्रकारही पाडून ठेवलेले आहेत जि प शिक्षक खाजगी शिक्षक अनुदानित शिक्षक विनाअनुदानित शिक्षक अतिरिक्त शिक्षक ज्याचे दुःख त्यालाच माहिती विनानूदानित शिक्षकांची तर बिचारा जनावर मुका आणि कोणीही हाका अशीच अवस्था, इतर शिक्षकांना तरी किमान पूर्ण पगार मिळतो पण यांचा दुःख म्हणजे रोज मरे त्याला कोण रडे असेच झालेले आहे, कोणत्याच कामातून सुटका नाही

आणि पगाराच सुख काही भेटत नाही
तरीही बिचारे उपाशीपोटी ज्ञानदानाचे
पवित्र कार्य पार पाडतच आहेत.

महाराष्ट्राला शैक्षणिक दृष्ट्या जर अधिक प्रगत बनवायचे असेल तर त्यासाठी गरज आहे सर्वच शिक्षकांच्या मानगुटी वरील अशैक्षणिक कामांचे ओझे उतरवण्याची, यासाठी महाराष्ट्रातले सर्वच शिक्षक बांधव म्हणतातभावी भारताची पिढी घडवू द्या हो आम्हाला फक्त आणि फक्त शिकवू द्या हो.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# मेहनतीची तयारी ठेवून तरुणांनी राजकारणात यावे : नीलेश परकेल्लु

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** राजकारण हा काटेरी मुकुट आहे, इथे मान सन्मान असला तरी सर्वसामान्य जनतेच्या अपेक्षांचे ओझे मोठे आहे, ते पेलण्यासाठी दिवसरात्र मेहनत करण्याची तयारी ठेवून तरुणांनी राजकारणाच्या क्षेत्रात पाऊल टाकावे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहर उपाध्यक्ष नीलेश नागाय्या परकेल्लु यांनी केले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या छत्रपती संभाजीनगरातील विभागीय कार्यालयात श्री गणेशाच्या महाआरती प्रसंगी युवक काँग्रेसचे शहर उपाध्यक्ष नीलेश नागाय्या परकेलु बोलत होते. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या संकल्पनेतून दरवर्षीप्रमाणे यंदाही छत्रपती संभाजीनगरातील विभागीय कार्यालयात श्री गणेशाची स्थापना करण्यात आली. यावेळी पुढे बोलताना नीलेश परकेल्लु म्हणाले की, सद्यस्थितीत राजकारण अतिशय गढूळ झाल्याचा आरोप केला जातो, राजकीय क्षेत्रावर असे आरोप पूर्वीही होत होते, आजही होतात आणि पुढेही होत राहतील, कारण सगळ्याच बाबतीत कालानुरूप बदल होत असतात तसेच ते राजकारणातही होत आहेत, या बदलांची तीव्रता कमी-अधिक प्रमाणात दिसून येते. अलीकडच्या काळात सोशल मीडियासारखे माध्यम बलशाली झाल्याने या बदलांची तीव्रता तत्काळ दिसून येत आहे. तथापी समाजसेवेची आवड, सेवाभाव आणि स्वतःच्या अडचणी, त्रासांचा विचार न करता अहोरात्र परिश्रम करण्याची तयारी व क्षमता स्वतःमध्ये असतील तर तरुण-तरुणींनी राजकारणात सक्रिय व्हावे, असे आवाहनही नीलेश नागाय्या परकेलु यांनी केले. यावेळी राज्य माध्यम समन्वयक महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ भगवान राऊत संस्थापक सचिव शब्दगंध साहित्यिक परिषद सुनील गोसावी, पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे, जिल्हा संघटक विलास शिंगी, जिल्हा उपाध्यक्ष प्रसिद्धी प्रमुख मनोज पाटणी, कार्यालय प्रमुख संजय व्यापारी, सहसचिव संदीप घंटे, अतुल खंडगावकर, अमित परकेल्लु, रोहन तंगडेल्लू, अभिजित मनगटे, सुमित राजपूत, छायाचित्रकार सचिन उबाळे आदींसह पत्रकारांची उपस्थिती होती.



# सोयाबीनवर चारकोल रॉटच्या प्रादुर्भावामुळे शेतकरी चिंतेत

आधुनिक केसरी न्यूज

**बाबूराव गोणारकर**

**धर्माबाद :** तालुक्यात सोयाबीन पिवळी पडने, व आकस्मिकपणे वाळणे, ही जवळपास सर्वच महाराष्ट्रातील सोयाबीन उत्पादक शेतकरी वर्गाची समस्या आहे, गेल्या १० -१२ दिवसापासून सोयाबीन वाळत आहे किंवा आकस्मिक मर होत आहे, सर्वच भागात आणि सर्वच वणांमध्ये हा प्रादुर्भाव दिसून येत आहे, त्यामुळे शेतरीवर्गामध्ये अतिशय चांगले आलेले सोयाबीन हातातून जाते की काय याची भीती निर्माण झाली आहे.तसेच काही ठिकाणी शेतकरी मित्रांनी सोयाबीन काढून सुध्दा टाकलेले आहे. अशा प्रकारे सोयाबीन पिक वाळल्याने त्याचा परिणाम होऊन जवळपास ७०-८० टक्के नुकसान होऊ शकते, आणि हता तोंडाशी आलेले पीक हातातून जाऊ शकते. आपण बघत आहात या गोष्टीसाठी सर्वच शेतकरी चिंतेत आहेत, याचे कारण काय, उपाय काय याची विचारणा सर्वच स्थरावर होत आहे.सोयाबीन वरील चारकोल रॉट रोगाचे नियंत्रणाबाबत वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ ,परभणी अंतर्गत कापूस संशोधन केंद्र ,नांदेड येथील शास्त्रज्ञांनी ता.21 रोजी धर्माबाद येथे भेट देऊन सोयाबीन पिकावरील चारकोल रॉट रोगानी प्रभावीत झालेल्या पिकाची बाभूळगाव, चिकना, व आत्कुर येथील शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन पाहणी व मार्गदर्शन केले. प्रमुख शास्त्रज्ञ श्री डॉ.भेदे, बी.व्ही. कीटक शास्त्रज्ञ आणि डॉ.ढोके, पि. के. वनस्पती विकृती शास्त्रज्ञ यावेळी उपस्थित होते. धर्माबाद तालुक्यामध्ये सोयाबीन पिकाखालील एकूण क्षेत्र 22710 हेक्टर एवढे असून सादर क्षेत्र ऐकून खरीप लागवडीचे 75 टक्के येते. मुझे बाभूळगाव येथील तीन शेतकरी चिकना येथील पाच शेतकरी व हातकुर येथील दोन शेतकरी असे एकूण दहा शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन चारकोल रॉट या रोगाच्या प्रादुर्भाव बाबत पाहणी केली .सदर रोग धर्माबाद तालुक्यातील बरेच गावांमध्ये आढळून येत आहे यामध्ये के डी एस 726 व के डी एस 753 या सोयाबीनवरील प्रमुख दोन वानावर सदर रोगाचा प्रादुर्भाव जास्त आहे. सदर रोगाच्या नियंत्रणासाठी ज्या ठिकाणी सदर रोगाचा प्रादुर्भाव शेतकऱ्यांच्या शेतामध्ये 15 ते 20 टक्के दरम्यान आहे व सोयाबीन शेंगा 8 ते 10 दिवसात पक्व होऊ शकतात अशा ठिकाणी, तसेच लगतच्या सोयाबीन शेतामध्ये किंवा ज्या सोयाबीनवर या रोगाचा प्रादुर्भाव नाही अशा सोयाबीनवर चारकोल रॉट रोगाचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून शास्त्रज्ञाने कार्बनडायजेम 12% अधिक मॅनको झेप 63% हे संयुक्त बुरशीनाशक 30ते 40 ग्रॅम प्रति फवारणी करण्यात यावे असे मार्गदर्शन केले.गावचे शेतकरी व तालुका कृषी अधिकारी सुरेंद्र पवार,धर्माबाद मंडळ कृषी अधिकारी विशाल चंद्रपुरे, कृषी पर्यवेक्षक भंडारे सी. एल ,लखमोड एस.पी. इत्यादी उवस्थित होते.



> शेतकऱ्यांनी रोगाच्या नियंत्रणाबाबत बुरशीनाशकाची फवारणी करावी . सोयाबीनचे इतर वाण JS-335,JS-9305,MAUS -6122 इत्यादी जे की 100 दिवसापर्यंत येतात अशा वानाना शेंगा लागून पक्व झालेल्या आहेत त्यामुळे या वानाचे उत्पादनावर जास्त परिणाम होणार नाही . सदर रोगाची बुरशी जमिनीत वाढत असल्याने ज्या ठिकाणी या रोगाचा प्रादुर्भाव झालेला आहे अशा ठिकाणी पुढील वर्षी पिकाची फेरपालट करावी सोयाबीन हे पीक त्या ठिकाणी घेण्यात येऊ नये . **सुरेंद्र पवार, तालुका कृषी अधिकारी**

# चंद्रपूर-नागपूर महामार्गावर चक्काजाम आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** ओबीसींच्या विविध मागण्यांसह मराठा समाजाला ओबीसीमध्ये समाविष्ट करू नये या मागणीसाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या वतीने जनता महाविद्यालयजवळ चक्का जाम आंदोलन करून चंद्रपूर-नागपूर महामार्गावर वाहतूक अडवून धरण्यात आली.

ओबीसी विद्यार्थी संघाचे जिल्हाध्यक्ष रविंद्र टोंगे यांची प्रकृती खालावल्यानंतर शुक्रवारी त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले होते. आणि विजय बलकी, प्रेमानंद जोगी अन्नत्याग आंदोलनाला बसले त्यानंतर झालेल्या ओबीसी महासंघाच्या बैठकीत आंदोलन तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला होता. आज जनता कॉलेज नागपूर महामार्गावर स्थानीय जनता कॉलेज चौकामधे चक्काजाम आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात विधानपरिषद सदस्य आमदार सुधाकर अडबाले आणि राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे महासचिव सचिन राजूरकर सहीत सर्व पदाधिकारी सहभागी झाले होते.




मराठ्यांना सरसकट कुणबी प्रमापत्र देऊ नये, जातीनिहाय जनगणना, ओबीसी विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात वसतिगृह या मागण्यांसह सुरु झालेले आंदोलन आता आणखी तीव्र होत चालले आहे. ओबीसी कार्यकर्त्यांना पोलीस मुख्यालयात प्रतिबद्द केले. या वेळी बबनराव फंड, दिनेश चोखारे, नंदू नागरकर, अनिल धानोरकर, रवींद्र शिंदे, राजेश नायडू, पप्पू देशमुख, कुणाल चहारे, महेश खंघार,अनिल शिंदे, निलेश बेलखेडे,रोशन पचारे, हितेश लोडे, गणेश आवारी ,पांडुरंग टोंगे, विकास विरुतकर, सुनीता लोढिया, मनीष बोबडे, माया ठावरी, कुसुम उदार, गणेश आवळे, श्याम लेडे, गणेश झाडे, योगेश बोबडे, अक्षय येरगुडे, विनोद निब्राड, बाळा पिंपळशेंडे, अशोक उपरे, भाऊराव झाडे, भाविक येरगुडे, राहुल भोयरसहीत अनेक ओबीसी कार्यकर्ते सामील झाले.

रविवार २४ सप्टेंबरला पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, केंद्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर आणि चंद्रपूर विधानसभेचे आमदार किशोर जोरगेवार यांच्या घरापर्यंत प्रेतयात्रा काढण्यात येणार आहे.




महाराष्ट्र Business Katta










# शेती विकासाचा शाश्वत मार्ग



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्रे
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**शेतीच्या संदर्भात अनेकांनी मूलगामी चिंतन मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला, परंतु हा प्रयत्न मोठ्या प्रमाणात फलद्रूप मात्र झाला नाही. त्याची अनेक कारणे आहेत. प्रत्येक कारणांच्या मागे प्रश्नांची मोठी श्रृंखला देखील आहे. शेतकरी जगाचा पोशिंदा आहे असे म्हटले जाते. जगाच्या पोटाची खळगी भरत असताना तो देखील जिवंत राहिला पाहिजे. ही सोय जगाने पहावी. शेतकरी दुसऱ्यावर उपकार करण्यासाठी उत्पादन करत नसला तरी कोणत्याही व्यापारी किंवा पांढरपेशा लोकांपेक्षा निश्चितच उदार आहे. हे त्याचे औदार्य दिवसेंदिवस संकुचित होत असताना त्याची कारणमीमांसा काय व त्यावरील उपाय काय? याचा उलगडा झाला पाहिजे.**



## क्षितिजापल्याड

एखाद्या सावजावर चोहोबाजूंनी हल्ला व्हावा, तशी अवस्था आज शेतकऱ्यांची झाली आहे. त्याला अनेक कारणे आहेत. यात सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे शासकीय उदासीनता. शेती क्षेत्रातून शासनाने अलगदपणे आपले अंग काढून घेतल्यानंतर खाजगी कंपन्यांची दृष्टी तिकडे वळणे स्वाभाविक म्हणता येईल. किंबहुना खाजगी क्षेत्राला त्यात शिरकाव व्हावा म्हणून जागतिक राजकारणाच्या दबावामुळे पूर्वी शेतीच्या संदर्भात जे संशोधन आणि मार्गदर्शन शासकीय पातळीवर चालायचे ते आज राहिले नाही. खाजगी कंपन्या आपल्या एजंटामार्फत आणि दुकानदारांना हाताशी धरून एसी रूममध्ये बसून केलेले शेतीसंशोधन शेतकऱ्यांच्या माथी मारत आहेत. दरवर्षी हजारो नवनवीन बी बियाणे बाजारात येऊन सुद्धा शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढू नये, यास काय म्हणावे? ही जबाबदारी कोणाची? कितीतरी वेळेस आपण जे पेरतो ते उगवतच नाही, उगवले तर ज्या प्रमाणात फळायला पाहिजे तसे होत नाही किंवा त्या वाणावर किडीचा इतका प्रादुर्भाव होतो की, त्यासाठी शेतकऱ्याला हजारो रुपयांचे कीटकनाशके वापरून देखील हाताशी फार काही लागत नाही. विशेषतः बी टी बियाणांच्या वापरामुळे शेतकरी मेटाकुटीला आलेला आहे. जेवढा गाजावाजा करून हे बियाणे बाजारात आणल्या गेले,त्याप्रमाणे लाभ मिळवून देताना दिसत नाही. बी टी वाणांच्या वापरामुळे उत्पादन खर्च देखील अव्वाच्या सव्वा वाढला आणि शेतकऱ्यांचा माल बाजारात आणल्यानंतर जे उत्पादन खर्चाच्या पासष्ठ ते सत्तर टक्केच किंमत येत असेल तर शेतकऱ्याने आत्महत्या करू नये असे कितीही वाटले तरी दुसरा मार्ग काय? शासनाची फक्त कापूस एकाधिकार योजनाच बंद झाली असे नव्हे तर ज्या क्षेत्रात खाजगी भांडवलदार नफा कमवून गब्बर होत आहेत, त्या सर्व क्षेत्रातून शासन बाहेर पडले आहे. उत्पादन, खरेदी, विक्री, विनिमय आणि उपभोग हे अंतिमतः शासनाच्या हाती असावयाची गोष्ट आहे. कारण त्याशिवाय सर्वांना सामावून घेऊन समन्यायी स्वरूपाचे तंत्र खाजगी क्षेत्र निर्माण करू शकत नाही, हा जगाचा आजवरचा अनुभव आहे.

समजा याविरोधात शेतकऱ्यांनी उठाव केलाच तर वेगवेगळ्या कलमाखाली त्यांना अटक करण्यात येते. मुळात आज शेतकऱ्यांनी उठाव करावा अशी कोणतीही शक्यता नाही. अतिशय पद्धतशीरपणे या सर्व परिस्थितीला आपणच कसे जबाबदार आहोत, हे शेतकऱ्यांच्या गळी उतरवण्यास शासन यशस्वी झाले आहे. ही अचानक झालेली प्रगती नाही मागच्या पंचवीस तीस वर्षांपासून शासन यावर मेहनत घेत आहे. एवढ्या चिकाटीने घेतलेल्या मेहनतीचे कौतुक तर झालेच पाहिजे ! शेतकऱ्याच्या प्राप्त परिस्थितीला जबाबदार कोण तर तो स्वतःच आहे. हे जे भ्रममूलक तत्त्वज्ञान पेरल्या गेले त्यास आपल्या अनाकलनीय अज्ञानामुळे आणि शेतीविषयक प्रश्नातून जाणकारांनी अंग काढून घेतल्यामुळे शेतकऱ्याने हे मान्य केल्यातच जमा आहे. लग्नावर प्रचंड खर्च, व्यसन, कोर्ट कचेरी, कौटुंबिक भांडणे ही काही सर्रास करणे सांगण्यात येतात. ही कारणे फक्त शेतकऱ्यांनाच लागू होतात आणि इतरांचा याच्याशी काही संबंध नाही अशी काही परिस्थिती आहे का? नाही. पण आपल्या नियमितपणे मिळणाऱ्या उत्पन्नामुळे इतरांचे झाकले जाते. शेतकऱ्यांचे जगजाहीर होते एवढाच काय तो फरक. शेतकरी वर्गाला यातून बाहेर काढायचे असेल तर शासनाला काही ठोस पावले उचलणे गरजेचे आहे. कारण कितीही म्हटले तरी स्वतः शेतकरी यातून बाहेर पडू शकत नाही. शेतीतज्ज्ञ,



अर्थतज्ज्ञ, इंदिरा गांधी इन्स्टिट्यूट ऑफ डेव्हलपमेंट रिसर्च, टाटा समाजविज्ञान संस्था यांनी वेळोवेळी ज्या काही शिफारशी सुचविलेल्या आहेत त्यांची दखल शासनाने घ्यावयास हवी. आपण स्वामिनाथन आयोग लागू करू शकत नाही, हे सिद्ध झाले आहे. किमान पातळीवरील शिफारशी स्वीकारून शेतकऱ्यांच्या जीवनात बदल कसा घडवून आणता येईल, हे तरी पाहिले पाहिजे. खरेतर देशांतर्गत शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन शासनाने शेतमालावर आयात बंदी घालणे, आयातीवर कर वाढवणे, आधारभूत किंमत निश्चित करताना उत्पादन खर्च लक्षात घेणे आणि तो वगळून व्यापाऱ्यांचे हित लक्षात न घेता शेतकऱ्यांना कसा फायदा होईल, हे पाहणे गरजेचे आहे. सहकारी सोसायटी फक्त निवडणूक घेण्यासाठीच नसून त्याद्वारे आणि बँकेकडून कमी व्याजदरात आणि वेळेत कर्जपुरवठा करणे, रासायनिक खते, बी बियाणे, कीटकनाशके यांच्या किंमतीवर नियंत्रण ठेवणे, शेतकरी विमा हा मोठाच चिंतनाचा विषय असला तरी त्याची काटेकोर अमंलबजावणी तरी होते का हे पाहणे महत्त्वाचे आहे. कित्येकदा शेतकरी आत्महत्या नोंदली जात नाही आणि सर्व काही अलबेल चालू आहे, असा एक भास निर्माण करण्यात येतो. तसे न होता त्याची प्रामाणिक नोंद झाली पाहिजे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे नदीपात्रातील गाळ उपसून नदी खोल प्रकल्पासोबतच माती आडवा आणि पाणी जिरवा सारखे प्रकल्प सर्वत्र राबवले पाहिजेत. त्याच जोडीला केवळ मोठे धरण उभारण्यापेक्षा छोटी छोटी धरणे जागोजागी उभारल्यास त्याचा शेतकऱ्यांना निश्चितच फायदा होईल. जमिनीची धूप थांबवून भूजल पातळी वाढणे, उत्पादित मालास योग्य भाव मिळणे आणि स्वस्तात अर्थसाह्य उपलब्ध करून दिल्यास शेतकऱ्यांचे प्रश्न काही प्रमाणात तरी मिटतील. **(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# पर्यावरणपूरक गणेशोत्सव काळाची गरज



शांताराम मगर
संपर्क क्र. 9421417540

आधुनिक केसरी

**जल से ही जीवन है. नदी आपली आई आहे. नदी आपल्या हातून कधीही दूषित होऊ देऊ नका. भारतासह देशविदेशात पोहोचलेला गणेशोत्सव काळानुरूप बदलत आहे. मात्र आज साजरे होणारे गणेशोत्सव हे पर्यावरणाला हानीकारक तर ठरत नाहीत ना, याकडे मात्र लक्ष देण्याची वेळ आली आहे. गणपती हे आराध्य दैवत म्हणून ओळखले जाते. चतुर्थीला गणरायाची विधिवत प्रतिष्ठापना करून त्याची मनोभावे पूजा केली जाते. गणेशोत्सवाचे महत्त्व लक्षात घेऊनच लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी लोकसहभाग महत्त्वाचा मानून त्याला सार्वजनिक रूप दिले.**

कोणताही उत्सव साजरा करताना पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही याची काळजी आपण सर्वांनी घेणे आवश्यक आहे. गणेशोत्सवामधील पावित्र्य आणि पर्यावरण संरक्षण यासाठी गणेशोत्सव पर्यावरण पूरक पद्धतीने साजरा होणे ही काळाची गरज आहे. यासाठी आपण सर्वांनी आग्रही राहिले पाहिजे. प्रत्येकाने आपला दृष्टिकोन पर्यावरणस्नेही ठेवला तरच उत्सव साजरे करण्याबाबत सामाजिक परिवर्तन होऊ शकेल.

आज आपण पर्यावरणाविषयी अधिक सजग झालो आहोत. त्यामुळे आपले प्रत्येक सण आणि उत्सव हे पर्यावरणपूरक पध्दतीने साजरे होणे आवश्यक आहे. गणेशोत्सव सुध्दा पर्यावरणपूरकच असायला हवा, कारण पर्यावरणपूरक गणेशोत्सव ही काळाची गरज आहे. पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करीत आहे. पण या प्रयत्नात आपण आपलाही सहभाग नोंदवूया.

आपण आपले सगळे उत्सव आणि सण यापुढे पर्यावरणपूरक पध्दतीने साजरे व्हावे यासाठी आग्रह धरला पाहीजेत. पर्यावरणाचे रक्षण करण्याची राज्य शासनाची जबाबदारी असली तरी पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धन करणे ही आपली प्रत्येकाची जबाबदारी आहे. कोणतेही सामाजिक बदल आपल्याला आत्मसात करण्यासाठी वेळ लागतो, पण आपली मानसिकता आपण बदलली तर आपण स्वता पासुन सुरुवात केली तर नक्कीच बदल घडवू शकतो. लोकमान्य टिळकांनी सुरु केलेल्या गणेशोत्सवाचे महत्व आजच्या बदलत्या काळात आणि परिस्थितीतही टिकून आहे. हा उत्सव हा पारंपरिक पद्धतीने साजरा करताना तो पर्यावरणपूरक पद्धतीनेही साजरा करुण शांततापूर्ण वातावरणात, सुरक्षाविषयक सर्व प्रकारची काळजी, ध्वनी प्रदूषणविषयक सर्व कायदे काटेकोरपणे पाळून हा उत्सव साजरा करतांना गणराय म्हणजे ज्ञान आणि बुद्धीची देवता. मांगल्यदेवता आणि बुद्धीदेवतेचा हा उत्सव असून या उत्सवाला ऐतिहासिक परंपरा आहे. गणेशोत्सव घरगुती आणि सार्वजनिक स्वरुपात साजरा केला जातो. तो साजरा करीत असताना पर्यावरणपूरक होईल, तसेच या कालावधीत पर्यावरणाच्या संरक्षण आणि संवर्धनाची काळजी घेतली जाईल, हे पाहणे आपल्या सर्वांचे नैतिक आणि राष्ट्रीय कर्तव्य आहे. गणेशोत्सव काळात होणारा थर्माकोल आणि प्लॅस्टिकचा वापर पर्यावरणाला हानी पोहचवत असल्यानं तो कटाक्षाने टाळायला हवा. प्लॅस्टर ऑफ पॅरीसच्या मूर्ती, तसेच मोठया आकाराच्या मूर्तींमुळे विसर्जनाच्यावेळी होणारे पाण्याचे प्रदूषण जैवविविधतेला गंभीर धोका निर्माण करणारे असते, त्यामुळे त्याचाही आज गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. ध्वनीक्षेपक आणि डॉल्बीसारख्या मोठया आवाजातील वाद्यांमुळे होणाऱ्या ध्वनीप्रदूषणाने मानवी आरोग्यावर गंभीर दुष्परिणाम होत असतात. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी आपण स्वतःसह अधिकाधिक लोकांना प्रोत्साहित करा. गणेशोत्सव हा आपल्या अस्मितेचा, परंपरेचा आणि संस्कृतीचा ठेवा आहे. गणपतीच्या मूर्ती पर्यावरणपूरक असल्यास गणपतीचे विर्सजन केल्यानंतर या मूर्ती तत्काळ विसर्जित होतात. म्हणूनच आपण प्रत्येकाने पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करण्यावर भर द्या.



गणपती विसर्जित केल्यावर गणपतीच्या मूर्तीची आणि निर्माल्य यांची होणारी दशा आपण पाहतो. यामुळेच आपला दृष्टीकोन बदलून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा होणे आवश्यक आहे. वाढते प्रदूषण, जागतिक तापमानवाढ आणि वाढते नदी प्रदूषण व त्याचे होणारे परिणाम या पार्श्वकभूमीवर "पर्यावरणपूरक गणेशोत्सवा'चा नवा मूलमंत्र आपण जपणे आवश्यक आसून गणेशोत्सवाच्या काळात ध्वनी आणि जलप्रदूषण मोठया प्रमाणावर होते. हे प्रदूषण थांबविणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे यासाठी पर्यावरणपूरक गणेशोत्सव ही संकल्पना पुढे आली.

आता विविध स्वयंसेवी संस्था, विविध शासकीय विभाग पर्यावरणपूरकतेचा आग्रह धरतात.

ध्वनिप्रदूषण थांबवण्यासाठी ढोल-ताशा पथक व स्पीकरवर पोलिसांनी निर्बंध घातले आहेत. निर्माल्य व गणेशमूर्ती नदीत विसर्जित केल्यामुळे मोठ्या प्रमाणावर जलप्रदूषण होते पण दर वर्षीप्रमाणे निर्माल्यसाठी कलश व गणेश मूर्ती विसर्जित करण्यासाठी कृत्रीम हौदांचा पर्यायही अनेक ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येत असल्याने जलप्रदूषण रोखण्यास मदत होते.

वाहणाऱ्या नदीचे पात्र आपल्या परीने स्वच्छ करण्याचे काम तेथील झाड झुडप सातत्याने करत आहे. एकीकडे नदीत नित्यनेमाने कचरा, निर्माल्य, नको असलेले कपडे,प्लास्टिक नदीला अर्पण करून जात असतात. आनेकदा आपण पाहतो  दशक्रिया घाट परिसरात लोक जुने कपडे, गाद्या गोधड्या चादरी, मयताचे कपडे व साहित्य टाकाऊ वस्तू, रुईच्या पानांचे शेकडो हार व अनेक वस्तू प्लास्टिकच्या पिशवीत भरून नदीत भिरकवत असल्याचे  दिसून येते. गावातील घरगुती, दूषित प्रक्रियाविरहीत पाणी; तसेच घनकचरा नदीत टाकणे निर्माल्य विसर्जित करणे  सौंदर्यीकरणाच्या नावाखाली नदीकाठावर काँक्रिटीकरण, पात्रात वीटभट्ट्या आणि अतिक्रमणेपरिणाम नदीप्रदूषणाचे मगरी, मासे, पाणपक्षी, कासव, खेकडे, झिंगे यांच्या प्रजाती धोक्यात आल्या आहेत. 'जल से ही जीवन है. नदी आपली आई आहे. नदी आपल्या हातून कधीही दूषित होऊ देऊ नका. पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत समाजात अजून प्रबोधन होणे गरजेचे आहेत प्रयत्न गणेशोत्सवापासून संकल्प करुया.

# दुकानदारीसाठी सर्व काही



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी


**सध्या सोशल मीडियाचा जमाना आहे. सोशल मीडियावर मनोरंजन करून पैसा कमवणे सोपे झाले आहे. सोशल मीडियावर आज काहीही टाकले तरी बघत असतात. कारण प्रत्येक हातात मोबाईल आणि दररोज वापरायला इंटरनेट आहे. घरात आटा कमी असतो मोबाईल मध्ये डाटा मात्र एका महिन्याचा असतो. हे वास्तविक आहे. सोशल मीडियामुळे प्रसिद्धी मिळवणे खुप सोपे झाले. बेरोजगार तरुणांच्या हातात डाटासह चांगला मोबाईल आहे याचाच फायदा सोशल मिडीयाच्या माध्यमातून ज्यांना स्वतः चे दुकानदारी करून पैसे कमवायचे आहेत असे लोक घेत असतात. काही काही लोक विनोदी रिल्स बनवतात, मनोरंजनासाठी विनोदी व्हिडीओ बनवून सोशल मिडीयावर शेअर करून लाईक्स, कॉमेंट्स आणि फॉलोअर्सवर वाढवण्याचा प्रयत्न असतो. परंतु या मध्ये काही थोडे हुशार लोक असतात. ते लोक विनोदी रिल्स किंवा व्हिडीओ न बनवता चालु परिस्थिती वर विधाने करून आपले व्हिडीओ बनवत असतात.**

या हुशार गटामध्ये शैक्षणिक, राजकीय व सामाजिक चळवळीच्या लोकांचा भरणा असतो. अर्थात या गटातील सर्वच लोकांचा मुख्य उद्देश केवळ हाच असतो कि व्हिडीओ च्या माध्यमातून प्रसिद्धी मिळवायची. प्रसिद्धी मिळाली की लाईक्स आणि फॉलोअर्स वाढतात त्यामुळे युट्यूब कडून पैशाही मिळतो आणि नावाची जाहीरातही होते. आता मुळ मुद्दा आहे हा आहे की शैक्षणिक, राजकीय व सामाजिक गटातील लोक फक्त विनोदी व्हिडीओ का बनवत नसतील तर याचे मुख्य कारण असते विनोदी रिल्स व व्हिडीओ व्यक्ती बघतो आणि विनोद लक्षणे ठेवतो पण नाव लक्षात ठेवत नाही. याऊलट सध्य परिस्थिती वर बोलणाऱ्या लोकांचे व्हिडीओ लोक बघताना व्यक्तीचे नाव व व्यक्ती काय बोलला ते ही लक्षात ठेवतात. आणि नाव लक्षात राहीले म्हणजे यांचे दुकान सुरू झाले. वेगवेगळ्या कार्यक्रमाचे निमंत्रण मिळते हजारो रुपयांची सुपारी मिळते म्हणून दुकानदार लोक लोकांच्या एखाद्या भावनिक विषयाला हात घालुन मुद्दा छेडतात, आणि जसा भावनिक मुद्दा छेडला तसा तो व्यक्ती जास्त व्हायरल होतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे व्हायरल व्हायचे तर लोकांना एक मार्ग सापडला तो मार्ग म्हणजे फुले शाहु आंबेडकर यांचे नाव घेऊन जोर देऊन बोलायचे आणि संविधानाचा दाखला एखादे उदाहरण समजून सांगायचे. एवढे जरी केले तरी लोकांना वाटतं हा व्यक्ती विचाराचा आहे, फुले शाहु आंबेडकर यांचे नाव घेतो संविधानावर बोलतो. म्हणजे हा माणूस खुप ग्रेट आहे. परंतु आजपर्यंत चा इतिहास आहे. फुले शाहु आंबेडकर व भारतीय संविधान बहुतांश लोकांनी केवळ आणि केवळ स्वतः च्या फायद्या साठी स्वतः ची दुकानदारी चालवण्यासाठी करून घेतला आहे. राजकीय लोक फुले शाहु आंबेडकर यांचे नाव फक्त चळवळीमधील लोकांचे मत मिळावे, चळवळीमधील लोकांची सहानुभूती मिळावी म्हणून घेतात. सामाजिक चळवळीमधील लोकांचाही हाच उद्देश असतो. नाव प्रसिद्धी मिळाली आणि शैक्षणिक क्षेत्रात फुले शाहु आंबेडकर यांच्या जिवनावर जोर देऊन बोलणारे, आणि भारतीय संविधानाला राष्ट्रीय ग्रंथ समजणारे लोक केवळ आपला व्यवसाय चालावा व पैसा आणि प्रसिद्धी मिळावी म्हणून बोलत असतात आणि फुले शाहु आंबेडकर व भारतीय संविधानाचे नाव घेतल्यावर त्या व्यक्तीवर विश्वास ठेवून त्यांचा सन्मान करणाऱ्या लोकांची संख्या जास्त असल्याने यांना लवकरच प्रसिद्धी मिळते. म्हणजे हे लोक फुले शाहु आंबेडकर व भारतीय संधिधानाचा वापर केवळ वैयक्तिक फायद्यासाठी करतात आणि इतरांबद्दल त्यांना सहानुभूती आहे याचा देखावा करतात. फुले शाहु आंबेडकर यांचे नाव घेऊन भाषणे देऊन काही लोक आमदार खासदार झाले, काही लोक वेगवेगळ्या पक्षाच्या महत्वाच्या पदावर बसले. जेव्हा सोशल मिडियावर सक्रिय रहायचे तेव्हा फुले शाहु आंबेडकर यांच्या नाव घेऊन बोलायचे संविधानाचे दाखले द्यायचे. पुरोगामी विचार सरणीच्या लोकांना वाटायच असे माणस खुप कमी असतात म्हणून त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे म्हणून महाराष्ट्र भर त्यांचे वैचारिक भाषणाचे आयोजन करून महाराष्ट्रातील जनतेने लाखों करोडो रुपये त्यांना मिळवून दिले. परंतु राजकारणात व राजकीय पक्षाच्या पदावर गेल्यावर त्यांना फुले शाहु आंबेडकर व भारतीय संविधानाचा विसर पडला हि सामाजिक बेईमानी केवळ आणि केवळ महापुरुषांच्या नावावर दुकानदारी करणारेच करू शकतात. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात कामगिरी करणाऱ्यांनी वैचारिक बेईमानी केली तर त्यांचे अज्ञान म्हणून आपण काही गोष्टी सोडून ही देऊ. परंतु शैक्षणिक क्षेत्रात काम करून फुले शाहू आंबेडकर व भारतीय संविधानाचे नाव घेऊन प्रसिद्धी व पैसा मिळवलेले लोक वैयक्तिक जिवनात फुले शाहु आंबेडकर यांचे विचार जगत नाहीत. म्हणजेच काय तर हे केवळ फुले शाहू आंबेडकर यांच्या नावाचा वापर प्रसिद्धी आणि पैसा मिळाला म्हणूनच करतात. स्वतः ला विद्वान समजणारे, संविधानाला माणणारे समजणारे जेव्हा बुद्धीहीन आणि संविधान विरोधी वक्तव्य करून पुन्हा प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न करतात तेव्हा मात्र त्यांच्या बुद्धीची किव आल्या शिवाय राहत नाही. आम्ही स्पष्ट बोलतो, आम्ही समाजातील समस्येवर बोलतो, आम्ही फुले शाहू आंबेडकर व भारतीय संधिनाला मानतो म्हणणारे व त्या आधारे सुपाऱ्या घेणाऱ्या लोक संविधान विरोधी, फुले शाहु आंबेडकर यांच्या विचारा विरोधी लोकांशी हात मिळवून करून स्वतः चा फायदा करून घेतात आणि जनता व विचारधारा वाऱ्यावर सोडून देतात तेव्हा समजायचे याचे दुकानदारी करून पोट भरले. आणि म्हणून ज्या दुकानदाराचे पोट भरले तो दुकानदार ज्याचा जोरावर पोट भरल्या गेले त्यालाच धमकवण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा त्याची वैचारिक पातळी कळून येते. संविधान आणि फुले शाहु आंबेडकरांचे दाखले देणारे संविधान विरोधी व



सामाजिक तेढ निर्माण करणाऱ्या लोकांच्या सोबत दिसतात तेव्हा मात्र यांचा ढोंगीपणा उघड होतो. हल्ली सोशल मिडीयावर ज्ञानाचा आव आणणारे, आणि फुले शाहु आंबेडकर यांचे नाव जोर देऊन घेणारे वादग्रस्त विधाने करणाऱ्या भोंदुबुवा सोबत जातात तेव्हा ते ज्ञान, तो देशभक्ती सर्व सामान्य लोकांप्रती असलेली आपुलकी आपोआप कमी होते. नथ्थुराम गोडसे ला महात्मा म्हणून गांधींना शिव्या देणारे, लव जिहाद मुद्द्यावर हिंदुच्या मुलींना डुकराच्या दाताचे पाणी पाजा, सत्तेचे हिंदुकरण करा, मुस्लिमच दंगली घडवतात, येत्या दहा वर्षात मुस्लिम प्रधानमंत्री होईल व हिंदु महिलांना बुरखा घालावा लागेल, आम्ही साधु संत नसून बदमाश लोक आहोत असे वादग्रस्त विधान करणाऱ्या अनपड आणि बिनडोक व्यक्तीसोबत जर केवळ प्रसिद्धी साठी एक स्वतःला ज्ञानी आणि स्वाभिमानी व्यक्ती राहत असेल तर त्याला ज्ञानी नाही अज्ञानी म्हणावे लागेल, तो स्वाभिमानी नाही तर लाचार आणि दुकानदारी चालवण्यासाठी बनलेला टुकार म्हणावे लागेल. डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि संविधानाचे नाव घेऊन अनेकांची दुकानदारी खुप चांगली चालली, काहींची आजही चालत आहे. परंतु पैशासाठी प्रसिद्धी साठी काहीही करायला तयार होणाऱ्या आणि बदमाश व तोंडातून आग ओकणाऱ्या भोंदु सोबत राहणाऱ्या लोकांचा कावा समजून घेणे आवश्यक आहे. बऱ्याच लोकांची दुकाने केवळ प्रसिद्धीवर सुरू आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर व संविधानाचे नाव घेऊन जोर देऊन बोलले की सुपाऱ्या पण महाग मिळतात. सर्व सामान्य लोकांना प्रोत्साहन देण्यासाठी, समविचारी लोकांसोबत चर्चा करण्यासाठी, लोकांचे फोन उचलून त्यांचे जनमत समजून घेण्यासाठी ज्यांच्या कडे वेळ नसतो ते लोक सुपाऱ्या वाजण्यात मस्त मग्न असतात. थोडक्यात काय तर सुरवातीला डॉ बाबासाहेब आंबेडकर व संविधानाचे नाव घ्यायचे प्रसिद्धी मिळवायची, सुपाऱ्या घेऊन भाषणे करायचे आणि एखाद्या राजकीय पक्षाच्या दावणीला जाऊन बसायचे हा भाषणे देणाऱ्या लोकांचा धंदाच होऊन बसला. धंद्यात माझेच दुकान कसे चांगले हे प्रत्येक दुकानदार जाहीराती च्या माध्यमातून सांगण्याचा प्रयत्न करतो. परंतु ज्या लोकांनी पैसा, प्रसिद्धी देऊन पोटाची सोय करून दिली त्या लोकांचा अशा बदमाश लोकांना विसर पडतो. जास्तीचा पैसा आणि प्रसिद्धी साठी साठी फुले शाहु आंबेडकरांचे विचार केवळ पैशापुरते सांगायचे आणि वास्तवात ते विचार तुडवायचे हि यांची नैतिकता होय. बरेच शैक्षणिक क्षेत्रात काम करणारे व क्लासच्या नावाखाली पैसे कमवणारे लोक म्हणतात आम्ही सत्य तेच बोलतो. परंतु हा फक्त बोलण्याचा भाग आहे. अर्ध सत्य बोलुन केवळ आपले दुकान चालावे म्हणून सर्वांना खुश करण्याचा प्रयत्न केला जातो. शिक्षण हे महात्मा फुले व सावित्रीमाई फुले यांनी सुरू केले असे शिकवतात पण शिक्षक दिन कोणाच्या नावाने साजरा करावा हे सांगत नाहीत. संविधानाला मानतो म्हणतात पण चक्रध्वज अर्धात राष्ट्रध्वज याला तिरंगा म्हणतात. प्रधानमंत्री या पदाचा उल्लेख पंतप्रधान करतात. हि विद्यार्थ्यांची दिशाभूल असून संविधानाचा अवमान नाही का? ज्याला प्राईम मिनिस्टर याला मराठी मध्ये काय म्हणतात समजत नाही, किंवा समजून विद्यार्थ्यांना सांगण्याची हिंमत होत नाही त्यांना आदर्श कस म्हणावे? हा प्रश्न कायम असतो. सर्व सामान्य लोकांनी एक गोष्ट लक्षात घ्यावी ती म्हणजे लोक केवळ प्रसिद्धी मिळवण्यासाठी तुमच्या पाया पडतात. एकदा प्रसिद्धी मिळाली कि इतरांना तुच्छ व हिन समजून त्यांच्या आईवर संशय येईल असे वक्तव्य करतात. अशा डोंगी लोकांपासून सावध राहणे गरजेचे आहे. ज्ञानी सुशिक्षित व महिलांचा सन्मान करणारा व्यक्ती एखाद्या ला बोलताना त्याच्या आईवर संशय घेऊन कधीच बोलु शकत नाही. आणि जो व्यक्ती इतरांचा बाप तपासून घ्यायचा हल्ला देतो तो व्यक्ती महिलांचा सन्मान कधीच करू शकत नाही. एखाद्या व्यक्ती एखाद्या वेळी चुकतही असेल पण त्याला समजून सांगण्या ऐवजी तुझा बाप शेजारचा काका तर नाही असे बोलणाऱ्याचे थोबाड फोडले पाहिजे. कारण चुकणाऱ्या व्यक्ती बद्दल काय बोलायचे ते बोलले तरी काय नाही. पण आईवर संशय घेणारे हे बदमाश लोक महिला सन्मान कधीच करू शकत नाहीत. म्हणुन सर्व सामान्य लोकांनी दुकानदार लोक ओळखणे आवश्यक आहेत. कारण हे लोक स्वतः ची दुकानदारी चालण्यासाठी कोणत्याही स्तरावर जायला तयार होतात. यात निराशा सर्वसामान्य लोकांच्या हाती पडते. बदमाश लोक तर पैसा प्रसिद्धी मिळवून बाजूला होतात.

# नव्या संसद भवनातील असभ्यपणा



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**लोकसभेच्या प्रतिष्ठेला गालबोट लावण्याचे काम संसदेच्या विशेष अधिवेशनात शुक्रवारी (२२/९/२३) सत्ताधारी भाजपच्या खासदाराने केला आहे. भाजप खासदार रमेश बिधुरी यांनी एका विरोधी पक्षाच्या खासदाराला उद्देशून शिवराल भाषा वापरली आहे खासदार महोदयांच्या हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे या व्हिडिओमध्ये बिधुरी एका धर्माला उद्देशून टिपणी करतानाही दिसत आहे. संसद भवनाच्या नव्या इमारतीत नारी वंदन विधेयक पारित करून सरकारने नारीशक्तीचा एकीकडे सन्मान केला..तर दुसरीकडे भाजपच्या खासदाराने संसदेत कामकजा दरम्यान शिवराळभाषेचा वापर करून आपली असभ्याता दाखवून दिली. रमेश बिधुरी संसदेच्या विशेष अधिवेशनाच्या चौथ्या दिवशी लोकसभेचा चांद्रयान-३च्या यशबाबत बोलत होते.**

तेव्हा बसपाचे खासदार दानिश अली यांनी चांद्रयान-३ मोहिमेचं श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाटल्याचा आरोप केला. त्यावर रमेश बिधुरी संतापले आणि अपशब्दांचा उपयोग केला.

काय म्हणाले खासदार मोहोदय

"मोदीजी श्रेय घेत नाही. श्रेय देशाचे वैज्ञानिक घेत आहेत. ए भ**ए उग्रवादी..बोलू देणार नाही तुला कधी उभं राहून. सांगून ठेवतोय. ए उग्रवादी..कठुवे हे दहशतवादी आहेत उग्रवादी आहेत.. हे मुल्ला दहशतवादी आहेत. याचं काही ऐकू नका, बाहेर फेका याला", असं रमेश बिधुरी म्हणाले लोकसभा व राज्यसभेत प्रत्येक सभासदाला पूर्ण अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे. कोणत्याही शब्दांवर बंदी घातलेली नाही.मात्र बोलताना संसदीय शब्दांचा व संसदीय भाषेचा वापर सदस्यांनी करायला पाहिजे.आपल्या चर्चेतून बोलण्यातून इतर जात बद्दल व धर्माबद्दल व व्यक्तिगत टिप्पणी करताना आपला तोल जाणार नाही इतकी नैतिकता संसद सदस्यांनी नव्हे तर सर्वांनीच जपली पाहिजे..संसद सदस्यांवर तर जास्त जबाबदारी असते. आपण संसदेत बसलेला आहोत, आपण लोकांचे प्रतिनिधित्व करणारे आहोत,आपण जन प्रतिनिधी आहोत, संसदेत लोकांचे प्रश्न मांडायचे असतात, विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे द्यायची असतात प्रश्नोत्तराच्या तासात गोंधळ करू नये, बोलताना संसदी भाषेचा वापर केला पाहिजे इतकी नैतिकता व बंधन प्रत्येक संसद सदस्याने पाळायचे आहे.मात्र संसदीय कामकाज सुरू असताना सत्तारूढ व विरोधी सदस्य सभागृहात गोंधळ घालतात. संसदेचे कामकाज सुरळीत चालवणे ही सत्ताधारी पक्षाची मोठी जबाबदारी आहे. पण सत्ताधारी पक्षाजवळ ती सहिष्णुता व सामंजन असायला हवे त्याचा मागल्या काही वर्षात संपूर्ण अभाव दिसून आलेला आहे संसद हे लोकशाहीचे मंदिर आहे असे मानले जाते त्याचा अर्थ स्थिती सत्ताधारी व विरोधकाळात मतभेद असले तरी सुसंवाद व्हावा असाच हेतू असतो संवादातून मतभेद दूर करण्याला लोकशाही म्हणतात संसदीय मार्गाने महासंवादातून राजकारण करण्यापेक्षा आक्रमक विसंवादातून राजकारण करण्याचा पवित्रा सत्ताधाऱ्यांनी व विरोधकांनी पहिल्या दिवसापासून घेतला याला आदर्श म्हणायचे काय,.?

खरं तर संसदेचे विशेष अधिवेशन आशयपूर्ण व प्रेरणादारी व्हायला हवे होते आणि त्याची सुरुवात देखील तशी झाली होती मात्र सत्तारूढ पक्षाच्या खासदाराने आपल्या बेछूट वर्तनातून नव्या संसद भावनाला गालबोट लावले आहे. संसद हे लोकशाहीचे सर्वोच्च व्यासपीठ आहे. तेथे बोलला जाणारा प्रत्येक शब्द मोलाचा आहे. म्हणून सभागृहात बोलताना संयम राखणे. आवश्यक आहे.नव्या संसद भवनाच्या उद्घाटन प्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नव्या संसद भावना बद्दल जे बोलले ते अतिशय मार्मिक व प्रशंसनीय होते. नवीन संसद फक्त भवन नाही,



१४० कोटी भारतीयांच्या स्वप्नांचं प्रतिबिंब आहे. जगाला भारताच्या दृढनिश्चयाचा संदेश देणारं आमच्या लोकशाहीचं मंदिर आहे, असं नरेंद्र मोदी म्हणाले. हे नवं संसद भवन संकल्पाला सिद्धीला जोडणारं महत्त्वाचं दुवा ठरेल. नवं संसद भवन स्वातंत्र्य सैनिकांच्या स्वप्नांना साकार करण्याचं माध्यम बनेल. हे नवं संसदभवन आत्मनिर्भर भारताची पहाट पाहिलं. हे नवं भवन जुन्या आणि नव्याच्या अस्तित्वाचा साक्षीदार बनेल, असं मोदींनी सांगितलं.नरेंद्र मोदींनी नव्या वाटेवर चालून नवं ध्येय गाठलं जातं. नवा भारत नव्या वाटा शोधत आहे, असं म्हटलं. संकल्प नवा आहे, विश्वास नवा आहे. आज पुन्हा एकदा संपूर्ण जग भारताच्या संकल्पाच्या दृढतेला, भारतीय जनशक्तीच्या सृजनशक्तीला आदरानं पाहतं आहे, असं पंतप्रधानांनी सांगितलं.भारताला एक नव्या उंचीवर घेवू जात असतानाच भाजपच्याच एका खासदाराने असभ्य व बेछूट वक्तव्य करून संसदेच्या कामकाजाच्या प्रतिमेला डागाळण्याचा प्रकार केला.

संतापाच्या भरात अनेक राजकीय नेतेमंडळींची जीभ घसरल्याच्या घटना आजतागायत घडल्या आहेत. यामुळे ही नेतेमंडळी अनेकदा अडचणीत सापडल्याचंही पाहायला मिळालं आहे. भाजपाच्या एका खासदार महोदयांनी भर लोकसभेत केलेली शिवीगाळ चिंताजनक आहे..

पुढील वर्षी लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूक होणार आहेत. या निवडणुका अवघ्या काही महिन्यांवर येऊन ठेपल्या असतानाच लोकसभेत शिवीगाळ झाल्याचा प्रकार घडला आहे भाजप खासदार यावेळी एका विशिष्ट धर्माला उद्देशून टिप्पणी केल्याचे पाहायला मिळालं. खिशात राजकारणाची पातळी खालावली असल्याची चर्चा सुरू असतानाच रमेश बी धुरी यांच्या वक्तव्याने किती खालावला आहे हे पुन्हा स्पष्ट झाले आहे.

# परीस आणि परीसस्पर्श



कविता शिंगणे गायधनी
संपर्क क्र. 7588181500

आधुनिक केसरी

**परीस स्पर्श  खरतर या शब्दातच स्पर्श आहे. परिसाचा या शब्दानिशी अंतरंग ओले होते. बस हाच त्या शब्दाचा अर्थ. काळजाला स्पर्श करतो तो परिस स्पर्श पण परीस आणि परिसराचा स्पर्श या दोन्ही वेगळ्या संकल्पना आहेत हे आपण गृहीतच धरत नाही परीस खरतर काल्पनिक दगड जो लोखंडाला स्पर्श केला तर त्याचे सोने होते. सोनं...का महत्व एवढं  सोन्याच..  कारण सोन म्हणजे शुद्ध धातू, मौल्यवान धातू  आणि झळकणारा धातू म्हणून आपल्याला सोनं प्रिय. म्हणून परिस हवा.... सोन बनवणारा. पण परीसाने बनवलेले सोने दुसऱ्या लोखंडाला परीस स्पर्श देऊ शकतात का? ह्या विषयाचेच आज आपण चिंतन करूया.**

**करूनिंया स्नान नामा बाहेरी आला ।**
**परिसाचा मेळा घेऊनी हाती ॥१॥**
**घेऊनी परीस सांगे परीसासी ।**
**तुझा निश्चयेसी वोळखून घेई ॥२॥**
**ऐकतांची ऐसे नामयाचे बोलणे ।**
**परीसा कर जोडून विनवीतसे  ॥३॥**
**ऐसा आनंद सोहळा होतसे संपूर्ण ।**
**आनंदे निमग्न सर्व जाहले ॥४॥**
**एका जनार्दनी आनंद पै जाहला ।**
**आनंदाने गेला परिसा घरी॥५॥**

ज्ञानेश्वरीची परिशुद्धी करून तिचे शुद्ध स्वरूप लिहिणारे
शांतीब्रह्म श्री एकनाथ महाराजांचा हा अभंग आहे. संत श्री नामदेवांचे चरित्र लिहिताना हा अभंग सापडतो. परीसा भागवताची कथा या निमित्ताने सांगितली गेली आहे. भागवतकारांनी रुक्मिणी देवीस प्रसन्न करून परीस मिळवला होता.
एकमेकींची सुखदुःखे वाटून घेताना नामदेवांची पत्नी राजाई आणि परिसा भागवतांच्या कन्येच्या लक्षात येते की नामदेव महाराज तीर्थावळीस गेले असल्यामुळे त्यांच्या घरची परिस्थिती खालावलेली आहे.  कन्या आपल्या आईस  सांगते की नामदेव महाराजांच्या घरी आपदा आहे.  त्यांची परिस्थिती तितकीशी योग्य नाही. तेव्हा आपला परीस काही दिवसांसाठी त्यांच्या घरी नेऊन देते म्हणजे त्यांचे पण दारिद्र्य नष्ट होईल. म्हणून ती परीस राजाईला आणून देते. राजाई पण खुश होऊन जाते आणि बऱ्याच वस्तू सोन्याच्या करून घेते. आपली परिस्थिती सुधारून घेते. तीर्थावळीवरून जेव्हा नामदेव महाराज परत येतात. आणि पाहतात की आपली परिस्थिती अचानक बदलली आहे. त्यांनी कारण विचारता राजाई सांगते की चंद्रभागेमध्ये परिस सापडला आणि त्यामुळे आपला दैन्य काळ गेला.
नामदेव महाराज काय ते समजून जातात आणि मनामध्ये चिडतात. सधन परिस्थिती मागे नैतिकता नाहीये, कष्ट नाहीयेत हे ते समजून चुकतात.
 त्यांना वाटते की आपल्याकडे दैन्य होतेच कधी....?
 आपण विठ्ठल सेवक आहोत म्हणजे आपण कुबेरच आहोत. ज्या भक्ताला विठ्ठलाचा स्पर्श झालेला आहे त्याला वेगळ्या परीसाची गरजच काय?
एक दृष्टांत म्हणून माझा स्वतःचाच अनुभव आपल्याबरोबर शेअर करते. गोकुळाष्टमीच्या उत्सवाला मला श्री मुरलीधराचे चाळ स्वच्छ करून देण्याच्या सेवेचा योग आला आणि त्या चाळांना स्पर्श करताना  जी आनंदाची अनुभूती येत होती ती अनुभवताना असे वाटत होते की खरोखरच आयुष्यात वेगळ्या परीसस्पर्शाची गरजच नाहीये. खरोखरच अत्यंत श्रीमंत असल्यासारखा भाव मनामध्ये येत होता. देवाचे पाय सजवण्याची संधी आपल्याला मिळाली, तो अनुभव आपल्याला मिळाला तर या व्यतिरिक्त आपल्याला आयुष्यात काहीच नको.
आपल्याला परीसाची काय गरज म्हणून ते राजाईकडे परीस मागतात आणि तो चंद्रभागेमधे टाकून देतात.मात्र परीसा भागवत आपला परीस मागतात. तेव्हा नामदेव महाराज त्यांना सांगतात की चंद्रभागेच्या तिरी या. मी  परीस परत देतो. येताना चुका आणायला मात्र विसरू नका. म्हणजे तुमचा परीस तुम्हाला ओळखून घेता येईल. भागवत आणि नामदेव महाराज चंद्रभागेच्या तिरी असताना नामदेव महाराज चंद्रभागेत स्नान करतात आणि येताना बरेचसे दगड बाहेर घेऊन येतात आणि सांगतात की हे सगळे परीस आहेत आणि ह्यातला तू तुझा निश्चित परीस ओळखून घे.
 त्यानुसार भागवत सर्व दगड आणलेल्या चुकांना लावून बघतात आणि सर्व दगडांमुळे चुका सोन्याच्या होऊ लागतात. तेव्हा त्यांची चूक त्यांच्या लक्षात येते की नामदेव महाराज स्वतः परीस आहेत आणि म्हणून त्यांच्या स्पर्शाने दगड सुद्धा परीस झालेला आहे आणि मग ते त्यांचे शिष्य होतात.
तर असा हा परीसाचा महिमा आहे. परीसस्पर्शाने मनुष्य अंतर बाह्य बदलू शकतो. पण परीस महत्त्वाचा की परीसाचा स्पर्श.....?
परीस स्पर्श कुठल्याही रुपात स्पर्श करू शकतो .... कधी व्यक्ती, वस्तू, क्षण.....जे आपल्याला शुद्ध करत....आपली किंमत वाढवतात. थोडक्यात आपल्याला झळकवतो तो  परिस स्पर्श.

**परिसाचे अंगे सोनें झाला विळा ।**
**वाकणे या कळा हीन नव्हे ॥२॥**
**अंतरीपालट घडला कारण ।**
**मग समाधान तेची गोड ॥२॥**
**पिकलीया सेंद पूर्वकर्मा नये ।**
**अव्हेरु तो काय घडे मग ॥३॥**
**तुका म्हणे आणा पंगती सुरण ।**
**पृथक ते गुण केले पाके ॥४॥ ॥तु.गा. २४७८॥**

तुकाराम महाराज  म्हणतात अंतःकरण पालटणे हेच महत्त्वाचे काम आहे. मग जी समाधान स्थिती प्राप्त होईल तीच उत्तम आहे. लोखंडाचा वीळा



परीसाच्या स्पर्शाने सोन्याचा केला तरी तो आकृतीने वाकडा राहतोच. पण एकदा मूल्यात ,गुणात फरक पडला की आकृतीने काही फरक पडत नाही .त्याची किंमत ही सोन्यासारखीच होते. तो वाकडा असल्यामुळे त्याला काही हिनत्व येत नाही किंवा त्याला कमीपणा येत नाही. सुरण हा खाजरा असला तरी तो शिजवल्यावर त्याचा पूर्वीचा दोष निघून जातो आणि तो पंक्तीत वाढण्याजोगा होतो. म्हणजे त्याची चविष्ट भाजी बनते.सांगायचा मुद्दा हा की एकदा परीसस्पर्श झाल्यानंतर  पूर्वीचे दोष किंवा पूर्वीचे गुण बघायचे नसतात किंबहुना ते दोष राहतच नाहीत. त्यात अमुलाग्र बदल घडतो. हे मान्यच.

**परिसासी लोह लागती ते कनकाची होती ।**
**तया मागील ते गति बोलों नये ॥१॥**
**आड ओहोळ वाहती ते गंगेसि मिळती ।**
**तया मागील ते गती बोलों नये ॥२॥**
**काकविष्ठा करिती तेथे पिंपळ होती ।**
**तया मागील ते गती बोलों नये ॥३॥**
**परद्वारी होती पतिसरसे होय सती ।**
**तया मागिल ते गति बोलों नये ॥४॥**
**नामा मध्यम जाती परिस प्रेमळ भक्ती ।**
**तया मागील ते बोलों नये ॥५॥**

अर्थात नामदेव महाराज म्हणतात की परिसाचा एकदा लोखंडाला स्पर्श झाला की लोखंडाचे सोने बनून जाते. मग त्याच्या मागच्या गुणांबद्दल कशाला बोलायचे....?
एखाद्या चोराला कोणाच्या चांगल्या सल्ल्याने उपरती झाली आणि त्याने चोरी सोडून नीट संसार करायला सुरुवात केल्यानंतर लोकांनी त्याच्या मागच्या आयुष्याबद्दल का बोलत रहावे.....? आज तो कसा आहे हे बघावे. पण साधारणतः असे वागले जात नाही लोकं गुण बघत नाहीत दोषच बघत राहतात.
लोखंड पाण्यामध्ये गंजून जाते आणि मग ते काही कामाचे राहत नाही. परंतु एकदा ते परीसस्पर्शाने सोन्याचे झाले की त्याला सोन्याचे मोल येऊन जाते. आड, ओहोळ यांचे पाणी नदीशी एकरूप होऊन जाते. मग त्यांची मागची  जी  संथगती होती त्याच्याबद्दल कशासाठी बोलायचे.....?
कावळ्याच्या विष्ठे पासून पिंपळाची उत्पत्ती होत असते. परंतु पिंपळाला मात्र अत्यंत पवित्र मानले जाते आपण तेव्हा थोडेच विचार करतो की कावळ्याच्या विष्टेमुळे पिंपळाची उत्पत्ती झालेली आहे. नामदेव महाराज म्हणतात की एकदा परीसाने स्पर्श केल्यानंतर जी समाधानकारक, गुणवत्तापूर्ण स्थिती निर्माण होते त्याच्या पूर्वगती संबंधी बोलू नये.  संत नामदेव महाराज म्हणतात मी मानवकुळात जरी जन्माला आलो असलो तरी भगवंताच्या प्रेमरूपी परीसाचा  स्पर्श मला  झाला आहे त्यामुळे मी भगवंताशी एकरूप झालोय मग मी माणूस होतो याचा विचार करण्याची आता गरज नाही.  परीस स्पर्श असा इतका महत्त्वाचा असतो की जो वस्तूला काय किंवा व्यक्तीला काय अंतर बाह्य बदलून टाकतो आणि त्याच्या गुणांमध्ये फरक घडवून आणतो.
पण परीसाबद्दल पण तर बोलायला हवे.

**रामदास स्वामी म्हणतात,**
**परीस आपणा ऐसे करीना ।**
**सुवर्णे लोहो पालटेना ।**
**उपदेश करी बहुत जना ।**
**अंकित सद्गुरुचा ॥१५॥**
**शिष्यास गुरुत्व प्राप्त होये ।**
**सुवर्णे सुवर्ण करितां न ये ।**
**म्हणौनी उपमा साहे ।**
**सद्गुरुसी परिसाची ॥१६॥ दा.द.१.स.४**

इथे परीस आणि परिसाचा स्पर्श यात फरक दिसतो.
संत रामदास स्वामी म्हणतात की सद्गुरूंना मात्र परीसाची  उपमा देऊ नये कारण परीसाने लोखंडाला सोने केले तरी जे लोखंड सोने होते ते दुसऱ्या लोखंडाच्या वस्तूला सोने करू शकत नाही. जो परिस असतो तोच फक्त लोखंडाला सोने करू शकतो. परंतु सद्गुरु मात्र शिष्याला जेव्हा उपदेश देतात, त्याला स्पर्श करतात त्यानंतर शिष्य इतका अंतर बाह्य बदलून जातो की तोही पुष्कळ लोकांना उपदेश करून या भवसागरातून तारू शकतो. याचाच अर्थ की शिष्याला पण गुरु,  गुरुपद प्राप्त करून देतात. म्हणजेच ते आपल्यासारखाच अजून एक परीस निर्माण करतात. आपल्यासारखा अजून एक गुरु निर्माण करतात आणि म्हणून रामदास स्वामी म्हणतात की परिसाची उपमा सद्गुरूंना देऊ नये. इथे परिस आणि परिसाचा स्पर्श यातले महत्त्वाचे काय हे लक्षात येते किंबहुना दोन्हीमध्ये काय अंतर असते हे समजून येते.
परीसस्पर्श जेव्हा सद्गुरुचा आणि अर्थात त्याद्वारे परमात्म्याचा  होतो ....आपण आपल्यालाच विसरुन जातो ...पण क्षणभरच.....आपण परिस स्पर्शातच नहात राहतो...त्या झळकण्याचं (अहं) इतकं अप्रूप असतं आपल्याला.... की आपण, परीस आहे म्हणून आपण झळकतो आहोत हेच विसरून जातो. मंडळी परिस स्पर्शा पेक्षा परिस महत्वाचा... नाही का..? तो शोधायला हवा... सांभाळायला हवा....परीस असला तर स्पर्श सोनेरी आहेतच की ..होतातच की....परीस नसला तर आपण लोखंडचं आहोत हे जोवरी उमगत नाही तोवर परीस स्पर्शाची महती काय गुणवावी...? परीसा भागवतांना परीसापेक्षा, आपण लोखंड आहोत आणि नामदेव महाराज परिस आहेत हे उमगले आणि म्हणून ते त्यांचे शिष्य झाले. सद्गुरूंच्या आशीर्वादानेआपण एवढेच म्हणायचे की आपले सोने व्हायला परीस असायलाच हवा. आपण कोणासाठी परिस होऊ शकतो का... बनु शकतो का ...कोणाच्या आयुष्याचं सोन करू शकतो का ..? हे ही बघायला हवे..... पर्जन्याचा  परीस स्पर्श झाल्यानंतर भेगाळलेली जमिन पण हिरवी होते......सोने पिकवून जाते....आपल्या परीस स्पर्शाने कोणाच्या आयुष्यात आपण हिरवे क्षण आणु शकलो तर..  ? हा विचार महत्त्वाचा. शेवटी परिस महत्वाचा मग स्पर्श सृजनाचेच.

# सत्यशोधनाची १५० वर्षे..




प्रा. डॉ. प्रवीण बनसोड
संपर्क क्र. 9423425129

आधुनिक केसरी

**२४ सप्टेंबर १८७३ रोजी महाराष्ट्राच्या इतिहासात एक अतिशय महत्त्वाची घटना घडली. महाराष्ट्राच्या वैचारिक, सांस्कृतिक आणि सामाजिक इतिहासात या घटनेमुळे नवे संदर्भ जोडले गेले. लेखन व पत्रकारितेचे नवे पर्व निर्माण झाले, आणि समाजाच्या सामाजिक संरचनेत आमूलाग्र परिवर्तन घडले. स्त्रीयांच्या जीवन-जाणीवा अधिक प्रगल्भ झाल्या. मूक समाजाला नवा आवाज आणि महाराष्ट्राला नवी दृष्टी मिळाली; त्या घटनेला यावर्षी १५० वर्षे होणार आहेत. २४ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा जोतीराव फुले यांनी 'सत्यशोधक समाजाची स्थापना करून महाराष्ट्राला नवे विचारपीठ खुले करून दिले.**

धर्म राज्य भेद मानवा नसावे। सत्याने वागावे ईशासाठी ||
ख्रिस्त, महंमद, मांग ब्राम्हणासी। धरावे पोटाशी । बंधू परी
निर्मिकाचा धर्म सत्य आहे एक। भांडणे अनेक कशासाठी ?
असा विश्वव्यापी मानवतेचा विचार घेऊन महात्मा जोतीराव फुले यांनी 'सार्वजनिक सत्यधर्माचा विचार स्पष्ट केला. मानवी समता व बंधुता यावर आधारीत मानवधर्माच्या प्रसारासाठी सत्यशोधक समाजाची उभारणी केली. अज्ञान - अंधश्रद्धा - अस्पृश्यता-विषमता याला नकार देऊन ज्ञान-विज्ञान-समानता आणि बंधुता यावर आधारीत समाजाची उभारणी करण्यासाठी सत्यशोधक समाजाची संकल्पना जोतीरावांनी मांडली, त्यामध्ये १) ईश्वरभक्ती करण्यासाठी कोणत्याही मध्यस्थाची गरज नाही. २) भटभिक्षुक धर्माचा धाक घालून अडाणी जनतेची पिळवणूक करतात त्यामुळे अडाणी लोकांची धार्मिक गुलामगिरीतून मुक्तता करणे. ३) जमीनदार व सावकार यांच्या मगरमिठीतून शेतकऱ्यांची सुटका करणे.४) शिक्षण सर्वांना सहज मिळावे व सर्वांनी शिक्षण घ्यावे म्हणून प्रयत्न करणे 5) मनुष्य जन्माने श्रेष्ठ ठरत नसून तो गुणाने  श्रेष्ठ ठरतो, त्यामुळे जन्मजात श्रेष्ठत्त्वावर प्रहार करणे. या प्रमुख उद्दिष्टांसाठी सत्यशोधक समाजाची उभारणी करण्यात आली. त्यानुसार प्रत्यक्ष कृती कार्यक्रम धडकपणे राबविण्यास सुरुवात झाली.
सर्वसामान्य लोकांना ज्ञान मिळावे म्हणून जोतीराव जीवाचा आटापिटा करीत असतांनाच अडाणी समाजाला मानसिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी प्रत्यक्ष कृतीकार्यक्रम राबवित होते. भटजीशिवा लग्न लावण्यात सत्यशोधक समाजास प्रथम यश १८८० साली आले. त्यानंतर १८८४ सालापर्यंत ओतूर गावच्या साळी, माळी व तेली समाजाच्या लोकांनी सत्यशोधक पद्धतीने लग्न लावलीत एकीकडे जन्मजात श्रेष्ठत्त्व नाकारत  भितीमुक्त जीवन जगण्याची प्रेरणा देत असतानाच शिक्षण आणि शेतक-यांच्या प्रश्नांबाबत सत्यशोधक समाजाने लक्ष दिले. त्यासाठी 'सत्यशोधक जलसे' निर्माण करण्यात आले. १८७७ साली महाराष्ट्रात दुष्काळ पडला होता. या दुष्काळात गोरगरीबांसाठी महात्मा फुले यांनी अन्नछत्र उभारले. मे १८७७ मध्ये सत्यशोधक समाजाने एक विनंतीपत्रक प्रसिद्ध करून मदतीचे आवाहन केले. या अन्नछत्राची जबाबदारी समाजाच्या कार्यकर्त्यांनी नेटाने पार पाडली. व्यसनांमुळे बहुजन समाजातील अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली असल्यामुळे सत्यशोधक समाजाने दारूच्या नवीन दुकानांना प्रखर विरोध केला. १८ जुलै १८८० रोजी पुणे नगरपरिषदेचे कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष प्लॅकेट यांना पत्र लिहून महात्मा फुले यांनी नगरपालीकेने दारुच्या गुत्त्यांना परवानगी देऊ नये असे आवाहन केले होते.शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत सत्यशोधक समाज सदैव अग्रभागी होता. शेती व शेतकऱ्यांच्या परिस्थितीबाबत विवेचन आणि विश्लेषण करून लेख, कविता, पुस्तके, जलसे लिहिण्यात येत असत. कृष्णराव पांडुरंग भालेकर यांनी 'सुशिक्षण गृह' (१८८४), दीनबंधू सार्वजनिक सभा (१८८४) स्थापन करून मागास व स्त्रीयांच्या प्रशिक्षणासाठी प्रयत्न केले. दीनबंधू सार्वजनिक सभेच्या माध्यमातून
 एक लाख सहयांचा अर्ज पार्लमेंटकडे केला होता. 'शेतकरी व कारागीर यांच्या मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण मिळावे' यासाठी हा अर्ज करण्यात आला होता. १८८९ साली 'दीनबंधू फ्री स्कूल 'ची स्थापना भालेकरांनी केली होती. कृष्णराव भालेकर हे सत्यशोधक समाजाचे खंदे कार्यकर्ते व महात्मा फुले यांचे कट्टर समर्थक होते. भालेकरांनी पोवाडे, लावणी लिहिल्या, तसेच 'बळीबा पाटील' ही कादंबरीसुद्धा लिहिली 'दीनबंधु' 'दीनमित्र, 'शेतकऱ्याचा कैवारी' ही वृत्तपत्रे चालवून सत्यशोधक समाजाचा प्रचार केला.
कृष्णराव भालेकर यांच्याप्रमाणेच ज्ञानगिरी बुवा, धोंडीराम कुमार, ग्यानोबा झगडे, गणपतराव सखाराम पाटील, मुकुंदराव पाटील, तुकाराम पिंजन, भास्करराव जाधव, केशवराव विचारे गुरुजी, केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर, सत्यशोधक दासराम, आनंदस्वामी यांनी सत्यशोधक चळवळ तळागाळापर्यंत पोहचविली. सत्यशोधक आनंदस्वामी यांनी फार मोठा



शेतकऱ्यांचा उठाव घडवून आणला होता. इतिहासात हा उठाव सातारा बेड १९२० या नावाने प्रसिद्ध आहे.
 एकोणिसाव्या शतकातील वृत्तपत्रे समाजातील शेतकरी-कष्टकऱ्यांच्या प्रश्नांची चर्चा करीत नसल्यामुळे लोकजागृतीसाठी वृत्तपत्रांची नितांत गरज निर्माण झाली. अशावेळी कृष्णराव भालेकर यांनी १ जानेवारी १८७७ रोजी "दीनबंधू' हे सत्यशोधक समाजाचे पहिले वृत्तपत्र सुरु केले. त्यानंतर १८७७ ते १९३० या कालखेडात जवळपास ६० नियतकालीके सत्यशोधकांनी काढली. 'दीनमित्र ( गणपतराव पाटील १८८८), 'राघवभूषण' ( गुलाबसिंह कौशल्य १८८८), 'अंबालहरी' (कृष्णराव भालेकर १८८९), 'शेतकऱ्यांचा कैवारी (कृष्णराव भालेकर १८९२), 'मराठा दीनबंधू (भास्करराव जाधव १९०१), दीनमित्र ( मुकुंदराव पाटील १९१०), 'विश्वबंधू ( बळवंतराव पिसाळ १९११), जागरूक ( वालचंद कोठारी १९१७), जागृति ( भगवंतराव पाळेकर १९१७), 'डेक्कन रयत (अण्णासाहेब लठ्ठे १९१८), 'विजयी मराठा' (श्रीपतराव शिंदे १९१९), 'सत्यप्रकाश' (नारायण विभूते १९१९), गरिबांचा कैवारी' (बाबूराव यादव १९२०), 'भगवा झेंडा' (दत्ताजीराव कुरणे १९२०), 'तरुण मराठा' सखाराम पांडूरंग सावंत १९२०), राष्ट्रवीर ( शामराव देसाई १९२१), प्रबोधन (के. सी. ठाकरे १९२१), संजीवन (द. भि. रणदिवे १९२१), सिंध मराठा' (दत्तात्रेय अणावकर १९२४), 'हंटर' (खंडेराव बागल १९२५), 'मजूर' (रामचंद्र लाड १९२५), कर्मवीर ( शि. आ. भोसले १९२५), 'नवयुग' ( बाबासाहेब बोले १९२६), 'सत्यवादी' (बाळासाहेब पाटील १९२६), 'ब्राम्हणेतर' ( व्यंकटराव गोडे १९२६) 'कैवारी" दिनकरराव जवळकर १९२८) यांसारखी नियतकालीके सत्यशोधक चळवळीत लोकजागृती घडवित होती. 'जागृति' हे साप्ताहिक बडोद्याहून, तर "सिंध मराठा' हे कराचीहून प्रसिद्ध होत असे.  सत्यशोधक चळवळीतील
 वृत्तपत्रे आणि पुस्तकांनी १८७३ पासून शंभर वर्षे लोकजागृती घडविली. आज जे काही सकारात्मक परिवर्तन समाजजीवनात घडल्याचे आपण पाहतो, त्यामागे सत्यशोधक चळवळीचे फार मोठे कार्य आहे, हे कोणीही नाकारू शकणार नाही.

# संतापाशी बहु असावे मर्यादा । फलकटाचा धंदा उर फोडी ॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**संत तुकाराम महाराजांचे जीवन चरित्र आणि त्याच्या जोडीने आलेले त्यांचे अलौकिक, अभंग वाङ्मय हे तुम्हा-आम्हासाठी नित्य नित्य पथदर्शी आहे. संत तुकाराम कालवश झाल्यानंतर त्यांचे लेखन हळूहळू समाजमनात आणखी खोलवर रुजायला लागले. तुकोबांनी आपल्या अभंग-कीर्तनाच्याद्वारे लोकमन खोलवर नांगरण्याचे महत्कार्य केले. याचा परिपाक असा झाला की तुकोत्तर कालीन प्रत्येक मराठी सृजनाला तुकोबा आपले मित्र वाटायला लागले. तुकोबा जणू त्यांच्या अभंगातून आपल्याला बोलताहेत अशी अनुभूती यायला लागली. दिवसेंदिवस शिक्षणाचा प्रचार व्हायला लागला आणि मराठी लेखकांचे प्रमाण वाढायला लागले.**

कोणतेही वाङ्मय ही त्या त्या व्यक्तिमत्वाची अनुभूती असते, परंतु जगद्गुरू तुकोबांच्या संसार विषयक निरनिराळय अनुभूती त्यांना आणि तद्नंतर वाचकांना नखशिखांत हलवून सोडतात. तुकारामांची भजने या ग्रंथात विनोबाजी लिहितात, "तुकारामाने जी अध्यात्मिक उंची गाठली ती शेवटल्या ५-६ महिन्यात विशेषत्वाने गाठली असावी." याचा अर्थ असा की; मानवाच्या जीवनात अनुभूती यायला माणसावर अनेक कठीण प्रसंग चालून यायला हवेत आणि त्याच्या सोबतीने त्यातील अध्यात्मिक वृत्ती जागृत असावी. असे जेंव्हा होते तेंव्हा त्या व्यक्तीकडून उच्च निर्मिती होऊ शकते. माझ्यासारखे अगदी अर्ध्या हळकुंडाने पिवळी झालेली माणसे लगेच जीवनाचे सर्वोच्च, अवीट, अविनाशी तत्व मांडूच शकत नाहीत. तूकोबांनी संसारिक, सामाजिक, शारीरिक आणि अध्यात्मिक स्तरावर अनेक जिव्हारी घाव लीलया झेलले. त्या घावांचा त्यांच्यावर खोलवर परिणाम झाला, त एहोनेही साहजिक होते कारण तुकोबा संसारिक व्यक्तिमत्व होते. अनेक स्तरावर होणारा जीवघेणा त्रास आणि त्यातून लागलेली भजनाची ओढ आणि त्यातून मिळालेली चित्त शांती तुकारामासारख्या संसारी माणसाला पारमार्थिक करून गेली. एक एक अभंग म्हणजे एक एक सर्वोच्च अनुभूती होत गेली. त्यातून सहजपणे तुकाराम महाराजांमध्ये स्थितप्रज्ञा विराजमान झाली. याच्या जोडीने अनेक ग्रंथांचे वाचन, त्यावर चिंतन त्याच्या जोडीला भजन आणि त्यातून सरळ सरळ निरपेक्ष, निर्मनुष्य स्थळी कीर्तन किंवा आत्मसंवाद! त्यातीलच हा एक अभंग.

**तुकारामनीती**
**भाग -68**

संतापाशी बहु असावे मर्यादा । फलकटाचा धंदा उर फोडी ॥१॥
बासर तो भुंके गाढवाचं परी । उठे पाठीवरी यम दंड तेणे ॥धृ॥
समयो नेणे ते वेडे चाहाटळ । अवगुणाचा ओंगळ मान पावे ॥२॥
तुका म्हणे काय वाया चाळवणी । पिटपिटघाणी हागवणीची ॥३॥
(१२३९)

संत कोणाला म्हणावे? याचे उत्तर अनेकांनी अनेकवेळा अनेक पद्धतीने आपआपल्या ग्रंथात लिहून ठेवले आहे. भिक्षाटन करणाऱ्या ज्ञानदेवांना धर्ममार्तंडांनी भिक्षा न देता मारले, भिक्षाटनाची झोळी फाडून टाकली आणि शिव्याची लाखोली वाहून गावातून हाकलून दिले. याचा खोलवर परिणाम झालेले ज्ञानेश्वर घरी आले आणि घराचे दार म्हणजेच झोपडीची ताटी लावून बसले. त्यावेळी ज्ञानदेवांची चिमुकली बहिण मुक्ताई तिथे आली आणि आपल्या दादाला दार उघडायला आवाज दिला. तर चक्क ज्ञानदेव दार बंद करून बसले होते. त्यावेळी चिमुकल्या मुक्ताईने आपल्या ज्ञानदादाला सहजपणे ताटीच्या अभंगात

संत तोचि जाणा जगी। दया क्षमा ज्याचे अंगी॥
लोभ अहंता नये मना। जगी विरक्त तोचि जाणा॥
इहपर लोकी सुखी। शुद्ध ज्ञान ज्याचे मुखी॥
मिथ्या कल्पना मागे सारा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा॥

असा उपदेश करतात. इथेही मुक्ताईचा अनुभवच कामाला आला. याप्रसंगी मुक्ताई अगदी १४-१५ वर्षांच्या असतील, परंतु त्यांनी आपल्या आई-बाबा आणि तीनही दादांवर आलेली संकटे जवळून पहिली होती, अनुभवली होती. आई-बाबांच्या देहांत प्रायश्चित्त नंतर बिचारी, चिमुकली मुक्ताई खूपच एकटी एकटी झाली असावी. माय-बाबांच्या अंगाखांद्यावर खेळायच्या वयात ती त्यांच्या प्रेमाला पारखी झाली. असे असले तरी जीवनाचे दुःख पचवून ती आपल्या दादासोबत राहून चिंतनगर्भ झाली. याचाच परिपाक म्हणजे हे ताटीचे अभंग! अत्यंत कमी वयात अत्यंत काठीनप्राय जीवनानुभव घेतलेल्या संत मुक्ताबाई आपल्या ज्ञानदादाला उपदेश करतात. त्या म्हणतात, दादा माणूस जीवनात संत उघाच होत नाही. संतांच्या अंगी असणारी सर्वात महत्वपूर्ण लक्षण म्हणजे दयार्द्र अतःकरण आणि क्षमाशील वृत्ती! संताच्या जीवनातून लोभ, अहंकार समूळ नष्ट होऊन तो विरक्त असावा. स्वर्गलोक, मृत्युलोक इत्यादी ठिकाणचे सुख त्याच्यासाठी सारखेच असून त्याने सातत्याने जगाला शुद्ध ज्ञान देण्याचा प्रयत्न करावा. तेंव्हा ज्ञानदादा लोकांनी तुम्हाला मारले, तुमची झोळी फाडली आणि घाण घाण शिव्या देऊन हाकलून दिले हा त्यांचा लोकधर्म त्यांनी निभावला, परंतु त्यातून तुम्हीं दुःखी, नाराज होऊन घराचे दार लावून स्वतःला बंद करून घेणे म्हणजे संतपण नव्हे. असा सरळ साधा उपदेश करून मुक्ताई आपल्या ज्ञानदादाला केवळ भौतिक घराचेच नाही तर सर्वांगीण अध्यात्मिक विचारांचे दार उघडायला भाग पडतात. त्यांतर संत ज्ञानदेवांकडून अनेक महान ग्रंथांची निर्मिती झालेली आपल्याला दिसून येते. या सगळ्याचा प्रसंग आणि लेखणीचा प्रभाव संत तुकोबांच्या जीवनावर दिसून येतो.

तुकोबांचा काळ बरा जरी असला तरी भक्ती, अध्यात्मिक क्षेत्र बजबजपुरीने व्यापले होते. उच्च-नीचता, कर्मकांड, वर्णव्यवस्था अगदी समाजाच्या मुळाशी पोचली होती. बाह्य वेषधारी अनेक बुवा जादू-टोणा, बुवाबाजी करून समाजाची भूलावणूक- फसवणूक करत होते. भोळा-भाबडा, गरीब सामान्य समाज दिवसाढवळ्या लुटला जावू लागला. माणसामाणसात भेद



केला जाऊ लागला. अनेक संत म्हणवणाऱ्या वेषधारी बुवांनी तर सर्वच मर्यादा ओलांडल्या असाव्यात. त्याचाच परिपाक म्हणजे तुकोबा सहजपणे असे अभंग बोलते झाले असावेत. संत म्हणजे त्याला काहीतरी मर्यादा असल्या पाहिजे. संसारिक किंवा धंदेवाईक माणूस आणि संत यात बाहेरून आणि वर्तनावरून वेगळेपण दिसलेच पाहिजे. असे वेगळेपण संताच्या ठायी नसेल तर तो केवळ फलकटाचा म्हणजेच व्यर्थ भुसकटाचा, उरफोडी व्यवहार करतो आहे, तो संत असूच शकत नाही. तुकोबा अशा वेषधारी संताना बासर म्हणजेच भटक्या, स्वच्छंदी, अमर्यादित, ओढाळ असे संबोधतात. असा बासर जो बोलतो त्याचे बोलणे म्हणजे कुत्र्यासारखे किंवा गाढवासारखे भुंकणे होय. असा व्यर्थ बडबड करणारा कधीच स्वर्गात जाऊ शकत नाही, त्याची जागा यमपुरीत आहे म्हणजे नरकात आहे! स्वतःला संत म्हणवून घेतांना अनेकांना काळ-वेळ-वयाचे भान रहात नाही. दिसायला संत दिसणारा माणूस अवगुणांचा मूर्तिमंत पुतळा दिसतो. तो वेषधारी संत म्हणजे चाहटळ म्हणजेच भांडकुदळ, लाव्यालावी करणारी, व्यभिचारी स्त्रीच आहे असे तुकोबा संबोधतात. शेवटी असे बाह्य वेषधारी संत करत असलेला उपदेश हा अगदी घन, दुर्गंधीयुक्त विष्टा म्हणजेच केवळ हगवण आहे असे लिहून नेहमीप्रमाणे या अभंगात सुद्धा तुकोबा आपल्या रोखठोक, सडेतोड लेखणीचा कळस गाठतांना दिसतात. ते कुणाचीही भीडभाड ठेवत नाहीत.

माय-बापहो, मी केवळ संतांच्या पायाखालील एक सूक्ष्म रजकण आहे. मी अन्य कुणीही नाही, केवळ संतांच्या वचनांचा वाचक, प्रसारक आहे. माझ्यातही अनंत दोष ठासून भरले आहेत. केवळ मी विविध संतांच्या महान लेखणीतून पाझरलेल्या एकेका अनुभूतीचा वाचक आहे. मी विकार रहित नाही. मी हे संत वचनांचे जे विश्लेषण करतोय ते केवळ अल्पमतीला सुचेल तसे विवेकपूर्ण विवेचन करण्याचा प्रयत्न करतो आहे. याशिवाय संतांच्या महान वचनांचा वर्तमानात लोकांनी अंगीकार करून आपले हित साधावे आणि धकाधकीच्या जीवनात या विचारांनी कुठे तरी स्थैर्य मिळावे त्याकरिता हा लेखनप्रपंच चालू आहे. वर्तमान काळात वारकरी सांप्रदायिक जबाबदार मंडळींनी आपले दायित्व सिद्ध करतांना आपल्या पूर्वजांनी आखून दिलेल्या मार्गावर चालण्याचा प्रयत्न करावा. त्यांचा महान मार्ग आणखी स्पष्ट, सोपा कसा होईल( ?) यासाठी प्रयत्नरत राहावे लागेल. आपण एखाद्या व्यक्तीचा विचार सांगत असतांना त्यातील काहीतरी आपल्या जीवनात उतरवण्याचा प्रयत्न झाल्यास निश्चित प्रत्येकाचे कल्याण झाल्याशिवाय राहणार नाही. असे झाल्यास संतांचे स्वप्न पूर्ण होऊन लोक सगळीकडे आनंदी, निरोगी, विचार समृद्ध दिसायला लागतील! हीच एक माफक अपेक्षा! जय तुकोबाराय!

# संजीवनी मराठे यांच्या कवितेतील माहेरचे वर्णन



प्रा .सौ. शारदा वानखेडे
संपर्क क्र. 9823066606

आधुनिक केसरी

**मराठी साहित्यातील सुप्रसिद्ध कवयित्री , कवी संजीवनी तथा सौ.संजीवनी रामचंद्र मराठे यांचा जन्म १४ फेब्रुवारी १८९६ रोजी पुणे येथे झाला. वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी त्यांचा पहिला काव्यसंग्रह त्यांच्या वडिलांनी कौतुकाने प्रसिद्ध केला होता. "काव्य संजीवनी", "चंद्रफूल", "गंमत", "परीमला", "राका", "संसार","चित्रा", "छाया" ,इ. काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. संजीवनी बाईंच्या कवितेवर रविकिरण मंडळाचा व भा.रा. तांबे यांच्या कवितेचा खूप प्रभाव होता. विविधांगी गीतरचना व सुरेल गायनासाठी प्रसिद्ध असलेल्या आधुनिक कवयित्री म्हणून मराठी साहित्यात त्यांना ओळखले जाते. एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ मुंबई येथे त्यांनी बी.ए.व.एम.ए.चे शिक्षण घेतले.**



त्यांचे अनुभव विश्व तसे साधे व्याप व व्यामिश्र दृष्टीने मर्यादित असे असले तरी या कवयित्रीने आत्मप्रत्येयाशी व स्वतःच्या काव्य प्रकृतीशी प्रामाणिक राहून निर्मितीत स्वत्व राखले आहे.

विपुल साहित्य संपदा व अनेक पुरस्कारांच्या मानकरी असणाऱ्या संजीवनी मराठे यांनी केलेल्या विविधांगी काव्यरचनेत स्त्री सुलभ भावनांचेही चित्रण आलेले दिसून येते.त्यांच्या एका कवितेत त्यांनी केलेले माहेरचे वर्णन फारच भावस्पर्शी आहे. हे वर्णन प्रत्येक स्त्रीला तिचे स्वतःचे वर्णन आहे असेच वाटते. प्रत्येक स्त्रीला तिच्या माहेराची ओढ ही असतेच. जेवढा आनंद तिला माहेरी जाताना होतो .तेवढाच आनंद तिला तिची आई तिच्या सासरी आल्यावर किंवा येणार असेल तेव्हा होतो. अशीच एक सासुरवाशीन स्त्री जिची आई तिच्या घरी भेटीसाठी येणार आहे. अशावेळी तिच्या मनातील भाव-भावना कवयित्रीने ,"आज घरास यायची " या कवितेतून व्यक्त केल्या आहेत. कवयित्री म्हणतात,

आज घरास यायची माझी माऊली मायेची
माझ्या संसारावरती तिची दृष्टी फिरायाची
माझा जीव आनंदाने आला बाई मोहरून
उत्साहाचे गीत माझ्या मुखीं आलें ओथंबून

प्रत्येक आईला लेकीचे सुख पाहायचे असते. एकदा का लेकीचा संसार सुखाचा झाला की, तिच्या व्याकुळ जीवाला गारवा मिळतो. अशीच कवयित्रीची आई ही त्यांच्या संसारी येणार असल्यामुळे कवयित्री खूप आनंदून गेल्या आहेत. आपल्या संसारावर आपल्या प्रेमळ आईची दृष्टी फिरावी.आपला सुखाचा संसार तिने एकदा पहावा असे कवयित्रीला वाटते. आई येणार हे कळल्यामुळे त्या आनंदाने मोहरून गेल्या आहेत. जणू काही उत्साहाचे गीत त्यांच्या ओठावर ओथंबून आलेले आहे. असे वर्णन कवयित्री करतात. पुढील ओळीत कवयित्री म्हणतात.

सारे पसारे ठेविले आवरून सावरून
घरकुल ठेवियले नटवून सजवून
माझ्या माहेराची रीत वठवीतें राहणीत
माते !तुझी शिकवण आहे माझ्या स्मरणात

आपल्या घरी जेव्हा कुणी येणार असेल तेव्हा आपण आपल्या घराला आवरून सावरून ,नटवून सजवून कवयित्रीने सुद्धा आई येणार म्हणून साऱ्या घराची आवरा आवर केली आहे. घर शोभिवंत दिसावे म्हणून त्याला नटवून सजवून ठेवले आहे. प्रत्येक मुलगी मुलीमध्ये तिच्या आईचे प्रतिबिंब दिसत असते.तिचा स्वभाव बोलण्याच्या किंवा एखादे काम करण्याच्या पद्धत अगदी आईसारखीच कारण, बालपणापासून तिने आईलाच न्याहाळलेले असते. अनुकरण केलेले असते.तसेच बालपणापासून आईने केलेले संस्कार , शिकवण कवयित्रीने सुद्धा स्मरणात ठेवलेली आहे. माहेरी आई जसे वागायची किंवा जसे घर ठेवायची त्या साऱ्या आठवणी स्मरणात ठेवून कवयित्री आईसारखे वागण्याचा प्रयत्न करते. आईच्या शिकवणीनुसार तिचे राहणीमान आहे. असे वर्णन कवयित्रीने केले आहे. पुढील ओळीत कवयित्री म्हणतात,

सानुल्यांना सांगितली वार्ता अति आनंदाची
आज बाळांनो ,आपणां आजी आहे भेटायची
तुम्हाला नि मला आतां नको काळजी कशाची
माझी मायेची माऊली आहे घरास यायची!

जशी मुलीला आईच्या भेटीची ओढ असते. तशीच नातवंडांनाही आजी च्या मायेची तेवढीच ओढ असते. आजीकडून लाड करून घ्यायला त्यांना खूप आवडतात. कवयित्री ही आपल्या लहान मुलांना आजी येणार असल्याची वार्ता सांगतात तेव्हा त्यांना खूप आनंद होतो. कारण, प्रत्येक आई ही आपल्या मुलांच्या सुख-दुःखासाठी सदैव तत्पर असते.कवयित्री मुलांना म्हणतात,"माझी मायेची माऊली आता येणार आहे त्यामुळे तुम्हाला आणि मला आता कशाचीच काळजी नाही. पुढील ओळींमध्ये कवयित्रीं म्हणतात,

झाली यावयाची वेळ पाय घोटाळे दारांत
बाळ उभा फाटकाशी दूरवर न्याहाळीत
माझा मलाच देतांना धीर, काळीज कांपतें
तोच दुरून टांग्यात माझ्या मायेस देखतें

आई येणार असल्यामुळे तिच्या येण्याची वेळ होतात कवयित्रीचा पाय दारात घोटाळतो. तिला यायला एवढा उशीर कसा झाला ? या विचाराने मनात काहूर उठते... कवयित्रीचे बाळही आजीची वाट पाहत फाटकाशी जाऊन उभे राहते. कधी एकदा आपली आजी येते म्हणून ते आतूरतेने वाट पाहते. त्यांची नजर आजीला दूरवर न्याहाळते... मनात तर काही काळजीने शंकाही उठते पण त्या मनाला धीर देतात. तेवढ्यात दुरून आईचा टांगा येताना त्यांना दिसतो तेव्हाच त्यांच्या मनातली हुरहूर थांबते.असे सुंदर वर्णन कवयित्री करतात. पुढील शेवटच्या चार ओळींमध्ये कवयित्री म्हणतात,

'आजी आली, आजी आली' झाली हुल्लड घरांत
हळुवारपणें माय पाय टाकी उंबऱ्यांत
पडो माझ्या संसारात माझ्या मायेंचे पाऊल
माझ्या सुखसर्वस्वाची तिला घेऊ दे चाहूल

कवयित्रीच्या मुलांना टांग्यातून उतरलेली आजी



दिसताच ते आनंदाने 'आजी आली ,आजी आली' म्हणत उड्या मारतच घरात येतात. त्यांच्या आईचे प्रेमळ पाऊल हळुवारपणे आई जेव्हा उंबऱ्यात टाकतात तेंव्हा कवयित्री मनोमन सुखावते. त्यांना वाटते माझ्या सुखी संसारात माझ्या आईचे हे पडलेले पाऊल माझ्यासाठी किती आनंददायी आहे... माझ्या या संसारातील सर्व सुख पाहून तिचे मन किती आनंदून जाईल... तिच्या वत्सल आत्म्याला किती गारवा मिळेल... लेकीच्या संसारात सुख असेल तर आईला आपल्या दुःखाचा विसर पडतो पण लेक जर दुःखी असेल तर आई कधीच सुखाने राहू शकत नाही. तिचे सुख ही तिला टोचू लागते. तिच्या सुखी संसारातला घासही तिला कडू वाटतो. कवयित्रीच्या संसारातल्या सुखाची चाहूल आईला लागावी व आईचेही जीवन आनंदमय व्हावे हाच कवयित्रीचा हेतू असावा.

अशाप्रकारे अत्यंत भावस्पर्शी व प्रत्येक स्त्रीला आपलीच भावना आहे ,याची जाणीव करून देणारी ही काव्यरचना कवयित्री संजीवनी मराठे यांची आहे त्यांच्या अनेक कवितांमधून भावनांची उत्कट अनुभूती व आर्तता व्यक्त होते. त्यांनी विविधांगी गीत रचना लिहिल्यात... संजीवनीबाईंनी माय मराठीला दिलेला हा साहित्याचा ठेवा सर्व साहित्य प्रेमींसाठी खरोखरच खूप मोलाचा आहे... त्यांच्या लेखणीला व सर्व साहित्यिक कारकीर्दीला एक मराठी साहित्याची अभ्यासिका म्हणून माझे शतशः नमन... अशा या प्रसिद्ध कवयित्रीची लेखणी १ एप्रिल २००० रोजी पुणे येथे थांबली...

# महात्मा ज्योतीराव फुले : सत्यशोधक समाजाची स्थापना



माधव पि. बैलकवाड
संपर्क क्र. 8080471642

आधुनिक केसरी

**राष्ट्रपिता महात्मा ज्योतीराव फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना पुण्यामध्ये केली. २४ सप्टेंबर हा दिवस म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांचा द्वितीय राज्याभिषेक याच दिवशी झालेला होता आणि त्यामुळेच महात्मा फुले यांनी या दिवसाची निवड केली असावी. छत्रपती शिवाजी महाराजांकडून प्रेरणा घेऊन याच दिवशी त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. प्रस्थापित समाज कर्मकांड, रूढी-परंपरा पुरोहितशाही यामध्ये पूर्णपणे बंदिस्त झाला होता. आपल्या बांधवांची दशा पाहून महात्मा फुले यांचे मन हळहळत असे. बहुजनांच्या दुरवस्थेचे पहिले कारण म्हणजे अज्ञान होय. हे त्यांनी ओळखले होते. अज्ञानात जीवन जगत असल्यामुळे लोकांना गुलामगिरीचे ओझे वाटत नव्हते. समाजाला गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी समविचारी लोकांना घेऊन महात्मा फुलेंनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.**

महात्मा ज्योतीराव फुले यांचा ग्रंथप्रामाण्याला विरोध होता. वेदवाक्य प्रमाणम! त्यांना मान्य नव्हते. मुळात त्यांना चातुर्वर्ण्यव्यवस्थाच मान्य नव्हती. महात्मा फुले यांनी सर्व धर्माचा अभ्यास केला होता . धर्माच्या नावाने शुद्र अतिशुद्र स्त्रियांची जी दुर्दशा झाली होती. ती त्यांना मान्य नव्हती. धर्माच्या नावाखाली कर्मकांड , रूढी , परंपरा याद्वारे बहुजनांना लुटले जात होते. महात्मा फुले यांना मानवता धर्म अभिप्रेत होता व ब्राम्हणी धर्म हा त्यांच्या अपेक्षा पूर्ण करणारा नव्हता. म्हणून त्यांनी ब्राम्हण धर्म नाकारला व सत्यशोधक समाजाची स्थापना केली .सत्यशोधक समाजाचा प्रमाणग्रंथ म्हणजे सार्वजनिक सत्यधर्म होय ! महात्मा फुले म्हणतात, निर्मिकाची भक्ती निरपेक्ष भावनेने करावी. त्यात कोणाचीही मध्यस्थी नसावी. महात्मा फुलेंना विज्ञानवादी, मानवतावादी, समतावादी धर्म अपेक्षित होता. त्यांना स्वर्ग-नरक नामस्मरण, अनुष्ठान, पुनर्जन्म या संकल्पना मान्य नव्हत्या. निर्माणकर्ता एकच आहे मग त्याने निर्माण केलेल्या प्रत्येक गोष्टीवर सर्वांचा हक्क असावा अधिकार असावा. विशिष्ट एखादी नदी पवित्र कशी ?कोणी पवित्र कोणी अपवित्र ? कोणी श्रेष्ठ तर कोणी कनिष्ठ असा भेदभाव कोणी निर्माण केला. धर्मग्रंथ हे ईश्वराने नाहीतर मानवाने निर्माण केलेले आहेत. म्हणूनच त्यात असा भेदभाव करण्यात आला. असा क्रांतिकारी विचार महात्मा ज्योतीराव फुले यांनी मांडला. महात्मा ज्योतीराव फुले यांना मुर्तीपुजा मान्य नव्हती. पूजाअर्चा नैवेद्य या गोष्टी मान्य नव्हत्या. ते म्हणतात, ईश्वराने निर्माण केलेल्या वस्तूचा त्याला उलटा नेवेद्य कसा दाखवता ? ग्रह, शनी, जन्मरास, जन्मपत्रिका याविषयी विज्ञानवादी विचार महात्मा फुले मांडतात. हे विचार जर आपल्या उच्चशिक्षित लोकांनी अंगीकारले असते, तर ते अशा प्रकारे अंधश्रद्धेचे बळी ठरले नसते. शनीच्या पिडेविषयी महात्मा फुले म्हणतात,

**ग्रहामाजी शनि आकाशी रमला तुझ्या पायी येथे कैसा**

आजही विज्ञान शिकलेले लोक उच्च विद्याविभूषित लोक शनिवारी शनीचा उपवास करतात. काय तर म्हणे शनीच्या पीडेपासून वाचण्यासाठी हा खटाटोप आणि हो हा उपवास पकडणारे पुरुष मंडळी असतात. नेहमी उपवासवरून स्त्रियांना बोलले जाते. मात्र आमचे पुरुष बांधवही कुठे मागे नाहीत. माफ करा पण महात्मा फुलेंचे विचार स्वीकारले असते, तर अशा थोतांडात आपण पडलो नसतो. महात्मा फुले यांनी सर्वप्रथम अंधश्रद्धेविरुद्ध आवाज उठवला. शूद्रातिशूद्रांची, स्त्रियांची गुलामगिरी त्यांना मान्य नव्हती. कर्मकांडाच्या नावाखाली बहुजनांना लुटले जाई. विवाह प्रसंगी उलट सुलट विधी करून बहुजनांचे विवाह लावले जात. त्यासाठी त्यांनी पुरोहिताशिवाय विवाह लावले. मराठीत मंगलाष्टके रचली. सत्यशोधक पद्धतीने पहिला विवाह घडवून आणला. ज्ञानोबा निंबाळकर यांची मुलगी राधा हिचा विवाह सिताराम जम्बाजी अल्लाट यांच्याशी सत्यशोधक पद्धतीने संपन्न झाला. या विवाहाला देशभरातून विरोध झाला. परंतु ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले डगमगले नाहीत. जे जे विधी पुरोहिताकडून केले जात होते, ते सर्व विधी ब्राह्मणेतरांकडून करून घेण्याचा आग्रह धरला. विवाह, दशपिंडविधी, वास्तुशांती वगैरेसारखे विधी पुरोहिताशिवाय संपन्न होऊ लागले.

सर्वसाक्षी जगत्पती!! त्याला नकोच मध्यस्थी!! हे सत्यशोधक समाजाचे घोषवाक्य होते. निर्मिकाचा धर्म सत्य आहे. मग भांडणे अनेक कशासाठी अशी विचारधारा महात्मा फुले यांची होती. अज्ञानापोटी लोक वेगवेगळ्या प्रकारचे कर्मकांड करतात व नाडले जातात. त्यामुळे त्यांना शिक्षण घेण्याची सद्बुद्धी सुचत नाही. अशी त्या काळातील बहुजनांची दशा होती. यातून त्यांना बाहेर काढण्यासाठी अंतिम सत्याची व बहुजनांची भेट घालून देण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. समाजातील दीनदुबळ्या लोकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व मानवता धर्माची प्रेरणा देण्यासाठी सत्यशोधक समाजाची आवश्यकता होती.

सत्यशोधक समाजाची स्थापना झाल्यावर बहुजनांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण झाली. सत्यशोधक समाजाच्या वतीने विविध कार्यक्रम संपन्न होत. दर पंधरा दिवसातून एक व्याख्यान आयोजित केले जाई. वर्षातून चार सभा घेतल्या जाई. लोकशाही पद्धतीने कार्यकारी मंडळाची निवड बहुमताने केली जाई. विषमता नष्ट करून तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहोचवणे हा उद्देश होता. गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्यात येई. गरीब विद्यार्थ्यांसाठी आर्थिक मदत तसेच वस्तीगृह चालवले जाई. समाजातील दीनदुबळ्या लोकांना मदत पुरविली जाई. शुद्र अतिशुद्र, स्त्रिया या समाजातील पीडित लोक या चळवळीकडे आकर्षित झाले होते. कारण ही चळवळ जनसामान्यांसाठी होती. सत्यशोधक चळवळीचे कार्य वेगवेगळ्या पद्धतीने सुरू होते. १८७९ मध्ये स्त्रियांच्या निबंधवाचनाचा समारंभ थेटरमध्ये ठेवण्यात आला होता. शेतकऱ्याच्या दूरस्थिती व पिळवणुकीविरुद्ध बारामती तालुका चिंचोली गावात १८८० मध्ये शेतसारा, कर्ज, सक्तीचे शिक्षण इत्यादी ठराव संमत केले होते. सत्यशोधक समाजाचे खंदे पुरस्कर्ते नारायण मेघाजी लोखंडे यांनी सत्यशोधक समाजाच्या प्रेरणेने मुंबईमध्ये मिलहॅन्ड असोसिएशनची स्थापना केली. याद्वारे कामगाराचे महत्वाचे प्रश्न सोडवले जात होते. कृष्णराव भालेकर यांनी विदर्भ मध्यप्रदेशात चळवळीचा प्रसार केला. सत्यशोधक चळवळीचे पहिले अधिवेशन १९११ साली झाले. त्याचे अध्यक्षपद स्वामी व्यंकय्या अय्यावारू यांच्याकडे होते. २००७ पर्यंत सत्यशोधक चळवळीचे एकूण ३५ अधिवेशने झाली.

महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीच्या विचारानुसार आज त्यांच्या प्रत्येक अनुयायाने आचरण करणे आवश्यक आहे. काही प्रमाणात काही ठिकाणी आज सत्यशोधक पद्धतीने विवाह होत आहेत . ही उल्लेखनीय बाब आहे. विवाहाप्रमाणेच सत्यशोधक पद्धतीने दशक्रियाविधी, वास्तुशान्ती वगैरे विधी झाले तर बहुजनांची होणारी लूट कमी होईल. बहुजनांच्या कष्टावर जगणारी व्यवस्था नष्ट होईल. समाज शिक्षणाकडे आकर्षित होईल. विज्ञानवादी पिढी निर्माण होईल. मंदिरात जाणारे लोक ग्रंथालयात जातील. बहुजनांना आपला इतिहास समजेल आणि इतिहास समजला तरच ते आपलं उज्ज्वल भविष्य घडवू शकतील. त्यासाठी सत्यशोधक विचारांची खरी गरज आहे. चला तर मग महात्मा फुलेंच्या सत्यशोधक चळवळीच्या विचारांचा अंगीकार करू आणि आपल्या पुढच्या पिढीला सकारात्मक दृष्टिकोन देऊ!!

सत्यशोधक चळवळीअंतर्गत प्रचार-प्रसारासाठी दीनबंधू, सत्सार, सत्य दीपिका, सुबोधपत्रिका, इंदुप्रकाश , प्रमोद सिंधू इत्यादी वृत्तपत्राद्वारे सार्वजनिक सत्य मांडले जाई. वृत्तपत्रे हा समाजाचा आधारस्तंभ आहे. त्यासाठी वृत्तपत्राने नेहमी सत्य आणि सत्यच मांडले पाहिजे अशी त्यांची भूमिका होती. सार्वजनिक सत्यधर्माचे एकूण ३३ सत्यवर्तनाचे नियम दिले आहेत. त्यानुसार प्रत्येक स्त्री-पुरुषाला वर्तन करावे लागेल. प्रत्येक नियमांमध्ये स्त्री व पुरुष असा स्वतंत्र उल्लेख करण्यात आला. ब्राम्हणी धर्माने स्त्रीला दुय्यम स्थान दिले. तर सार्वजनिक सत्यधर्माने स्त्रियांना मानाचे स्थान दिले. सत्यवर्तनाचे ३३ नियम म्हणजे तेहतीस कोटी देवांना नाकारणारे नियम आहेत. सत्यवर्तन केल्याशिवाय मानव प्राणी सुखी होणार नाही, असे महात्मा फुले म्हणतात. म्हणून सार्वजनिक सत्यधर्मामध्ये सत्यवर्तनाला महत्त्वाचे स्थान दिले आहे. प्रत्येक मानवाने सत्याने आचरण केल्यास कुणावरही काही अन्याय, अत्याचार होणार नाही. कोणत्याही पुरुषाने स्त्रियांच्या मानवी हक्काच्या आड येऊ नये. हा महत्त्वाचा नियम या ३३ नियमांमध्ये दिलेला आहे. सार्वजनिक सत्यधर्मानुसार प्रत्येक मानवाने आचरण केल्यास, प्रत्येक मानव सुखासमाधानाने जीवन जगेल.

आजही प्रत्येक बहुजनाने या पद्धतीने जीवन जगले तर त्यांच्या जीवावर जगणारी व्यवस्था नष्ट होईल. महात्मा फुले यांच्या मृत्यूनंतर सावित्रीबाई फुले यांनी सत्यशोधक समाजाची धुरा सांभाळली. त्या सत्यशोधक समाजाच्या राष्ट्रीय अध्यक्ष झाल्या. कारण ही चळवळ पुण्यापुरती मर्यादित राहिली नाही. तर राष्ट्रीय चळवळ झाली होती. १८९६ च्या दुष्काळातील सावित्रीबाईंचे कार्य उल्लेखनीय होते. त्यानंतर सत्यशोधक चळवळीचा विचार महाराष्ट्रात नेण्याचे काम राजर्षी शाहू महाराजांनी केले. सत्यशोधक चळवळीत शाहू महाराजांचे योगदान महत्वाचे आहे. जागृती या पत्राने शाहू महाराजांवरील मृत्यूलेखात शाहूंच्या मृत्यूमुळे सत्यशोधक चळवळीचा हात गळून पडला असे म्हटले होते. लोकांचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक विकास व्हावा यासाठी सत्यशोधक चळवळ कार्यरत होती. आजही सत्यशोधक विचारांची समाजाला गरज आहे.

# मानवाच्या सुखी जीवनाचे रहस्य : एकात्मतेचे वलय



डॉ. ज्योती रा. रामोड
संपर्क क्र. 9673774269

आधुनिक केसरी

**"वाटेवर चालताना वाटेसारखं चालावं लागतं आपण कितीही सरळ असलो तरी वळणावरून वळावचं लागतं निसर्ग, विविध पशु आणि पक्षी जेवढया सौंदर्याने आणि विविध रंगाने नटलेले आसतात. तेवढयाच ते अर्थपूर्ण भावनानी समृद्ध व परिपूर्ण आसतात. आपले पूर्वीचे लोक हे जास्तीत जास्त निसर्गाच्या सानिध्यात राहत असत. मानव ज्याप्रमाणे निसर्गाची काळजी घेत असे अगदी त्याचप्रमाणे निसर्ग भरभरून मानवाला देत असे. आधुनिकतेच्या युगात मानव निसर्गापासून, वन्य प्राणी, पशु यांच्यापासून दूर होत चाललेला दिसून येत आहे. आज स्वतःच्या हव्यासापोटी निसर्गाचे नुकसान मोठ्या प्रमाणावर केले जात आहे.**

याचा तीव्र परिणाम निसर्गातील वन्यप्राणी पशु पक्ष्यांवर झालेला दिसून येतो. भविष्यात निर्माण होणाऱ्या पर्यावरण व वन्यजीव विषयक प्रश्नाची उकल कलाकाराने आपल्या सौंदर्यात्मक कल्पनेतून वेगळ्या अंगाने समाजासमोर मांडलेली आहे.

समाजात जीवन जगताना व्यक्ती ज्याप्रमाणे विविध नात्यांमध्ये बांधलेला असतो अगदी त्याप्रमाणे निसर्गातील वन्यजीव, प्राणी हे देखील अबोल निशब्द स्पर्शाच्या नात्यात एकमेकांसोबत कशाप्रकारे बांधलेले असतात. याचे प्रतिकात्मक दर्शन कलाकाराने आपल्या प्रतिभापूर्ण चित्र रूपातून समाजासाठी अभिव्यक्त केले आहे. वेगवेगळ्या अंगाने एकात्मिकपणे साधलेली ही मयूर चित्रकृती समाजामध्ये सर्व जाती, धर्म, पंथ, वर्णाच्या लोकांनी एकत्र येऊन कशाप्रकारे समरसतेने जीवन जगावे याचे संकेतदर्शी आणि प्रबोधनात्मक चित्र कल्पनेतून उत्तमपणे चित्रकाराने साकारले आहे. सहकार्य, समता, बंधूता, प्रेम, भावना, संस्कार, नीतिमूल्ये, आदर, त्याग, संयम, सहनशीलता, एकनिष्ठता आजच्या समाजात नाहीसे होताना दिसत आहे.

व्यक्ती हा समाजाचा मी जगू शकत नाही आणि व्यक्ती शिवाय समाज बनू शकत नाही अगदी त्याचप्रमाणे आपल्या जवळच्या माणसांशिवाय व्यक्तीच्या जीवनाला परिपूर्णता येत नाही. आजच्या धावपळीच्या युगात ही नाते कुठेतरी एकमेकांचे हात सोडताना दिसत आहेत. त्यामुळे कुटुंब समाज हे विखुरले जात आहेत. या विखुरलेल्या कुटुंबाला समाजाला पुन्हा एकसंध साधण्यासाठी आणि नवी दिशा देण्याच्या दृष्टिकोनातून कलाकारांने मार्मिक व अर्थपुर्ण चित्र आपल्या कौशल्याच्या सचोटीतून निर्माण केले आहे. विशेष रूपाने आजच्या तरुण पिढीमध्ये मूल्यांची जाणीव करून देणे आणि त्यांच्या वर्तनात मूल्यांची रुजवणूक करणे खूप महत्त्वाचे आहे.



एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ या उक्ती प्रमाणे प्रत्येक व्यक्तीने समाजातील एकमेकांना सहकार्य केले तरच समाज प्रगतीचे शिखर गाठू शकतो. ज्याप्रमाणे व्यक्ती आणि समाज या नाण्याच्या एकच बाजू आहेत. अगदी त्याचप्रमाणे निसर्ग आणि वन्यजीव हे देखील एकाच नाण्याच्या बाजू आहेत. त्यामुळे प्रत्येक कार्य करताना एकमेकांचा विचार करणे खूप महत्त्वाचे आहे. निसर्गातील इंद्रधनु आणि मयूर चित्रात भरलेले विविध रंग आनंदाने आणि विविध रंगात रमूण जीवन जगण्याचा संदेश देतात. समाजात बदलत गेलेल्या परिस्थितीचे भान समाजाला करून देण्याच्या उद्देशाने कलाकारांने हे चित्र साकारले आहे. ज्याप्रमाणे चित्रात मयुर एकमेकात गुंतलेले आहेत. त्याप्रमाणे आपण जीवनात चांगल्या गोष्टीत गुंतून राहून आपल्या अस्तित्वाची नवी ओळख निर्माण करावी हे चित्र शैलीच्या रूपातून कलाकारांने उत्तमपणे व्यक्त केले आहे.

" ज्याप्रमाणे निसर्गातील विविध पशु
पक्षी यांचे रंग वेगवेगळे आहेत
त्याचप्रमाणे मानवाच्या जीवनात
स्वभावातील वेगवेगळ्या छटा आहेत "

# तांडा कुंडाणेच्या भ्रष्ट रोजगार सेवकाला पाठीशी घालणारे कोण ?

## दप्तर गहाळ करणाऱ्या तांडा कुंडाणेतील रोजगार सेवकावर अद्यापही गुन्हा दाखल नाही

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** तालुक्यातील मौजे तांडा कुंडाणे येथील रोजगार सेवकावर दप्तर गहाळ केलें म्हणून गुन्हा दाखल करण्याचे पं.स.चे आदेश असताना देखील ग्रामसेवक यांनी आपल्या कामात हलगर्जीपणा करत एकप्रकारे रोजगार सेवक याला खुलेआम पाठबळ दिल आहे.

मौजे तांडा कुंडाणे येथे सन २०१२ ते ३१ डिसेंबर २०२२ या कालावधीत कार्यरत असलेले ग्रामरोजगार सेवक यांचे कडून म.ग्रा.रा.रो.ह. योजनेचे दप्तर तीन दिवसात संबंधित ग्रामरोजगार सेवक यांनी जमा न केल्यास म.ग्रा.रा.रो.ह. योजनेचे दप्तर गहाळ केले आहे. असे गृहीत धरून संबंधित ग्रामरोजगार सेवक यांच्यावर पोलिसात ३ दिवसाच्या आत दप्तर गहाळ केले बाबत गुन्हा दाखल करावा व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल ७ दिवसाच्या आत सादर करावा. गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ केल्यास आपणावर जबाबदारी निश्चित करण्यात येईल, असे दिनांक १०-०३-२०२३ रोजी मा.रा. दा. वाघ गटविकास अधिकारी पंचायत समिती धुळे यांनी पत्रातून नरेंद्र अहिरे ग्रामसेवक ग्रामपंचायत तांडा कुंडाणे यांना आदेशीत केले होते. आज दिलेल्या लेखी स्वरूपाच्या आदेशाला आज सहा महिने होऊन गेले. मात्र ग्रामसेवक यांनी दप्तर गहाळ करणाऱ्या रोजगार सेवकावर गुन्हा दाखल केला नाही व कारवाई संदर्भात कुठलाही अहवाल पंचायत समिती प्रशासनाला दिला नाही. ग्रामसेवक यांनी संबंधितांना पाठीशी घालत पंचायत समिती प्रशासनाच्या आदेशाचे उल्लंघन केल आहे. तर लवकरात पंचायत समिती प्रशासनाला खुलासा द्यावा.अन्यथा प्रशासकीय कारवाईचा प्रस्ताव आपल्याविरुद्ध सादर करण्यात येईल असा थेट इशारा आता पंचायत समिती प्रशासनाने तांडा कुंडाणे येथील ग्रामसेवक यांना दिला आहे. त्यामुळे तांडा कुंडाणे येथील ग्रामसेवक प्रशासनाचा आदेशाला महत्व देतील का ? का भ्रष्ट रोजगार सेवकाला पाठीशी घालणार' याकडे आता सर्वांचा लक्ष लागून आहे..

चौकशीत तांडा कुंडाणे येथील म.ग्रा.रा.रो.ह. योजनेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असल्याचे उघड झाला आहे. रोजगार सेवकाने दप्तर गहाळ केले आहे.त्यामुळे याबाबत गुन्हा दाखल करून अहवाल देण्यात यावा.व कामात दिरंगाई करणाऱ्या संबंधित ग्रामसेवकावर दप्तर दिरंगाई कायद्यानुसार कारवाई करावी प्रशासकीय कारवाईचा प्रस्ताव सादर करावा अशा मागणी लोकशाही मराठी पत्रकार संघ महाराष्ट्र राज्याच्या वतीने करण्यात आली आहे.

# लैंगिक समस्या निदान व उपचार

आधुनिक केसरी

**नमस्कार! मी डॉ. विजय दहिफळे 'सुखी जीवनाचा मंत्र' या माझ्या पुस्तकावर आधारित साप्ताहिक सदरात तुम्हा सर्वांचं अगदी मनापासून स्वागत करतो. गेल्या अनेक दिवसांपासून आपण टीव्ही, सोशल मीडिया या माध्यमांमधून भेटत आहोतच, पण आता आपण दर रविवारी दैनिक आधुनिक केसरी मधून भेटत राहणार आहोत. माझ्या गेल्या २०-२५ वर्षांच्या कारकीर्दीमध्ये मला आलेले अनुभव, मला भेटलेली माणसं, वेगवेगळ्या रूपात समोर येणाऱ्या गंभीर लैंगिक समस्या या सर्व गोष्टींचा ऊहापोह मी या सदरातून करणार आहे.**




एसटीडी / एच.आय.व्ही. : एस.टी.डी. म्हणजे सेक्शुअली ट्रान्समिटेड डिसीजेस. याला आपण सेक्समुळे पसरणारे आजार असं थोडक्यात म्हणू शकतो. सर्वप्रथम आपण या आजारांची नाव जाणून घेऊयात. एच. आय. व्ही. एड्स, हिपॅटायटीस, शँकरॉईड, ट्रायकोमोनियासिस, ह्युमन पॅपिलोमा व्हायरस (एचपीव्ही) व जेनियल वार्टस, हार्पिस, गोनोरिया, क्लेमायडिया, बॅक्टेरियल व्हजायनायटीस (बी. व्ही.), सिफिलीस, स्कॅबीज, प्युबिक क्रॅच लाइस, पेल्व्हिक इन्फ्लमेटरी डिसीज (पीआयडी), म्युको पुरुलंट सिस्यटायटीस (एमपीसी), मॉल्युसकम कंटॅजीओजम, लींफो ग्रॅन्युलोमा व्हेनेरम (एलजीव्ही)

एस.टी.डी. म्हणजेच सेक्शुअली ट्रान्समिटेड डिसीजेस- आता आपण एस.टी.डी. या प्रकारात येणाऱ्या अन्य आजारांबद्दल जाणून घेऊया. * सिफिलीस- स्त्री-पुरुष संबंधांमध्ये उघड्या अंगांना स्पर्श झाल्यामुळे या रोगाचा संसर्ग होतो. जर वेळीच यावर उपाय केला नाही तर त्याचे रूपांतर गंभीर समस्येमध्ये होते. उदा. मेंदू व मज्जासंस्था यावर परिणाम होणे. रक्तामध्ये जंतू संसर्ग होणे आणि त्यामुळे मृत्यू होणे. यू एस ए (अमेरिका) मध्ये याचे प्रमाण जास्त आढळते आणि त्याचे प्रमुख कारण आहे समलैंगिक संबंध (होमो सेक्स).




* लक्षणे- या आजाराची सुरुवातीची लक्षणं म्हणजे लहान व न दुखणाऱ्या जखमा होणे, या जखमा प्रामुख्याने योनी, लिंग, तोंड आणि गुद्द्वार यामध्ये होतात. पुढची लक्षणे म्हणजे शरीरावर तळवे व तळहाताला रॅश येतात. तसेच इतर लक्षणांमध्ये ताप येणे, गाठी, घाम येणे, केस जाणे, डोकेदुखी, वजन कमी होणे, स्नायू दुखणे आणि थकवा येणे अशी लक्षणे आढळून येतात. गर्भावस्थेमध्ये स्त्रीला सिफिलीस झाला तर बाळ दगावते. याचा प्रसार हा योनी, ओरल व ॲनल सेक्स, ओठ, तोंड येथील जखमांमुळे होतो.



**डॉ. विजय दहिफळे**
**युरोलॉजिस्ट, अँड्रॉलॉजिस्ट अँड सेक्सॉलॉजिस्ट**
**9822326248**

*निदान आणि उपचार- रक्त तपासणी तसेच जखमेच्या स्थानाची चाचणी यातून या आजाराचे निदान करण्यात येते. उपचारांमध्ये पेनिसिलीन इंजेक्शन आणि प्रतिजैविक (ॲन्टिबायोटिक्स) उपलब्ध आहेत.* प्रतिबंध- सेक्स न करणे हा खरं तर प्रतिबंधात्मक उपायांमधील सर्वात मुख्य उपाय आहे पण सेक्स ही एक निसर्गदत्त भावना असल्यामुळे हे शक्य नाही. त्यामुळे असे आजार होऊ नयेत यासाठी एकच सेक्स पार्टनर असणे जो पूर्णतः निरोगी आहे आणि सेफ सेक्स करणे म्हणजेच सेक्स करताना कंडोमचा वापर करणे हे प्रतिबंधात्मक उपाय सांगता येतात.




# दौंड तालुक्यातील केंद्रप्रमुख, विषयतज्ज्ञ व शिक्षक, ५० जणांना आदर्श शिक्षक पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**दौंड :** महालक्ष्मी ऑटो मोटिव्ही प्रायव्हेट लिमिटेड मारुती सुझुकीचे डिलर. (मालक) मा.नितीन सदाशिव सातव.यांच्या वतीने दौंड तालुक्यातील जि.प. शाळेतील शिक्षकांसाठी पुरस्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दि. १६ सप्टेंबर २०२३ रोजी मौजे पाटस ता दौंड जिल्हा पुणे येथील पंचरत्न मंगल कार्यालय येथे पार पडला. महालक्ष्मी उद्योग समूहाचे व मारुती सुझुकी डिलर - मा. नितीन सातव यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे दौंड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी मा अजिंक्य येळे, तसेच भिमा पाटस साखर कारखान्याचे संचालक विकास शेलार प्रामुख्याने उपस्थित होते.

महालक्ष्मी मारुती उद्योग समूहाचे चीफ जनरल मॅनेजर मा.संदिप पवार व दौंड पंचायत समितीचे गट विकास अधिकारी मा.अजिंक्य येळे यांच्या हस्ते. आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात आला. दौंड तालुक्यातील निवड केलेल्या शिक्षकांना पुरस्काराने गौरविण्यात आले. तसेच सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते देऊन सत्कार करण्यात आला.

दौंड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षक शिक्षिका तसेच सामाजिक शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील पदाधिकारी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी प्रमुख मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल मारुती सुझुकी चे डिलर मा. नितीन सदाशिव सातव साहेब व त्यांच्या कुटुंबीयांचे मनापासून आभार व्यक्त करतो अशी प्रतिक्रिया गट विकास अधिकारी मा अजिंक्य येळे यांनी व्यक्त केली.महालक्ष्मी मारुती उद्योग समूहाचे चीफ जनरल मॅनेजर मा.संदिप पवार यांनी बोलताना सांगितले. तसेच राज्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांची शैक्षणिक परिस्थिती पाहता पूर्वीपेक्षा निश्चितच बदल झाला असुन सध्या प्रगतीपथावर दिसुन येत असल्याने शिक्षकांचा सन्मान करवा व त्यांना प्रोत्साहन द्यावे. व सामाजिक बांधिलकी जपावी. आदर्श शिक्षक पुरस्कार या कार्यक्रमाच्या निमित्ताने दौंड तालुक्यातील सामाजिक शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील मांन्यावरांनी प्रामुख्याने उपस्थिती दर्शविली होती. या प्रसंगी दौंड पंचायत समिती मधील केंद्र प्रमुख - श्री. चंद्रकांत केळकर, श्री. प्रणयकुमार पवार व विषयतज्ज्ञ श्री.दत्तात्रय कुदळे व इतर शिक्षकांना सन्मानपत्र व सन्माचिन्ह देवून गौरविण्यात आले.

या कार्यक्रमासाठी शिक्षक संघटनांचे पदाधिकारी श्री.आप्पासाहेब कुल, श्री.विकास भाऊ शेलार,श्री. शांताराम काका जगताप,श्री. रामभाऊ दोरगे,श्री. बापूराव खळदकर , रहिमभाई शेख इ. उपस्थिती होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्रीम. गार्डी मॅडम जि.प. शाळा - धायगुडेवाडी क्र. १ यांनी केले व समारोप पाटस ब्रँचचे मॅनेजर अनिल बोडके व श्रीम मेघा जगदाळे यांनी आभार मानले.

# कुस्ती स्पर्धेत विभागात ओमराज औताडे प्रथम

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** शांताराई महाविद्यालयाच्या खुलताबाद तालुक्यातील ताजनापूर शांताराई कनिष्ठ महाविद्यालयाचा कुस्ती स्पर्धेत ओमराज औताडे विभागात प्रथम शालेय स्पर्धे अंतर्गत परभणी या ठिकाणी नुकत्याच झालेल्या शालेय क्रीडा स्पर्धेमधून कुस्ती या प्रकारामध्ये इयत्ता अकरावीचा विद्यार्थी ओमराज औताडे या विद्यार्थ्यांनी 70 किलो वयोगटामध्ये विभागामधून प्रथम क्रमांक घेऊन कोल्हापूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी त्याची निवड करण्यात आलेली आहे. यांप्रसंगी संस्थेचे प्राचार्य श्री. गणेश काळे यांनी ओमराज दादासाहेब औताडे व वडीलांचा सत्कार केला.

यांप्रसंगी बाळू अवताडे, अंकुश अवताडे, कल्याण बुराहाडे, प्रा. सुनील इनामदार, कोमल इंगळे मॅडम प्रत्यक्ष आहेर अमोल दांडेकर, नलावडे मॅडम, अतुल गुळवे, भगवान साळुंखे, किरण काळे, शिक्षक कल्पना काळे उपस्थित होते. सर्वांनी सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.





# गणेशभक्त, सर्वधर्मियांसोबत पोलीस आयुक्तांची बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**दौलताबाद :** येथे गणेश विसर्जन व ईद -ए- मिलाद हे दोन्ही सन एकत्र येत असल्याने हे उत्सव शांततेत पार पाडावेत या साठी स्वतःह पोलीस आयुक्त यांनि दौलताबाद पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक आयोजित केली होती.

यात गणेश मंडळ पदाधीकारी, मुस्लिम उरुस समिती पदाधिकारी, ग्रामपंचायत सरपंच,उपसरपंच, पोलीस पाटील, सामाजिक कार्यकर्ते व वेगवेगळ्या गावातिल ग्रामस्थ यांच्या उपस्तितीत गुरुवारी (ता.22) पोलीस आयुक्त मनोज लोहिया,उ पयुक्त परिमंडळ एक नितीन बगटे, अंकुश शिंदे उप आयुक्त(बंदोबस्त विभाग छत्रपती संभाजीनगर) सहायक पोलीस आयुक्त गुन्हे शाखा धनंजय शिंदे सहायक पोलीस आयुक्त छावणी चे अशोक थोरात, पोलीस निरीक्षक सचिन् इंगोले, पोलीस निरीक्षक विनोद सलगरकर यांच्यासह अधिकारी कर्मचारी यांची प्रमुख उपस्तिती होती. यावेळी पीलीस आयूक्तांनी ग्रामस्थ, हिंदू-मूस्लीम समाजातिल प्रतिष्ठित नागरिक, ग्रामपंचायत सरपंच, सदस्य, पोलीस पाटील आदिंना आवाहन केले की येणाऱ्या गणेश उत्सव व इद मिलाद सण आनंदाने व निर्विघ्नपणे पार पडावा म्हनून शांततेने साजरा करावा व अनूचित प्रकारापासून घडू न देता प्रशासनाला व आपल्या गावात शहरात येणाऱ्या पाहूण्यांचा सन्मान व्हावा अशी इच्छा व्यक्त करुन उत्सवासाठी शुभेच्छा दिल्या.ग्रामस्थांच्या वतिने पोलीस आयूक्त तथा नवनियूक्त पोलीस उपायूक्त नितिन बगाटे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यक्रमात वक्ते तथा इतिहास अभ्यासक प्रा.शिवाजी गायकवाड यांनी दौलताबाद देवगिरीची ऐतिहासिक विषयाची माहीती देत देवगिरी परिसराची ओळख करुन दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन पोलीस उपनिरीक्षक संजय गिते यांनी केले व आभार पोलीस निरीक्षक सलगरकर यांनी मानले.



## लय भारी सुगरण



सौ. स्नेहा मुसरीफ , पुणे.
संपर्क क्र. 9503434424

आधुनिक केसरी

## निराला आलू पॅटिस




पॅटिस म्हटले की वर मैद्याची खारी सारखे आवरण आणि मध्ये बटाट्याचे सारण भरून बेक केलेले डोळ्यांसमोर येते.पण आज आपण टेस्ट तर एकदम पॅटिसची पण लुक एकदम निराळा असणारे असे पॅटिस बनवणार आहोत. चला तर मग..

**साहित्य :** सारणासाठी 3 उकडून साले काढून कुस्करलेले बटाटे , 1 कांदा , 4 ..5 लसूण पाकळ्या + थोडेसे आले + थोडी कोथिंबीर कुटून घेणे , 1 चमचा गरम मसाला, अर्धा चमचा आमचूर पावडर, 1 चमचा धने जिरे पावडर, पाव वाटी मटार थोडेसे वाफवलेले, मीठ, चवीसाठी थोडीशी साखर हळद, तेल.

**कव्हरसाठी साहित्य :** 2 वाट्या कणिक, पाव वाटी बारीक रवा, 3 चमचे तेल, 1 चमचा ओवा, हिंग पावडर, चिमूटभर बेकिंग सोडा, चवीनुसार मीठ, पाव चमचा हळद आवडीनुसार. अर्धी वाटी कॉर्न फ्लोअर किंवा तांदुळाची पीठी, पाव वाटी साजूक तूप.

**कृती :** प्रथम कव्हर साठी लागणारे पीठ आपण बनवू. त्यासाठी कणकेत रवा, ओवा, हळद, मीठ, हिंग घालून तेल कडकडीत गरम करून मोहन म्हणून घालावे. कोमट झाल्यावर दोन्ही हातांनी भरपूर चोळून मग बेकिंग सोडा घालून लागेल तसे पाणी घालून घट्टसर कणकेप्रमाणे भिजवून घट्ट झाकून अर्धातास ठेवावा. म्हणजे रवा फुगतो व पीठ छान भिजते.


आता सारण बनवून घेऊ. त्यासाठी कढईत 1 चमचा तेल घालून त्यात जिरे, हिंग, हळद, कढीपत्ता, आले, लसूण, कोथिंबीर यांचा ठेचा घालून कांदा घालून थोडासा रंग बदलेपर्यंत परतावा. मग त्यात मटार, बटाटा, कोथिंबीर, धने जिरे पावडर, आमचूर पावडर, चवीनुसार मीठ व साखर घालून व्यवस्थित परतून छान मिक्स करून सारण बनवून थंड होण्यासाठी खाली काढून ठेवावे. नंतर पीठ मस्त तेल लावून पुन्हा मळून घेऊ व त्याच्या पोळी साठी करतो तसे गोळे बनवून घेऊ.

पाव वाटी कॉर्नफ्लोअरमध्ये साजूक तूप पातळ करून घालून त्याचा साटा बनवून घेऊ.

आता पोळपाटावर गोळा पोळीप्रमाणे पण लांबट आकाराचा पट्ट्या प्रमाणे लाटावा. त्यावर साटा लावून कोरडे कॉर्नफ्लोअर किंवा पिठी भुरभूरावी व लांबट उभ्या दोन्ही बाजूंनी दुमडावे मग पुन्हा त्या फोल्ड केलेल्या बाजूवर साटा लावून पिठी भुरभूरावी व समोरच्या दोन्ही बाजू फोल्ड कराव्यात. पुन्हा साटा व पिठी लावून रोल बनवावा.मग तो मध्यभागी सुरीने कट करून दोन भाग बनवावेत. रोल केल्यामुळे गोल गोल फोल्ड मस्त पडलेले दिसतील.

आता या गोल फोल्ड असलेल्या बाजू किंचित हाताने दाबून जाड पुरी प्रमाणे लाटून त्यात भरपूर सारण भरून ते व्यवस्थित बंद झाल्याची खात्री करावी. मग अगदी किंचित हलकेच लाटून पॅटिस बनवून घ्यावे असे सगळे बनवून झाले की कढईत तेल घालून गरम करण्यास ठेवावे. थोडे गरम झाले की त्यात पॅटिस सोडून मध्यम आचेवर खुसखुशीत होइपर्यन्त छान तळून घ्यावेत. तारेच्या चाळणीत काढून तेल निथळले की केचाप किंवा चटणी सोबत गरम गरम खावेत.

**वैशिष्ट्य :** हे पॅटिस खूपच खमंग, खुसखुशीत होतात . दिसायलाही लेअरमुळे मस्त आणि खाण्यास सुद्धा टेस्टी असतातच पण बटाटयामुळे दमदार असतात. सर्वांनाच मनापासून नक्कीच आवडणारच.



# योगा स्पर्धेत वरोड्याची शर्वरी मिटकर जिल्ह्यात प्रथम

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** योग ही एक जीवनपद्धती असून योगाच्या माध्यमातून आज अनेकांच्या जिवन पद्धतीमधे आमुलाग्र परिवर्तन पाहायला मिळते आहे. हीच गोष्ट लक्षात घेऊन वरोडा तालुक्यातील आनंदवन स्थित आनंद निकेतन महाविद्यालय येथे शालेय जिल्हास्तरीय योग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत संपूर्ण जिल्ह्यातील विविध शाळांमधील अनेक विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. सर्व स्पर्धकांनी विविध प्रात्यक्षिक यात करून दाखविले. या स्पर्धेत वरोड्यातील शर्वरी शैलेश मिटकर हिने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले आहे. यापूर्वी सुद्धा शर्वरी मिटकर हिने जिल्हा व राज्यपातळीवरील स्पर्धेत अनेक बक्षीस मिळविले आहेत . तिच्या या यशाबद्दल तिच्यावर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या स्पर्धेत मिळविलेल्या यशामुळे शर्वरी मिटकर हीने गोंदिया येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेत 19 वर्षे खालील वयोगटात सहभागी होण्याची संधी प्राप्त केली आहे.

शर्वरी ने आपल्या यशाचे श्रेय मुख्याध्यापिका ज्योती मगरे , क्रिडा शिक्षक स्वप्निल, अनिकेत व आपल्या आई वडिलांना दिले आहे.

# विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांना रिक्षाचालक, कंत्राटी कामगार, पथविक्रेते, विद्यार्थ्यांचे निवेदन!

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** सरकारी शाळा विकण्याचा निर्णय रद्द करा, शाळा कंत्राटी भर्ती जी आर रद्द करा, कथित कंत्राटी कामगारांना एकत्रित वेतनावर सामावुन घ्या, पथविक्रेत्यांना विक्री प्रमाणपत्र द्या, वाहतुकीच्या पावत्यांची रक्कम कमी करा इत्यादि मागण्यांचे निवेदन आयटक व भारतीय कम्युनिस्ट पक्षातर्फे विरोधि पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांना देण्यात आले. याबाबत असे की, आम्ही इंडीया सोबत आहोत, इंडीया च सरकार आल्यावर भाजपा सरकारने घेतलेले सर्व जनविरोधि निर्णय रद्द झाले पाहीजे याबाबत जनतेला आश्वासित करा असे आवाहन आयटक व भारतीय कम्युनिस्ट पक्षातर्फे निवेदने देतांना विरोधि पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांना रामा हॉटेलमध्ये ते बैठकीसाठी आले असतांना निवेदन देऊन करण्यात आले. आयटक सलग्न महाराष्ट्र कामगार कर्मचारी संघटना, शहीद भगतसिंग हॉकर्स युनियन, लालबावटा रिक्षाचालक युनियन व भारतीय कम्युनिस्ट पक्षातर्फे दिलेल्या विविध निवेदनात

1) आमची बाजू विधानसभेत मांडवी व सदर सुपर स्पेशालीटी हॉस्पीटलच्या खाजगीकरणाचा निर्णय रद्द करण्यास शासनास भाग पाडावे,

2) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय-रुग्णालय, औरंगाबाद येथे मोफत औषधी, इन्जेक्शन, एम.आर. आय., सीटी स्कॅन इ. सुरु करावे. पुर्वी औषधे मोफत मिळत होती. परंतू सरकारने ती बंद केली. आता ती पूर्ववत मोफत औषधे तसेच एमआरआय, सीटी स्कॅन इ. मोफत करावे.

3) शासकीय शाळांच्या खाजगीकरणाचा निर्णय रद्द करणे तसेच कंत्राटी भर्तीचा जीआर रद्द करणे, कंत्राटी पोलीस भर्तीचा जीआर रद्द करणे .

4) केंद्र सरकारने लादलेल्या ऑनलाईन फाईनच्या रक्कमा तत्काळ कमी करा, पुर्वीचे फाईन रक्कम कायम ठेवा.

5) रिक्षासाठी पीकअप पॉइंट व ड्रॉप पॉइंट नसतांना प्रवाशी रिक्षात बसतांना व सोडतांना ऑनलाईन फाईन करणे बंद करा.

6) शहरात पुरेसे रिक्षा स्टॅण्ड घोषित करा.

7) रिक्षाचालकांच्या टॅक्सद्वारे जमा होणारे हजारो कोटी रुपये त्यांच्यावरच खर्च करा त्यासाठी रिक्षाचालक कल्याणकारी मंडळ स्थापन करा.

8) पेट्रोलचे भाव कमी करा, महागाई कमी करा, घाटी हॉस्पीटलचे खाजगीकरण रद्द करा, पुरेशा दर्जेदार सरकारी शाळा सुरु करा, वाळुज ते चिकलठाणा सिंगल पिलर उड्डाण पुल मंजुर करा व काम जी 20 च्या गतीने करा.

9) शासनाने आमच्या रिक्षा चालवायला घ्याव्या व त्याचा सर्व खर्च करावा व रिक्षा चालकांना त्यांची रोजची बचत द्यावी. तसेच नागरिकांना मोफत प्रवासाची सोय करावी. ज्यामुळे रोड मोठे करण्याची गरज पडणार नाही, वाहनांची संख्या कमी होईल, शासनाच्या आणि नागरिकांच्या पैशाची बचत होईल.

10 )शासकीय वैद्यकीय महाविद्यालय-रुग्णालय, औरंगाबाद येथिल एका कथित कंत्राटी कामगाराच्या नावे 15,000 रुपये दर महा शासनाच्या तिजोरीतून अदा केले जातात. त्यातील फक्त 7,000 रु. दरमहा कथित कंत्राटी कामगाराला दिले जातात.

अनेक वर्षांपासुन कायमस्वरूपी प्रकारची कामे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय-रुग्णालय, औरंगाबाद, डॉ. बाबासाहेब मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद, सी.ई.टी.पी. प्लांन्ट एमआयडीसी, औरंगाबाद, महानगर पालिका औरंगाबाद इ. ठिकाणी कथित कंत्राटी पद्धतीने कामे करणाऱ्या कामगारांना शासकीय सेवेत पहिल्या टप्प्यात एकत्रित वेतनावर व त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात वेतनश्रेणी लागू करावी. जेणेकरून शासनाच्या तिजोरीवरही ताण पडणार नाही व कामगारांचे शोषणही थांबेल. 11) हातगाडीवाला/पथविक्रेता या देशाचा नागरिक आहे, कष्ट करून पोट भरतो, तो गुन्हेगार हातगाडीवाल्याच्या पोटावर लाथ मारणे बंद करा.

12) कायद्याप्रमाणे वागा, विक्री प्रमाणपत्र द्या.. मा. मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपी हातगाडीवाले/पथविक्रेत्यांची बाजू मांडा अन्यथा शैक्षणिक पात्रतेप्रमाणे नोकऱ्या द्या..

विरोधीपक्ष नेते म्हणून आपण या कष्टकऱ्यांची बाजु मांडावी व आगामी निवडणुकीनंतर आपले सरकार आल्यानंतर सर्वप्रथम खालील मागण्या मंजूर कराव्यात, असे निवेदनात नमुद करण्यात आले आहे. वडेट्टीवार यांनी शिष्टमंडळाला मुंबईला येण्याचे निमंत्रणही दिले. यावेळी राष्ट्रवादी कॉग्रेसच्या महासचिव सुशिला मोराळे, भारतीय कम्युनिस्ट पक्ष व आयटकचे ॲड अभय टाकसाळ, अमोल सरोदे, कीरणराज पंडीत, सम्यक जमधडे, योगेश गरुड, योगेश साळवे, वसिम शेख यांनी वडेट्टीवार यांचेशी चर्चा केली.

# सातव्या मजल्यावरुन पडून तरुणाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** विमाननगर येथील फिनिक्स मॉलच्या इमारतीतील सातव्या मजल्यावरुन पडून तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेला तरुण खासगी वित्तीय संस्थेत कामाला होता. रिचर्ड एबल झकेरिया (वय २५, रा. फुलेनगर, येरवडा) असे मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी नोंद करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी सायंकाळी फिनिक्स मॉलच्या वाहनतळाच्या आवरात सातव्या मजल्यावरुन पडून एक तरुण गंभीर जखमी झाल्याची माहिती पोलीस नियंत्रण कक्षाला कळविण्यात आली. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्याला तातडीने ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. पोलिसांनी मृत्युमुखी पडलेल्या तरुणाची ओळख पटविली.




रिचर्ड विमाननगर भागातील एका खासगी वित्तीय संस्थेत कामाला होता. शुक्रवारी सकाळी तो कामावर आला होता. तो फिनिक्स मॉलमध्ये सायंकाळी गेला. तो सातव्या मजल्यावरुन नेमका कसा पडला, याबाबतची माहिती मिळाली नाही. रिचर्डच्या मागे आई-वडील असा परिवार आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विलास सोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक देशमुख तपास करत आहेत.

हिवराळे क्लिनिक ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# पागंरी पाच दिवसांपासून अंधारात

## सहा डीपी जळाल्या : महावितरणचे दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** तालुक्यातील पागंरी गावाला विद्युत पुरवठा करणारी डीपी जळाले असल्याने विद्युत पुरवठा बंद पडला आहे त्यामुळे अख्ख गाव गणेश उत्सवात पाच दिवसांपासून अंधारात आहे परिणामी गावात पाण्याचे स्रोत बंद पडल्याने पाणी टंचाई निर्माण झाली, पिठाच्या गिरण्या बंद पडलेले असल्याने आजुबाजुच्या शेजारी गावातुन दळुन आणावे लागत आहे. अन्य मुलभुत समस्या वाढले असल्याने महावितरण विरोधात गावकऱ्यांत संताप व्यक्त होत आहे. पागंरी गावात वीस दिवसांपूर्वीच सिंगल फेज डिपीचे सहा डीपी जळून गेले होते. यावर धर्माबाद विज वितरण अभियंतास सांगुनही कांहीच हालचाली केले नव्हते त्यातील सात दिवसांनंतर कसे तरी महावितरणने तीन डीपी दिले खरे जास्त लोड पडल्याने तेही तीन डीपी जळुन गेले असल्याने पाच दिवसांपासून पुर्ण गाव अंधारात आहे.सध्या गावात गणेश उत्सव व लक्ष्मी बसले असुन लाईट अभावी



निरुत्साही दिसून येत आहे आणि परिणामी रात्रीला विंचू किड्याची भिती गावकरात निर्माण झाली आहे एवढेच नसुन लाईट अभावी पिठाच्या गिरण्या बंद पडलेले असून शेजारच्या करखेली, जुन्नी , राजापुर या तीन- चार कि.मी.अंतरावरून दळूण आणावे लागत आहे. गावात हातपंप नसुन गावात आहे ते दोन पाण्याचे बोअर बंद पडल्याने पाण्याचे स्रोत बंद अवस्थेत आहेत त्यामुळे भिसन पाणी टंचाई निर्माण झाली असून फिल्टर पाणी विकत घ्यावे लागत आहे .हेच फिल्टर पाणी आंघोळीसाठी, कपडे धुण्यासाठी वापरावे लागत असल्याने चागंलाच आर्थिक फटका बसत आहे. नागरिक कसे तरी पाण्याचा काटकसरीने वापर करित असले तरीही जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याची फार गंभीर समस्या निर्माण झाली आहे.
मोबाईल मध्ये चार्जींग नसल्याने बहुतांश जनाचे मोबाईल बंद पडले असल्याने संपर्क तुटला आहे. काही जनांनी बाहेर गावी येऊन मोबाईल चार्जींग करतात. रात्रीला डासांचे प्रमाण जास्त असल्याने लहान बालके पंखा शिवाय झोपत नाहीत. या व्यतिरिक्त मुलभुत समस्या निर्माण झाले असुन गावकरी त्रस्त झाले आहेत.
लवकर विद्यूत डिपो जळालेला चालू करावे अन्यथा ग्रामस्थ अंदोलन करेल असा इशारा चंद्रकांत पाटील पागंरीकर व ग्रामस्थांनी केले आहे.



# पावसाचा शेतकऱ्यांना दिलासा; मात्र किडीचा प्रादुर्भाव

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** यंदाच्या खरीप हंगामात पावसाने बऱ्याच दिवसांची दडी मारली. त्यामुळे शेतकरी मेटाकुटीस आला आहे. बहुतांश शेतकऱ्याकडे सिंचनाची सोय असल्यास त्यांनी पिकांना पाणी दिले. मात्र सिंचाना अभावी बऱ्याच भागात पिकांनी माना टाकल्या आहेत. परंतु २१ सप्टेंबर ला चांगल्या प्रकारे पाऊस पडल्याने पिकांना नवसंजविनी मिळाली आहे. मात्र किडींचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे.
आता खरिप हंगामाला जवळ जवळ तीन महिन्याचा कालावधी पूर्ण झाला आहे. परिणामी आता हंगामातील शेवटच्या महिन्यात मिळाला. पिकाला पाण्याची अत्यंत आवश्यकता असते. मात्र पावसाने काही दिवसापासुन हुलकावणी दिल्याने अनेक पिकांना फटाका बसला. काही पिके पाण्या अभावी सुकुन जमीनदोस्त झाली तर बहुतांश शेतकऱ्यांच्या सोयाबिन पिकांचा फुलबहार खाली पडला. कोरड्या दुष्काळाचे संकट निर्माण झाले असताना २१ सप्टेंबर रोजी आलेल्या पावसाने बळीराजा ला दिलासा शेतकऱ्यांना सद्यातरी दिलासा मिळाला आहे. असे असतांना मात्र सोयाबिन पिकांसह इतरी पिकांवर किडीचा प्रादुर्भाव वाढल्याने शेतकरी अडचणीत येण्याची शक्यता आहे. जलसिंचन करणारे स्रोत सिंचन आद्यापही परिपुर्ण भरलेले नाहीत त्यातच वरथेंबी पावसावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांची संख्या मोठी असल्याने या महिन्याच्या शेवटपर्यंत पाऊस आल्यास शेतकऱ्यांना लाभ होणार मात्र किडीचा प्रादुर्भावही वाढला आहे.
खरीप हंगामातील विविध पिकावर किडीचा प्रादुर्भाव वाढतच असुन त्यावर उपाययोजना करण्यासाठी शेतकऱ्यांना कृषि जलसिंचन करणारे स्रोत अद्यापही विभागा कडून मार्गदर्शन करण्याची परिपुर्ण भरलेले नाही. त्यातच नितांत गरज निर्माण झाली आहे.

# कावी येथे नवविवाहितेची आत्महत्या

## नवऱ्यास भीती दाखवायला गेली अन् जीव गमावून बसली

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** कावी येथे एका नवविवाहितेने



नवऱ्याला भीती दाखवण्याच्या उद्देशाने गळफास लावून घेण्याचा प्रयत्न केला आणि त्यातच तिचा मृत्यू झाल्याची घटना दि.21 सप्टेंबर रोजी रात्री दहा वाजता घडली आहे. त्यावरून बामणी पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद घेतली आहे. बामणी पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या कावी येथील लक्ष्मण रामभाऊ काठमोरे व त्यांची पत्नी सायली ( वय 19 वर्षे) हे नवविवाहित जोडपे पुणे येथे कामानिमित्ताने राहात होते. ते महालक्ष्मी सणासाठी गावाकडे आले होते. दि.21 सप्टेंबर रोजी सायंकाळी महालक्ष्मी मांडणे झाल्यानंतर सायली लक्ष्मण काठमोरे हिला नवरा लक्ष्मण हा गणपती कडे जातो असा म्हणाला तुम्ही गणपतीकडे जाऊ नका मी फाशी घेईल असे सायली म्हणाली मात्र पती लक्ष्मण यांनी हसत हसत घे फाशी असा म्हणाला व निघून गेला सायलीने पतीस भीती घालण्यासाठी घरामध्येच महालक्ष्मीच्या समोरच गळफास गळ्यास अडकविला मात्र तिचा त्यातच प्राण गेला ही घटना घरच्यांनी तिचा प्राण गेल्यानंतर पाहिले तोपर्यंत तिची प्राणज्योत मावळली होती. ह्या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी बामणी पोलीस स्टेशनचे सपोनी कृष्णा घायवट, जमादार सुभाष चव्हाण ,जमादार वसंत निळे यांनी पंचनामा करून मयत सायलीचे शविच्छेदन दि. 22 सप्टेंबर रोजी जिंतूर येथील शासकीय दवाखाना येथे केले आहे. मयत सायलीच्या आई-वडिलांचे जबाब बामणी पोलिसांनी घेतले त्यामध्ये त्यांनी आक्षेप न घेतल्यामुळे अकस्मात मृत्यूची नोंद घेण्यात आली आहे. पुढील तपास बामणी पोलीस बीट जमदार सुभाष चव्हाण हे करीत आहेत.

# परंपरागत गौराईची स्थापना, विधिवत पूजाअर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** परंपरागत गौराईचे स्थापना सजावट करून विधिवत पूजाअर्चा करून गौराई ला सन्मानीत करण्यात आले. तर शनिवारी गौराई विसर्जन कार्यक्रम करण्यात येईल. पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या हिंदू धर्म संस्कृतीनुसार परंपरागत गौरीची स्थापना सजावट खाणपाण विधिवत पुजन यथायोग्य सन्मान करत गौराई स्थापनाने सर्वत्र हर्षो उल्लास जल्लोषात गौरी सण साजरा करण्यात आले. तर शनिवारी दि.२३ रोजी विसर्जन कार्यक्रम होणार आहे.गौराई आगमानसंगे वरुनराजाचे



ही आगमान गणेशोत्सवची धुमधाम आणि घरोघरी गौराई चे आगमनसंगे वरुणराजाने ही आगमान केले त्यामुळे सर्वत्र उत्साह आनंदाला उधाण आले आहे.गणेशोत्सवची धुम व त्यात गौराई आगमानचे औचित्य साधून (वरुणराजा) पावसानेही आगमान करुन पावसाने जोरदार हजेरी लावली त्यामुळे सर्वत्र पाणीच पाणी झाले जेंव्हा की पावसाअभावी मोठ्या प्रमाणात खरिप पिकांना फटका बसला आहे व त्यांना हा पाऊस पोषक असले तरी वेळेवर ऐन फुलाऱ्यात पिकांना पाणी न मिळाल्याने दाने भरणा झाला नाही.व फुले कैऱ्या वाळल्या त्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त आहे सध्या जोरदार पाऊस हजेरी लावत असल्याने बळीराजा खुश झाला आहे.




# प्रत्येक घरी मेरी माटी मेरा देश अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** शहरात मेरी माटी मेरा देश अर्थात माझी माती माझा देश अभियान अत्यंत यशस्वी ठरले असुन मा.पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, पूर्व केंद्रीय गृहराज्य मंत्री तथा राष्ट्रीय ओबीसी आयोग अध्यक्ष मा. हंसराज अहीर, मा.आमदार किशोर जोरगेवार, जिल्हाधिकारी विनय गौडा,जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधीक्षक रवींद्र परदेशी यांनी सक्रिय सहभाग दर्शवित अमृत कलश यात्रेत माती अर्पण करून अभियानात सक्रिय सहभाग दर्शविला.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या समारोपाच्या निमित्ताने मेरी माटी मेरा देश अर्थात माझी माती माझा देश अभियानाचा दुसरा टप्पा १ सेप्टेंबरपासुन राबविण्यात येत असुन याअंतर्गत देशस्तरावर अमृत कलश यात्रा काढली जात आहे. चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे शहरात ३ अमृत कलश रथांद्वारे अमृत कलश फिरविण्यात येत असून नागरिकांद्वारे उत्स्फुर्तपणे माती / तांदुळ अर्पण केले जात आहेत.

चंद्रपूर जिल्हयाचे पालकमंत्री तथा राज्याचे वित्त व नियोजन, वनमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी अमृत कलश रथ त्यांच्या दारी येताच सहपरिवार यात्रेचे स्वागत केले व माती अर्पण करून शहीदांना वंदन केले,त्याचप्रमाणे पुर्व केंद्रीय गृहराज्य मंत्री तथा राष्ट्रीय ओबीसी आयोग अध्यक्ष यांनीही सहपरिवार अमृत कलशास माती अर्पण केली. शहराचे आमदार किशोर जोरगेवार यांनी त्यांच्या घरी अमृत कलश येताच पुजन करून माती अर्पण केली व यांनी यात्रेचे नियोजन जाणुन घेतले. जिल्हाधिकारी विनय गौडा, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधीक्षक रवींद्र परदेशी यांनीही त्यांच्या परिसरात अमृत कलश येताच शहिदांना वंदन करून माती / तांदुळ अर्पण केले.

अमृत कलश रथांचे उदघाटन १५ सप्टेंबर रोजी आयुक्त विपीन पालीवाल यांच्या हस्ते करण्यात आले होते. संपुर्ण देशभरात शहीद वीरांना मानवंदना देण्यासाठी मेरी माटी मेरा देश अभियानाचा दुसरा टप्पा सुरु असून या अभियानात चंद्रपूर शहरातील नागरीकांचा सहभाग असावा यादृष्टीने चंद्रपूर महानगरपालीकेतर्फे झोननिहाय ३ अमृत रथ तयार करण्यात आले आहे. घराघरातुन छोट्या कलशांद्वारे संकलित माती व तांदूळ एकत्र आणून मोठ्या कलशात ठेवण्यात येणार आहेत. त्यानंतर जिल्हास्तरावरुन मुंबई व नंतर दिल्ली येथे पाठवुन हुतात्मा स्मारकाजवळ ‘अमृत वाटिके’ मध्ये विसर्जित केली जाणार आहे.

# सावळदबारा येथे घराघरांत भक्तिमय वातावरणात गौरींचे आगमन; देखाव्यांनी लक्ष वेधले

## भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष जयप्रकाश चव्हाण यांनी केली गौरीची आरती

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सावळदबारा येथील सर्मथ दूध डेअरी गजानन गट यांच्या येथील निवास स्थानी गौराईचे आगमन झाले. त्यानिमित्ताने गजानन गट यांच्या घरी गौरी पूजनातून मांडणी केली आहे. या निमित्ताने गट कुटुंबीयांनी यानाची प्रतिकृती साकारत गौराई पूजनातून वेगळा संदेश दिला आहे.पूर्वी श्री पुरुष असमानता मानली जायची म्हणून चूल व मूल ही संकल्पना होती, परंतु सध्याच्या युगात कुठल्याच क्षेत्रात मागे नाहीत मूली, महिला प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटवत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून घरोघरी गणपती विराजमान झाले आहेत. गणपतीच्या उत्साहानंतर काल गौराईंचा आवाहन सोहळा झाला गावात देखील मोठ्या उत्साहाने आणि भक्तीभावाने गौराईंचे आगमन झाले आहे. अनेक घरात विधिवत पूजन करून गौरीची स्थापना केली होती, गौरी स्थापना केल्याने घरात सुख शांती आणि समृद्धी लाभत असल्याची अनेक भाविकांची श्रद्धा आहे. यावेळी पुरणपोळीचा नैवेद्य गौराईला दाखवून भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष जयप्रकाश चव्हाण यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. कुटुंबातील सर्व लहान थोर या उत्सवात सहभागी झाले होते. महिला अगदी नटून सजून गौरींचे स्वागत केले. तीन दिवस या उत्सवामुळे घरात आनंदाचे वातावरण होते आपल्या संस्कृतीत गौरी गणपती सणाला मोठे महत्त्व आहे. हा सण सर्वजण एकत्रित येऊन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.गट परिवाराने हा देखावा साकारला आहे. हा देखावा म्हणजे 'आम्ही नारी अबला नसून सबला आहोत 'हा संदेश देण्यात आला. प्रत्येक वर्षी गौरी पूजनावेळी महिला बळकटीकरणाचे वेगवेगळे देखावे प्रत्येक वर्षी साकारले जाते. यातून निश्चितपणे प्रत्येक क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांसाठी हा देखावा प्रेरणादायी ठरेल. गजानन गट नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर असतात अन्नदान, समाज हिताचे उपक्रम राबवितात असतात. गट यांच्या निवासस्थानी आरती व महाप्रसादाच्या वेळी जिल्हा उपाध्यक्ष जयप्रकाश चव्हाण, माजी सरपंच मोरसिंग चव्हाण, विनोद टिकारे,दिपक मानकर, संतोष राजपूत, गणेश अनगयते, शांताराम खराटे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पावसाळ्यात पुलाचे काम; येण्या-जाण्यासाठी पर्यायी रस्ता नाही

## वाहने फसली, दुचाकी चारचाकी वाहनधारकांचे हाल : वरिष्ठांचे दुर्लक्ष, ठेकेदाराचे अब्दुल्ला गुड़ थैली में

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील चिकलठाणा -लोणीबोडखा मुख्य रस्त्यावर लोणी गाव फाट्याजवळ भरपावसाळ्यात सार्वजनिक बांधकाम विभाग उप विभाग खूलताबाद अंतर्गत दोन पुलाचे काम गुत्तेदार करवी विभागाने हाती घेतले असुन पर्यायी रस्ता न करता व पुलासाठी खोदकाम करण्यात आले आहे.तर नळकांड्या साठी अंदाजपत्रकीय खोदकाम व सिंमेट कॉंक्रेट भराई न करता कोरडे दगडे वरच्या वर भरुन सरकार व नागरिकांच्या निधिचे दुरोपोयोग करुन गडगंज कमाई करण्याचे प्रयत्न होताना दिसून येत आहे.
ऐन पावसाळ्यात सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत गुत्तेदार करवी विभागाने चिकलठाणा -लोणी बोडखा रस्त्यावर लोणी गाव फाट्याजवळ दोन पुलाचे काम हाती घेतले आहे. तर कामादरम्यान पर्यायी रस्ता येजा साठी आवश्यक असताना रस्ता न केल्याने व त्याभागात रात्री पाऊस झाल्याने सकाळी येजा करणारी वाहने फसली तर दुचाकी चारचाकी वाहनधारकांचे हाल झाले.त्यात शुक्रवारी दि.२२ सावंगीचा आठवडी बाजार असल्याने अधिकची वाहनांची येजा असल्याने वाहनधारक बाजारकरुंचे हाल झाले.
त्यात पुलकाम नळकांड्या टाकण्यासाठी केलेली खोदाई वरच्यावर तर सिमेंट कॉंक्रेट (पीसीजी) ऐवजी कोरडे दगडं टाकुन त्यावर सिमेंटी नळकांड्या टाकण्याचे कार्य सुरू आहेत.
काम करताना माहिती फलक ही लावण्यात आले नाही.जेणे करुन नागरिकांना ज्ञान झाले तर व्यवस्थीत व अंदाजपत्रकाप्रमाणे काम करावे लागेल.याची गुत्तेदार व विभागाकडून घेण्यात आली आहे.
एकुण सरकार व नागरिकांच्या निधिचे दुरोपोयोग करुन गडगंज संपत्ती करण्याचा प्रयत्न येथे सूरु असुन वरिष्ठांनी लक्ष घालून हा प्रकार थांबवून अंदाज पत्रकीय नुसार काम करुन घ्यावे यासंदर्भात वरिष्ठ कार्यालय व मंत्री तथा जिल्हाधिकारी विभागीय आयुक्तांकडे याची तक्रार दाखल करणार असल्याची माहिती मिळाली.
विशेष म्हणजे विभागांचे कुणीच याकामावर फिरकले नाही याचा अर्थ काय काढावे.म्हणजे भर अब्दुला गुड थैली मे असा प्रकार ग्रामीण भागात सुरु आहे.याचे प्रात्यक्षिक सद्या सुरु असलेल्या कामावर येवून दिसेल हे विशेष.



## कॉंग्रेस कमिटी ग्राहक संरक्षण विभागाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी शेख शफिख यांची नियुक्ती

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** जिंतूर तालुक्यातील चारठाणा येथे प्रसिद्ध डॉ.जाकीर हुसेन बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून विविध सामाजिक कार्यक्रमात अग्रेसर असणारे शेख शफिक चारठाणकर यांची कॉंग्रेस ग्राहक संरक्षण विभागाच्या परभणी जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले व ग्राहक संरक्षणचे प्रदेशाध्यक्ष नितीन पाटील यांच्या आदेशानुसार ग्राहक संरक्षण विभागाचे परभणी जिल्हा अध्यक्ष खदीर लाला हाश्मी यांनी केली आहे.
त्यांना नियुक्तीपत्र सादर करताना अल्पसंख्यांक प्रदेश उपाध्यक्ष सत्तार ईनामदार सलीम ईनामदार सरदार खान उर्फ लालाभाई.मा हकीम सय्यद कासिम अली व मान्यवर उपस्थित होते प्रदेश उपाध्यक्ष सत्तार ईनामदार यांनी शेख शफीख यांना पुढील कार्याच्या शुभेच्छा दिल्या.





## बॉंबशोधक पथकाकडून गणेश मंडळांची पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** तालुक्यातील चारठाणा येथे गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर परभणी येथील बॉम्ब शोध पथक, दहशतवादी व आतंकवादी पथकाकडून समता गणेश मंडळ, वीर हनुमान गणेश मंडळ, सावता गणेश मंडळ आदी गणेश मंडळाच्या ठिकाणची पाहणी श्वान पथकाद्वारे शुक्रवारी (दि.२२) करण्यात आली. सध्या सर्वत्र गणेशोत्सवाला प्रारंभ झालेला असून खबरदारीचा भाग म्हणून परभणी येथील बॉम्ब शोधक पथक दहशतवादी व आतंकवादी विरोधी पथकाच्या अधिकाऱ्यांनी बसवेश्वर चौकातील समता गणेश मंडळासह इतर ठिकाणच्या गणेश मंडळाची पाहणी करून गणेश मंडळातील पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन सुचना केल्या. तसेच रस्त्यावर काही बेवारस वस्तु आढळल्यास हात लावू नये त्याचबरोबर एखादी अनोळखी व्यक्ती आढळून आल्यास पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी संबंधित श्वान पथकातील कर्मचारी, गणेश मंडळ पदाधिकारी व चारठाणा पोलीस ठाण्यातील कर्मचारी उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# सोलापूर-धुळे महामार्गावर धनगर समाजाचा एल्गार

## एसटी प्रवर्गात आरक्षण मिळवण्यासाठी रास्ता रोको आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मगावी चौंडी (ता. जामखेड) येथे धनगर समाज बांधवांनी धनगर समाजाला एसटी प्रवर्गाचे (अनुसूचित जमाती) आरक्षण मिळावे, यासाठी बेमुदत उपोषण सुरू केले आहे. या उपोषणा बाबत सरकारकडून समाधानकारक तोडगा निघाला नाही. त्यामुळे धनगर समाजाच्या वतीने महाराष्ट्रातील विविध ठिकाणी रास्ता रोको आंदोलन सुरु झाले आहे.

धाराशिव जिल्ह्यातही धनगर समाजाकडून आंदोलनास पाठिंबा दर्शवत व एसटी प्रवर्गात आरक्षण मिळवण्यासाठी रास्ता रोको आंदोलन केले आहे. गेल्या तीन-चार दिवसांपूर्वी तुळजापूर येथे धनगर समाजाकडून रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. त्यानंतर आज दी.21रोजी वाशी तालुक्यातील धनगर समाज बांधवांनी सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्ग वाशी फाटा येथे मेंढ्यांसह रस्त्यावर उतरून सकाळीं ११.०० वाजता रस्ता रोको आंदोलन केले.

वाशी तालुक्यातील समस्त धनगर समाज बांधवा यांच्या वतीने चौंडी येथे धनगर समाज बांधव आमरण उपोषण करत आहे. त्यांना पाठिंबा दर्शवत धनगर समाज बांधवांनी रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनावेळी धनगर समाजाकडून तहसील मधील पाटील साहेब व तवले साहेब तसेच वाशी पोलीस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले.

निवेदन देतेवेळी धनगर समाजातील अमरसिंह तागडे, विकास हाके, अभिजीत कोरडे, उमेश खडके, पांडुरंग शिंपले, विकास तागडे, राहुल वैध, बाजीराव करडे, अविनाश चांगण, विठ्ठल कोरडे, गौतम कोरडे, समाधान ढेंगाणे, विठ्ठल ढगारे ऋषिकेश लगास, रोहित कोरडे, आकाश कोरडे, चंद्रशेखर काशीद, पांडुरंग कवडे, विशाल कोरडे प्रशांत नजन, दत्ता वाघमारे, राजकुमार हजारे, धनंजय वैद्य व इतर समाज बांधव उपस्थित होते.






# प्रहार फुलंब्री तालुकाध्यक्षपदी गायकवाड

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील गणोरी येथील सुदाम भाऊसाहेब गायकवाड यांची प्रहार जनशक्ती पक्षाच्या फुलंब्री तालुकाध्यक्षपदी गुरुवारी निवड करण्यात आली आहे. प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुधाकर शिंदे यांनी ही निवड केली आहे.

प्रहार जनशक्ती पक्ष गेल्या कित्येक वर्षांपासून प्रगतीशील कार्य जनतेसाठी करत आहे. या अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर प्रहार जनशक्ती पक्ष, संघटन बांधणीसाठी सामाजिक व राजकीय ऐतिहास घडवणाऱ्या प्रक्रियेचे आपण घटक आहोत. फुलंब्री तालुका अध्यक्षपदाची जबाबदारी उत्साहाने पार पाडवी,' असे नियुक्ती पत्रात म्हटले आहे.

गायकवाड यांच्या नियुक्तीबद्दल सुधाकर शिंदे, कृष्णा गाडेकर, राम गाडेकर, रावसाहेब शेळके, जीवन गायकवाड, संतोष तांदळे, गणेश सुरभय्यै, संजय तांदळे, रामू खाकरे, रावसाहेब खिल्लारे, राजेंद्र गाडेकर राजू उबाळे आदींनी स्वागत केले आहे.

# संभाजीनगर वाहतूक शाखेतर्फे चालकांची मोफत नेत्र व आरोग्य तपासणी

## १७८ चालक मालक यांनी घेतला लाभ

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** यांच्या वतीने जिल्ह्यातील काळी पिवळी, खाजगी वाहन, आपे रिक्षा चालक यांची मोफत नेत्र तपासणी व आरोग्य तपासणी करून त्यांना मोफत चष्मे वाटप कार्यक्रम नगर पंचायत सभागृह फुलंब्री इथे संपन्न झाला.

ग्रामिण पोलीस अधीक्षक मनीष कलवानिया व अप्पर पोलीस अधीक्षक सुनील लांजेवार यांच्या मार्गदर्शन खाली फुलंब्री शहरात चालकांसाठी मोफत नेत्र तपासणी व आरोग्यतपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

कर्यक्रमाचे उदघाट्न उप विभागीय पोलीस अधिकारी श्री जयदत्त भवर यांच्या हस्ते करण्यात आले, कार्यक्रमा करिता पोलीस उप अधीक्षक श्रीमती पूजा नागरे, पो नि. किशोर पवार वाहतूक शाखा संभाजीनगर (ग्रा.), पो नि. रवींद्र निकाळजे फुलंब्री, स. पो. नि. संदीप राजपूत, पो उप. नि. शशिकांत तायडे, श्रीनिवास धुळे, स. पो. उप. नि. सुखदेव लोखंडे, बळीराम काकडे, (पो अंमलदार), सूर्यकांत पाटील, राजीव संपाळ, श्रीकांत दांडगे आदिची यावेळी उपस्थिती होती. या आरोग्य व नेत्र तपासणी शिबीरात एकूण १७८ चालक व मालक यांची नेत्र तपासणी व आरोग्य तपासणी करण्यात आली. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी डॉ. गोविंद टिळे व डॉ. पंडीत पारवे यांनी परिश्रम घेतले त्यांना आरोग्य पथकातील कर्मचारी यानी सहकार्य केले.



# समतोलच्या कार्याला प्रशासनाची शाबासकी

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** आज आपल्या समतोल प्रकल्पात अतिशय आनंददायी अनुभव आला. दि. २२ सप्टेंबर २०२३ रोजी जळगाव रेल्वे स्थानकाला डी.आर.एम. सौ. इती पांडे मॅडम यांनी भेट दिली. प्लॅटफॉर्म क्रमांक ३ वरील एका स्टॉलचे उद्घाटन डी.आर.एम. मॅडम यांनी केले आणि त्यानंतर त्यांच्या सोबत असलेले जळगाव जिल्ह्याचे कलेक्टर आयुष प्रसाद साहेब, स्टेशन मास्टर ए. एस. अग्रवाल, रेल्वे सुरक्षा बलाचे निरीक्षक ज्ञानेश्वर पाटील तसेच उपस्थित रेल्वे कर्मचारी हा सर्व ताफा आपल्या समतोल प्रकल्प बाल सहाय्यता केंद्राला भेट देण्यासाठी आला. आपल्या समतोल प्रकल्पाच्या वतीने डी.आर.एम. मॅडमांचा स्वागत व सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी आपल्या समतोलच्या सर्व सहकाऱ्यांना धक्कादायक पण मनाला अतिशय सुखावणारी एक गोष्ट घडली. कलेक्टर साहेब आयुष प्रसाद यांनी समतोलच्या प्रकल्पात काम करणाऱ्या सहकाऱ्यांची पाठ थोपटून सर्वांना शाबासकी दिली आणि नंतर त्यांनी स्वतः डीआरएम मॅडम यांना समतोल प्रकल्पाची संपूर्ण माहिती इंग्रजीमधे करून दिली. कलेक्टर साहेबांना आपल्या प्रकल्पाद्वारे चालणाऱ्या कामाची जाणीव आणि संपूर्ण माहिती आहे हे बघून प्रकल्पातील सर्व उपस्थित सहकाऱ्यांना अतिशय आनंद वाटला. आज दोन खुप मोठ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांनी



आपल्या प्रकल्पाची प्रशंसा केली आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या ही आपणा सर्वांसाठी अतिशय सार्थक अभिमानाची गोष्ट आहे. या सकारात्मक प्रतिक्रियेने नक्कीच आपण करीत असलेल्या कामाविषयी विश्वास आणि समर्पणाची भावना वृद्धिंगत झाली आहे यात शंका नाही.

# जयभवानी विद्या मंदिर शाळेत चौकशी करा

## शिक्षण मंत्री, मुख्य कार्यकारी अधिकारी, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी; अन्यथा शाळेला कुलूप लावण्याचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील जय भवानी विद्या मंदिर शेलगाव खु, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत नसून भौतीक सुविधांपासून ही अनेक वर्षांपासून वंचित ठेवण्या येत असून पालक व ग्रामस्थांनी वेळोवेळी शाळेचे मुख्याध्यापक, संस्थेचे अध्यक्ष, सचिव यांना सांगून ही सुधारणा होण्या ऐवजी शाळेत राजकारण होत असून यामुळे या शाळेतील मुलांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

जय भवानी विद्या मंदिर शाळेत संस्थेच्या संचालक मंडळाचे नातेवाईक कर्मचारी असून शाळेवर नियमीत येत नाहीत, त्यांना गुणवत्ता पुर्ण शिक्षण देता येत नाही, शाळेवर असलेल्या महिला कर्मचारी सतत गैरहजर राहून पगार घेतात, शाळेत विद्यार्थ्यांना व्यवस्थित मराठी इंग्रजी वाचता येत नाही, शाळेत प्रयोगशाळा, वाचनालय, क्रीडा साहित्य, मुलींना स्वतंत्र स्वच्छता ग्रह उपलब्ध नाही आदी अनेक प्रकारे विद्यार्थ्यांना भौतिक सुविधांपासून वंचित ठेवण्यात येत असून शाळेत बोगस विद्यार्थी दाखवून पटसंख्या दाखवून शासनाची दिशाभूल करून ही संस्था फसवणूक करत असून या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करून संबधीत दोषींवर कडक कारवाई करावी अन्यथा शाळेला कुलूप लावल्या जाईल असा इशारा शाळेचे पालक व ग्रामस्थांनी दिलेला आहे.

यासंबधी शिक्षणमंत्री दीपक केसरकर, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्यकार्यकारी अधिकारी, मध्यमिक शिक्षण विभाग आदींना ग्रामस्थ व पालकांनी निवेदन दिलेलं असून शाळेच्या बोगस विद्यार्थ्यांची, शाळेतील गुणवत्तेची, भौतिक सुविधांची, शाळेत होत असलेल्या नियमबाह्य कामांची सखोल चौकशी करण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

आम्ही वेळीवळी संस्थाचालक, मुख्याध्यापक व काही शिक्षक यांना सांगण्याचा प्रयत्न करतोय परंतु शाळेत पालक मिटिंग घेतल्या जात नाही, जे पालक शिक्षणा विषयी मत मांडतात त्यांच्या मुलांसोबत शाळेतील काही शिक्षक दुजाभाव करतात, संस्था चालक व मुख्याध्यापक शाळेत अनेक नियम बाह्य काम करतात या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी होणे अत्यंत गरजेचे असून दोषींवर कडक कार्यवाही व्हावी अन्यथा लोकशाही मार्गाने वरिष्ठ कार्यालयात यसबंधी आंदोलन करण्यात येईल. **राजू खैरनार ( आध्यक्ष पालक संघ जय भवानी विद्या मंदिर शेलगाव खु )**

**जय भवानी विद्या मंदिर शाळेत आमच्या मुलांना व्यवस्थित इंग्रजी, विज्ञान व गणित विषय** शिकवण्यात शिक्षक कमी पडतात वेळीवळी सांगून ही सुधारणा होण्या ऐवजी तक्रार करणाऱ्या पालकांच्या मुलांच्या बाबतीत मुद्दाम दुजाभाव केला जातो. शाळेत संस्थाचालक, मुख्याध्यापक व काही शिक्षक राजकारण करून विद्यार्थ्यांच शैक्षणिक आयुष्य खराब करत आहे.
**रामेश्वर इधाटे पालक**

# पटसंख्येच्या नावाखाली शाळा बंद कराल तर याद राखा

## नाना पटोले : बहुजन समाजाला शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा मनुवादी सरकारचा डाव

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** कमी पटसंख्येच्या नावाखाली जिल्हा परिषद शाळा बंद करण्याच्या हालचाली मनुवादी भाजपा सरकारने सुरु केल्या आहेत. शिक्षण हक्क कायद्यानुसार मुलांना घरापासून जवळ शिक्षण उपलब्ध करुन देणे हे सरकारचे कर्तव्य आहे परंतु २० किलोमीटरच्या परिसरातील जिल्हा परिषदेच्या शाळा बंद करुन एकच शाळा सुरु ठेवण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. सरकारचा हा निर्णय बहुजन समाजातील मुलांना शिक्षणांपासून वंचित ठेवणारा असून पटसंख्येच्या नावाखाली राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळा बंद कराल तर याद राखा, असा खणखणीत इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिला आहे. शाळा बंद करण्यावर भाजपा सरकारचा समाचार घेताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, कमी पटसंख्येचे कारण देत सरकार जिल्हा परिषदेच्या जवळपास १५ हजार शाळा बंद करुन समुह शाळा सुरु करणार असल्याच्या बातम्या प्रसिद्ध झालेल्या आहेत. या शाळांमधून १ लाख ८५ हजार विद्यार्थी शिकत आहेत तर २९ हजारांपेक्षा जास्त शिक्षक कार्यरत आहेत. शिक्षणाची गंगा वाड्या वस्त्यापर्यंत पोहचावी यासाठी राज्यातील अनेक महापुरुषांनी शाळा सुरु केल्या. पण हे सरकार गरिब, मागास, वंचित समाजातील मुलांना शिक्षणापासून दुर ठेवण्याचा प्रयत्न करत आहे. गाव व वस्तीवरील शाळा बंद केल्यास दुर शिक्षण घेण्यासाठी लहान मुलांना पायपीट करावी लागेल. वाहनाची व्यवस्था ग्रामीण, दुर्गम भागात नाही अशा परिस्थितीत २० किलोमीटरच्या क्षेत्रात एकच शाळा ठेवण्याचा निर्णय निर्बुद्धपणाचा व कसलाही विचार न करता घेतलेला दिसत आहे. समुह शाळांचा प्रयत्न यापूर्वीही केला होता पण तो अपयशी ठरला आता पुन्हा नवीन शैक्षणिक धोरणात समुह शाळेचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे १५ हजार शाळा बंद होऊन या शाळांमध्ये शिक्षण घेणारे सामान्य कुटुंबातील मुले-मुली शिक्षणांपासून वंचित होतील. खाजगी महागडे शिक्षण ग्रामीण, दुर्गम व वाड्या वस्त्यांवरील मुलांना परवडणारे नाही. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांनी यासंदर्भात तातडीने खुलासा गरणे गरजेचे आहे. याप्रश्नी काँग्रेस आवाज उठवेल व गरिबांच्या मुलांचा शिक्षणाचा हक्क हिरावून घेऊ देणार नाही, असेही नाना पटोले यांनी स्पष्ट केले.

# जिल्हास्तरीय गोळाफेक स्पर्धेत भक्ती प्रथम




आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** रायगड जिल्हा ॲथलेटिक्स चैमियनशीप ही स्पर्धा उलवे येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या जिल्हास्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेत 400 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेचे उदघाटन माजी आमदार तथा ॲथलेटिक्सचे रायगड जिल्हाध्यक्ष बाळाराम पाटील यांनी केले. या प्रसंगी रायगड जिल्हा अँथलेटिक्स असोशिएशनचे सचिव प्रविण खुटारकर, दिलीप पाटील, यतिराज पाटील व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. ही स्पर्धा जिओ इन्स्टिट्यूट तर्फे भरविण्यात आली होती. या स्पर्धेत एकलव्य अथलेटिक्स अकॅडमी जेएनपीटी - उरणचे विदयार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत 18 वर्षा खालील मुलींमध्ये भक्ति विजय भोईर यानी गोळाफेक क्रीडा प्रकारात 8.91 मीटर मध्ये प्रथम क्रमांक मिळविला आहे. तर भाला फेक प्रकारात भक्ति विजय भोईर हिने दुसरा क्रमांक पटकाविला आहे. ओम योगेश पाटील यांनी गोळाफेक प्रकारात दुसरा क्रमांक पटकविला आहे. तर दिपराज पाटील यांनी गोळाफेक प्रकारात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. या सर्व विद्यार्थ्यांची नाशिक व रत्नागिरी येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सदर विद्यार्थ्यांना राष्ट्रीय खेळाडू राम चौहान, योग शिक्षिका पूनम चौहान, सहाय्यक शिक्षिका गुंजन निसाद, प्रशिक्षक दिपक घरत यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. सदर विदयार्थ्यांवर सर्वच स्तरातून कौतुक व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# खुलताबाद तालुक्यात सर्वदूर बरसला पाऊस

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** सद्या उतरा नक्षत्र पाऊस सुरु असुण दि.२३ सकाळी व दुपारी शनिवारी खुलताबाद तालुक्यात सर्वदुर उतराचा जोरदार पाऊस झाला उतरा उतरली शेतकऱ्यांच्या मदतीला असेच म्हणावे लागेल. यंदा पावसाळा संपत आला तरी अर्धाही पाऊस झाला नाही की ओढे नदी नाले तलाव कोरडे ठाक पडून आहे. खरिप पिकेच पावसांच्या प्रतिक्षेत होती. ऐन फुलाऱ्यात पावसाने दडी मारल्याने खरिप पिकांतील मका बाजरी कापूस सोयाबीन भुईमूग तूर पिकांची वाढ खुंटली तर मका बाजरी पिकांतील कणसात दाने भरणा वेळी पावसाने खंड दिल्याने व नंतर पाऊस आल्याने ही फटका बसला तर गुरुवारी शुक्रवारी रात्रीचा जेमतेम तर कोठे कोठे जास्त पाऊस झाले . परंतु शनिवारी सकाळी दुपारी उतरा नक्षत्रांचे तालुक्यात सर्वदूर जोरदार पाऊस झाल्याने शेतकरी खुश आनंदी झाला.तालुक्यात दुष्काळ सदृश्य स्थीती असताना व सरकार कडून ही दुष्काळ सदृश्य परिस्थिती ची पाहणी व दुष्काळ जाहीर करण्याची हालचाली सुरु असतानाच उतरा नक्षत्र चे सर्वदूर जोरदार पाऊस झाले.आज दि २३सकाळ पासूनच पावसाने फटकेबाजी सुरु केल्याने खुलताबाद येथे भद्रा मारुती मंदिर दर्शनासाठी येत असलेल्या भाविकांना फटका बसला तर पावसामुळे तालुक्यात सर्वत्रच तुरळक वाहतूक सुरु होती.तर गुरुवार पासुन पाऊस सुरु असल्याने व आज शनिवार उतरा नक्षत्र पावसाने फटकेबाजी केल्याने शेतात ही कुठले काम करने शक्य झाले नाही. उतरा नक्षत्र पाऊस २६सप्टेंबर पर्यंत असुण पुढे हस्ती चित्रा स्वाती तीन पाऊस नक्षत्र शिल्लक आहे.




# कृषिदूतांनी पिंपरी येथील शेतकऱ्यांना बीज प्रक्रियेचे प्रात्यक्षिक करून दाखवले

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** आदित्य कृषी महाविद्यालयातील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठांतर्गत आदित्य शिक्षण संस्था सलंग्न आदित्य कृषि महाविद्यालयाचे कृषिदूत प्रफुल देवगडे, राम गडदे, महेश कवडेवार, उमेश गायकवाड, अमोल चव्हाण, ज्ञानेश्वर गौरकर, भागवत शिंदे, विशाल गंदरेवाड यांनी ग्रामीण कृषि कार्यानुभव व कृषि औद्योगिक कार्यक्रम २०२३ २४ अंतर्गत कृषिदूतांनी बीजप्रक्रिया करण्याच्या पद्धती आणि फायदे काय आहे याबद्दल पिंपरीच्या शेतकऱ्यांना प्रात्यक्षिक दिले. कोणतेही पीक लावताना आपण जसे जमिनीची पूर्व मशागत करतो तसेच पिकामध्ये येणाऱ्या कीडीचे व रोगाचे प्रतिबंधात्मक नियोजन करणे फायदेशीर ठरते. यासाठी बियाण्यांची बीज प्रक्रिया करणे गरजेचे आहे. पीक संरक्षणामध्ये जेवढे महत्व फवारणी मधून कीड रोग नियंत्रसाठी दिले जाते तेवढे महत्व बीजप्रक्रीयेस दिले जात नाही. बरेच शेतकरी बीज प्रक्रिया करीत नाहीत, बीज प्रक्रिया केल्यामुळे खूप फायदे होतात. असे कृषीदूतांनी शेतकऱ्यांना सांगितले जमिनीतून व बियाण्याद्वारे पसरणाऱ्या रोगांचा उदा. मर रोग आणि मूळ कूज इ. प्रादुर्भाव टाळता येतो तसेच बियाण्याची उगवण क्षमता वाढते बिजप्रक्रियेसाठी कमी खर्च येतो, त्यामुळे ही कीड/रोग नियंत्रणाची किफायतशीर पध्दत आहे. कृषिदूतांनी बीज प्रक्रिया ही दोन पद्धतीने करून दाखवली: १. रासायनिक पध्दत या पद्धतीमध्ये बियाण्या साठी २ ते ३ ग्राम कॅप्टन किंवा थायरम वापरले जाते २. जैविक पद्धत- या पद्धती मध्ये प्रति १० किलो बियानांसाठी २५० ग्राम रायझोबियम पॉवडर वापरावी. कृषीदुतांनी बीज प्रक्रिये बद्दल संपूर्ण माहिती देत शेतकऱ्यांना पेरणी अगोदर बीज प्रतिक्रिये चे शेती मधील महत्व पटवून दिले.तसेच या अभ्यास दौऱ्यास विद्यार्थ्यांना आदित्य शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा डॉ. अदितीजी सारडा मॅडम, आदित्य कृषि महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. तुकाराम तांबे, मा. प्राचार्य श्री. श्याम भुतडा, कार्यक्रम समन्वयक डॉ. संदीप मोरे , कार्यक्रम अधिकारी व विषयतज्ञ आणि महाविद्यालयाच्या इतर प्राध्यापक वर्ग यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# खान्देश अध्यक्षपदी अशोकभाई धुळकर व धुळे शहर अध्यक्षपदी कुणाल वाघ

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आदिवासी सेलच्या खानदेश अध्यक्ष अशोकभाई धुळकर यांची व आदिवासी सेलच्या धुळे शहर अध्यक्षपदी कुणाल वाघ यांची नियुक्ती झाली.सदर नियुक्ती पत्र हे रणजीत राजे भोसले यांच्या हस्ते देण्यात आले.

अशोक धुळकर हे गेल्या ५ वर्ष्यापासून एकलव्य आदिवासी सेवा समिती च्या महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष आहेत व एकलव्य भिल सेना महाराष्ट्र राज्य १९९४ पासून प्रदेशाध्यक्ष आहेत, ते दैनिक शबरी टाईम्स` उपसंपादआहेत, आदिवासी विकास परिषद महाराष्ट्र प्रदेश सदस्य, एकलव्य संघटना महाराष्ट्र कार्यकारणी सदस्य आहेत. कुणाल वाघ हे देखिल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत पदाधिकारी असून गेल्या ३ वर्षांपासून पधवीधर सेल च्या अध्यक्ष पदावर सक्रिय काम करीत आहे.

प्रदेश अध्यक्ष मा.आ. जयंत पाटील साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व आदिवासी सेल चे कार्याध्यक्ष जयंत वानोळे यांच्या आदेशावरून नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या निवडीनंतर रणजीत राजे भोसले, जितेंद्र मराठे, संदीप बेडसे, ललित वारुडे यांनी अभिनंदन केले.



# आ. किशोर जोरगेवार यांचा माझी माती माझा देश अभियानात सपत्नीक सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** माझी माती माझा देश या अभियाना अंतर्गत अमृत कलश यात्रा कार्यक्रम चंद्रपूरमधे राबविण्यात येत आहे. दरम्यान आज शनिवारी चंद्रपूरात सदर यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी अमृत कलश मध्ये सपत्नीक माती आणि तांदुळ अर्पण करुन यात्रेत आपला सहभाग नोंदविला.

आपल्या देशाच्या मातृभूमीविषयीची कायम कृतज्ञता आणि वीरांच्या योगदानाचे स्मरण व्हावे म्हणून देशात ‘मेरी मिट्टी मेरा देश’अर्थात ‘माझी माती माझा देश’ अभियान दि. 09 ऑगस्ट, 2023 पासून सुरु करण्यात आला आहे. त्यानिमित्त राज्यभरात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. याच उपक्रमांतर्गत अमृत कलश यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान आज शनिवारी चंद्रपूरात सदर यात्रेला सुरवात झाली. यावेळी सदर यात्रा चंद्रपूर विधानसभा क्षेत्राचे अपक्ष आमदार किशोर जोरगेवार यांच्या निवासस्थानी पोहचल्यानंतर आमदार किशोर जोरगेवार यांनी सपत्नीक सदर अमृत कलश मध्ये माती आणि तांदुळ अर्पण केले. या कलशातील मातीचा वापर दिल्ली येथे महान शुरविरांच्या स्मरनार्थ तयार करण्यात आलेल्या अमृत



वाटीकेत केला जाणार आहे.

‘माझी माती माझा देश’ अभियान अंतर्गत ‘अमृत कलश’ यात्रा कर्तव्य भावनेतून यशस्वी केली जात आहे. या यात्रेतून राज्यातील प्रत्येक कुटुंबात, घरा-घरात राष्ट्रभक्तीचे भावना जागृत करण्याचे पवित्र काम केले जात आहे. हे अभियान राष्ट्राचे गौरव वाढविणारे असल्याची भावना आमदार किशोर जोरगेवार यांनी व्यक्त केली आहे.

यावेळी चंद्रपूर मनपा प्रभारी सहा.आयुक्त नरेंद्र बोभाटे , मुख्य स्वच्छता निरीक्षक भूपेश गोठे, झोन क्रमांक दोन चे स्वच्छता वर्गाचे कर्मचारी उपस्थित होते.